म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १२००

# थोरो

## यांचे निवडक लेख

अनुवादक पंढरीनाथ ब. रेगे

REFBK-0010271

# हेन्री डी. थोरो यांचे निवडक लेख

अनुवादक : पंढरीनाथ ब. रेगे

REFBK-0010271

स्वस्त-पुस्तक-योजना : १० :

ग. पां. परचुरे
प्रकाशन मन्दिर
मुंबअी ४

मूल्य अेक रुपया

प्रथमावृत्ति : १ डिसेंबर १९५९

मुद्रक : वि. पु. भागवत, मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, मुंबअी ४

प्रकाशक : वि. ग. परचुरे, ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, गोरेगांवकर चाळ क्र. २, गिरगांव, मुंबअी ४

...ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
...क्र. 25863..... दि: 17-6-65
क्रमांक 1200.......... नों: दि: 25/12

## अ नु क्र म

१. सविनय कायदेभंग ५
२. मी कुठें आणि कशासाठीं राहिलों २७
३. फुटलेलें जहाज ३७
४. रविवार ४५
५. भ्रमन्ती ६४
६. निवडक घरगुती पत्रें ८२
   १. दोन मृत्यु ८२
   २. रानकोंबड्यांसारखें सुख ८४
   ३. थोर लोकशाहीवादी—व्हिट्मन् ८८
   ४. पुन्हा व्हिट्मन् ९०
   ५. पैसा 'कठीण' आहे ९१
   ६. स्वतःचं हाड कुरतडत रहा ९५

... संग्रह ... ठा... . ...
अनुक्रम ................ वि: ...................
क्रमांक नों. दि: ...............
...हालय ...
१०२७१

# सविनय कायदेभंग*

"ज्या शासनसंस्थेला राज्यकारभाराचा गाडा कमींत कमी हांकावा लागतो ती उत्तम होय" हें वचन मला मनःपूर्वक मान्य आहे; आणि हें वचन अधिक त्वरेनें व पद्धतशीरपणें कृतींत उतरलेलें पाहण्याची माझी इच्छाहि आहे. ह्या तत्त्वाची परिणति शेवटीं अशी होईल कीं..."ज्या शासनसंस्थेला राज्यकारभाराचा गाडा बिलकूल हांकावा लागत नाहीं ती शासनसंस्था सर्वोत्तम होय." ही गोष्टहि मला पटते. आणि जेव्हां लोकांची यासाठीं तयारी होईल, तेव्हां अशा प्रकारचें सरकार त्यांना मिळेल. शासनसंस्था फार तर कार्योपयोगी असेल; पण बऱ्याचशा शासनसंस्था सामान्यतः, आणि सर्वच शासनसंस्था कधीं कधीं, अनुपयुक्त ठरणाऱ्या असतात. खड्या सैन्याविरुद्ध बरेच महत्त्वाचे आक्षेप घेण्यांत येतात आणि त्यांच्यांत भरपूर तथ्यहि असतें. हेच आक्षेप शेवटीं चालू शासनसंस्थेविरुद्धहि घेतां येतील.

खडें सैन्य हें मुळीं त्या शासनसंस्थेचा एक हातच होय. शासनसंस्था म्हणजे लोकांनीं आपली इच्छा अंमलांत आणण्यासाठीं योजलेली एक कार्यपद्धति असून, जोंपर्यंत लोक कृतिशील बनून तींत भाग घेत नाहींत तोंपर्यंत तिचाहि दुरुपयोग किंवा विकृत उपयोग होणें शक्य आहे. सध्यां चाललेलें मेक्सिकन युद्धच पहा ना—तुलनेनें मूठभर असलेल्या व्यक्ती चालू सरकारचा हत्यारासारखा उपयोग करून घेत असून त्याच हें युद्ध चालवीत आहेत. कारण, युद्धास प्रारंभ करण्यापूर्वीं जर लोकांना विचारलें असतें, तर या योजनेला लोकांनी संमति दिली नसती.

ही अमेरिकन शासनसंस्था म्हणजे, अगदीं अलीकडची कां होईना, पण एक परंपरा आहे. स्वतः शाबूत राहून भावी पिढ्यांपर्यंत जाऊन पोंचण्याचा तिचा प्रयत्न आहे; परंतु क्षणोक्षणीं ती आपलें थोडें तरी सत्त्व गमावीत आहे. एखाद्या

* १८४९ सालीं, 'एस्थेटिक पेपर्स' या तत्कालीन लेखसंग्रहांत प्रथम प्रकाशित.

जिवंत माणसाच्या ठिकाणीं आढळणारें चैतन्य व सामर्थ्य तिच्यांत नाहीं, कारण एखादा एकटा माणूस आपल्या मर्जीनुसार तिला वांकवूं शकतो. लोकांनासुद्धां ती एखाद्या लांकडी बंदुकीसारखी आहे. पण म्हणून कांहीं ती कमी आवश्यक आहे असें नाहीं; कारण शासनसंस्थेबद्दलची लोकांची जी कल्पना असते तिचें समाधान होण्यासाटीं कसली तरी गुंतागुंतीची यंत्रणा त्यांना हवी असते आणि तिचा गोंगाट ऐकायचा असतो. लोक आपल्या फायद्यासाटीं आत्मवंचना कशी करतात, अगदीं स्वतःच स्वतःची वंचना कशी करतात हें शासनसंस्था अशा प्रकारें दाखवून देतात. ही शासनसंस्था उत्कृष्ट असल्याचें आपण कबूल केलें पाहिजे. आणि एवढें असूनहि ह्या शासनसंस्थेनें आपण होऊन कधींहि कसल्याहि धाडसाला उत्तेजन दिलें नाहीं; उलट, उताविळीनें त्यांतून आपलें अंग काढून घेतलें आहे. ती कांहीं देश स्वतंत्र राखीत नाहीं, कीं पश्चिमेकडील प्रश्न मिटवीत नाहीं, कीं कसली शिकवणहि देत नाहीं. जें सर्व कांहीं चांगलें साध्य झालेलें आहे तें अमेरिकन जनतेच्या अंगभूत व्यक्तित्वामुळें साधलें गेलें आहे; आणि शासनसंस्था आड आली नसती, तर त्यानें आणखीहि थोडेंफार साधलें असतें.

परंतु, जे स्वतःला 'सरकारच नको'वादी म्हणवून घेतात त्यांच्याप्रमाणें नव्हे, तर व्यावहारिक दृष्ट्या व नागरिक या नात्यानें बोलायचें झाल्यास मी, लगेच सरकार नको असें न म्हणतां लगेच अधिक चांगलें सरकार पाहिजे अशी मागणी करीन. कशा प्रकारचें सरकार आपल्याला पाहिजे आहे तें प्रत्येकानें सांगावें, म्हणजे तें मिळविण्याच्या दृष्टीनें एक पाऊल पुढें टाकल्यासारखें होईल.

जनतेच्या हातांत एकदां सत्ता गेली कीं, बहुसंख्य गटाला कारभार चालवूं देण्यांत येतो, आणि तोहि बराच काळ. याचें व्यावहारिक कारण असें कीं, तो बहुसंख्य गट बहुधा योग्य तें करील किंवा अल्पसंख्य गटाच्या दृष्टीनें ही गोष्ट न्याय्य अशीच असते म्हणून नव्हे; तर बहुसंख्य गट संख्येनें सर्वांत प्रबळ असतो म्हणून. परंतु बहुसंख्य गटाची सत्ता असलेलें सरकार नेहमींच न्यायावर आधारलेलें असेल असें नाहीं;—अगदीं लोकांना समजेल इतपतसुद्धां. योग्य–अयोग्याचा निर्णय बहुसंख्य गटाऐवजीं सारासार विवेकानें घेणारें सरकार असूं शकणार नाहीं काय? अशा सरकारांत कार्योपयुक्ततेच्या तत्त्वानुसार जरूर तेवढ्याच प्रश्नांचा निर्णय बहुसंख्य गटानें घ्यावयाचा. नागरिकानें क्षणभर किंवा कणभर कां होईना, आपली सारासार विवेकबुद्धि खासदाराला समर्पित करायलाच हवी काय? मग प्रत्येक माणसाला सदसद्विवेक बुद्धि तरी कां असते? मला असें

वाटतें कीं, आपण प्रथम माणसें म्हणून वागायला हवें, नागरिक म्हणून मागाहून. योग्य गोष्टीला मान देण्याची शिकवण जितकी आवश्यक आहे तितकी ती कायद्याला मान देण्यासाठीं आवश्यक वाटत नाहीं. जी गोष्ट मला योग्य वाटते ती कोणत्याहि वेळीं करणें हीच काय ती जबाबदारी माझ्यावर आहे असें मानण्याचा मला हक्क आहे. कॉर्पोरेशनला सारासार विवेकबुद्धि नसते असें म्हणतात आणि तें पुष्कळसें खरेंहि आहे; परंतु सारासार विवेकबुद्धि असलेल्या, न्यायी माणसांचें बनलेलें कॉर्पोरेशन सारासार विवेकबुद्धि असलेलें कॉर्पोरेशन असें म्हणतां येईल.

कायद्यानें लोकांना कधींहि तिळमात्रहि अधिक न्यायी बनविलेलें नाहीं. आणि कायद्याला मान देण्याच्या वृत्तीमुळें सत्प्रवृत्त लोकहि रोजच्या रोज अन्यायाचे हस्तक बनत जातात. कायद्याला गैरवाजवी मान दिल्याचा सर्वसाधारण व साहजिक परिणाम म्हणजे—सैनिक व सेनाधिकाऱ्यांची पलटण डोंगरदऱ्या तुडवून, आपल्या इच्छेविरुद्ध शिस्तीनें युद्धावर चाललेली तुम्हाला दिसेल. इच्छेविरुद्धच काय, पण त्यांच्या सारासार विवेकबुद्धीला पटत नसतांनाहि त्यांना ही चढाई करावी लागते. आपण करीत असलेली गोष्ट तिरस्करणीय असल्याबद्दल त्यांची खात्री असते; त्यांचा सर्वांचा शांततेकडेच कल असतो. परंतु यावेळीं ते कोण असतात! माणसें तरी असतात का? कीं...सत्तेवर असलेल्या बेमुर्वतखोर माणसाच्या हातचीं कळसूत्री बाहुलीं? अमेरिकन आरमाराला भेट द्या आणि तिथला नौ–सैनिक पहा.—अमेरिकन सरकार माणसाची कोणती दशा करूं शकतें याचें प्रत्यंतर त्यावरून तुम्हाला येईल. स्मशानयात्रेच्या साहित्यानिशीं जणूं शस्त्रास्त्रांखालीं गाडलेला माणूस—म्हणजे केवळ सावलीच्या स्वरूपांतील मानवाचा अवशेषच वाटेल कुणाला.

त्यांच्यापैकी बहुसंख्य माणसें सरकारची सेवा अशी करतात: मुख्यतः माणसें म्हणून नव्हे, तर यंत्रें म्हणून तीं आपलीं शरिरें राबवतात. खडें सैन्य, राखीव लष्कर, तुरुंगाधिकारी, पोलीसशिपाई, इ० इ० मधून हे लोक कामें करतात. आणि यांपैकीं बऱ्याचशा प्रकारांत न्यायान्यायबुद्धि किंवा नीतिबुद्धि यांना अनुसरून खुल्या मनानें निर्णय घेतले जात नाहींत; तर लांकूड, माती किंवा दगड यांच्या बरोबरीनें जणूं ते आपल्याला लेखतात. आणि असा कार्यभाग साधणाऱ्या लांकडाच्या माणसांचेंहि कदाचित् उत्पादन करतां येईल. परंतु गवताचीं बुजगबाहुलीं किंवा चिखलाचा गोळा यांच्यापेक्षां अधिक मान अशांना मिळत नसतो. केवळ घोडे किंवा कुत्रे यांच्यासारखीच त्यांची किंमत. आणि एवढें

असूनहि अशांना सर्वसाधारणपणें चांगले नागरिक मानण्यांत येतें. बरेचसे खासदार, राजकारणी, वकील, मंत्री, व अधिकारी—हे दुसऱ्या प्रकारचे लोक मुख्यतः आपल्या 'डोक्यांनीं' सरकारची सेवा करतात; आणि, नैतिकदृष्ट्या त्यांच्यांत क्वचितच कांहीं तफावत असल्यानें ते जशी ईश्वराची सेवा करूं शकतील तशी, मनांत तसा हेतु नसतांना, सैतानाचीहि सेवा त्यांच्या हातून होण्याचा संभव आहे. वीर, देशभक्त, हुतात्मे, परमार्थानें सुधारक व खरीं माणसें अशी फार थोडी मंडळी आपल्या सारासार विवेकबुद्धीनेंहि सरकारची सेवा करतात. आणि म्हणून बहुतेकदां त्यांना सरकारला जरूर प्रतिकार करावा लागतो. पण अशांना त्या सरकारकडून सर्वसाधारणपणें शत्रू लेखलें जातें. शहाणा माणूस केवळ माणूस म्हणून उपयोगी पडेल, आणि 'चिकण माती' बनण्याइतपत न वांकतां पत्करलेली नोकरीच ठोकरून देईल.

जो आपल्या देशबांधवांच्या सेवेला स्वतःला सर्वस्वी वाहून घेतो तो त्यांना निरुपयोगी व स्वार्थी वाटतो; परंतु जो अशा सेवेला अंशतः वाहून घेतो तो मात्र कल्याणकारी व दानशूर म्हणून वाखाणला जातो.

सध्यांच्या अमेरिकन सरकारशीं कसें वागलें असतां तें योग्य ठरेल? माझें याला असें उत्तर आहे कीं, नामुष्की पत्करल्याखेरीज कोणाला त्याच्याशीं सहकार्य करतां येणार नाहीं. जें सरकार गुलामांचेंहि सरकार आहे, त्या राजकीय संघटनेला माझें सरकार म्हणून मी क्षणभरहि मान्यता देऊं शकत नाहीं.

सर्वजण क्रांतीचा हक्क मान्य करतात. म्हणजेच, ज्या सरकारची दडपशाही किंवा नालायकी हीं मोठ्या प्रमाणांत सिद्ध होऊन असह्यहि होतात, त्या सरकारशीं एकनिष्ठ न राहण्याचा व त्याला प्रतिकार करण्याचा हक्क ते मान्य करतात. परंतु, सध्यां मात्र तशी स्थिति नाहीं आहे, असें बहुतेक सर्वजण सांगतात. १७७५ सालच्या क्रांतीच्या वेळीं मात्र तशी स्थिति होती असें त्यांना वाटतें. परदेशांतून आयात केलेल्या कांहीं वस्तूंवर आपल्या बंदरांत जकात बसविण्यांत आली आहे म्हणून हें सरकार वाईट आहे असें कुणी मला सांगूं लागेल तर ह्या गोष्टीचा उगाच नस्ता बाऊ मी फार करून करणार नाहीं. कारण त्या वस्तूंशिवाय माझें भागूं शकेल. सर्व यंत्रांना घर्षण हें असतेंच; आणि अनिष्ट गोष्ट वरचढ होऊं न देतां एकंदर समतोल राखण्याच्या कामीं ही गोष्ट फार उपकारकहि ठरते. कांहीं झालें तरी, त्याबद्दल चळवळ करणें मोठें पातक ठरेल. परंतु जेव्हां घर्षणच यंत्रावर प्रभुत्व गाजवूं पाहतें, आणि दडपशाही व दरोडेखोरी यांना सुसंघटित स्वरूप येतें, तेव्हां मात्र मी असें म्हणेन, कीं, असलें यंत्रच

यापुढें आपल्याला नको. दुसऱ्या शब्दांत सांगायचें म्हणजे, स्वातंत्र्याचें आश्रय-स्थान म्हणवून घेणाऱ्या राष्ट्राची एक-षष्ठांश लोकसंख्या गुलाम असेल, आणि एखाद्या सबंध देशावर अन्याय्य रीतीनें आक्रमण करून परकीय सेनेनें तो जिंकला असेल व लष्करी कायद्याच्या जोरावर हुकमतीखालीं ठेवला असेल, तर, मला वाटतें, प्रामाणिक माणसें जेवढ्या त्वरेनें बंड करून उठतील व क्रांति करतील तेवढी कमीच होईल. आणि जो देश बळकावण्यांत आलेला आहे तो आपला नसून, आक्रमण करणारें सैन्य आपलें आहे ही वस्तुस्थिति असल्यामुळें हें आपलें कर्तव्य विशेष तांतडीचें होऊन बसतें.

नैतिक प्रश्नांबाबत पुष्कळसे लोक ज्याला अधिकारी पुरुष मानतात तो इंग्लिश तत्त्वज्ञ विल्यम पॅले हा, मुलकी सरकारशीं विनम्रतेनें वागण्याबद्दलच्या नाग-रिकाच्या कर्तव्याबद्दल लिहितांना, कार्योपयुक्ततेचें कारण पुढें करून असें म्हणतो कीं, सबंध समाजाच्या हितासाठीं आवश्यक असेल तोंपर्यंत—म्हणजेच, जनतेची गैरसोय होऊं न देतां प्रस्थापित सरकारला प्रतिकार करणें किंवा तें बदलणें जोंपर्यंत शक्य नसेल, तोंपर्यंत त्या प्रस्थापित सरकारची आज्ञा पाळण्यांत यावी अशी परमेश्वराची इच्छा आहे...ह्या बाबतींत प्रत्येकजणानें स्वतः काय तो निर्णय घ्यावा.

परंतु कार्योपयुक्ततेच्या तत्त्वाच्या कक्षेबाहेरच्याहि कांहीं गोष्टी आहेत याची कल्पना पॅले यांना शिवलेली दिसत नाहीं. अशा कांहीं प्रकरणीं लोकांनीं, त्याचप्रमाणें व्यक्ति-व्यक्तीनें, कितीहि त्याग करावा लागला तरी, न्याय्यतेनें वागलें पाहिजे. बुडत्या माणसाकडील फळी जर मी अन्यायानें हिसकावून घेतली असली, तर मी स्वतः बुडूं लागलों तरी ती मी त्याला परत दिली पाहिजे. पॅले यांच्या मतें हें कृत्य गैरसोयीचें ठरेल. परंतु अशा बाबतींत जो आपला जीव वांचवील, तो तो एकप्रकारें गमावीलहि. ह्या लोकांनीं, धरून ठेवलेल्या गुलामांना सोडून दिलें पाहिजे. त्याचप्रमाणें मेक्सिकोवर स्वारी करण्याचा नादहि सोडला पाहिजे. मग, जनता म्हणून आपलें अस्तित्व त्यांनीं गमावलें तरी चालेल.

आचरणाच्या दृष्टीनें पाहतां राष्ट्रें पॅलेशीं सहमत असल्याचें दिसून येतें, पण सध्यांच्या बांक्या प्रसंगीं, मॅसॅच्युसेट्स् यथायोग्य अशीच कृति करीत आहे असें कुणाला वाटतें काय?

व्यवहारतः पाहायचें, तर मॅसॅच्युसेट्स्मधील एखाद्या सुधारणेला विरोध करणारे कांहीं दक्षिण भागांतील लाखभर राजकारणी लोक नाहींत; तर येथीलच लाखभर व्यापारी व शेतकरी आहेत. ह्या मंडळीला मानवतेपेक्षां व्यापारउदीम व शेतकी

यांचेंच महत्त्व जास्त. आणि, काय वाटेल तें घडो, गुलाम व मेक्सिको यांना न्याय देण्याची त्यांची बिलकुल तयारी नाहीं. लांबवरच्या शत्रूशीं मला भांडायचें नाहीं, परंतु जे जवळचे—शेजारचे लोक लांबवरच्या लोकांशीं सहकार्य करतात व त्यांच्या वतीनें पुढाकार घेतात त्यांच्याशीं माझें भांडण आहे. कारण, एरवीं या लोकांविना ती मंडळी निरुपद्रवी ठरणारी आहे. कोणत्याहि गोष्टीला जनसमाजाची एकंदरींत तयारी नसते असें म्हणण्याचा आपल्याला सराव आहे; परंतु सुधारणा सावकाश होते. याचें कारण असें कीं थोडकेसे जे लोक असतात ते बहुजन-समाजापेक्षां मूलतः विशेष शहाणे किंवा अधिक चांगले असतात असें नाहीं. बरींचशीं माणसें आपल्यासारखीं चांगलीं असणें तेवढेंसें महत्त्वाचें नाहीं; पण, निव्वळ चांगुलपणा कुठेंतरी असणें मात्र आवश्यक आहे. कारण, तोच सबंध गोळ्याला आकार देईल. मतदृष्ट्या गुलामगिरी व युद्ध यांच्याविरुद्ध असणारे हजारों लोक आहेत. मात्र, या गोष्टी नष्ट करण्यासाठीं त्यांच्या हातून प्रत्यक्ष कृति मात्र कसलीहि होत नाहीं. वॉशिंग्टन व फ्रँकलिन यांचीं आपण लेकरें आहोंत अशा समजुतींत असणारे हे लोक खिशांत हात घालून खुशाल आरामशीर बसतात आणि सांगतात कीं, 'काय करावें...कांहीं समजत नाहीं.' आणि अर्थातच ते कांहीं करीत नाहींत. एवढेंच नाहीं, तर खुल्या व्यापाराच्या प्रश्नापायीं ते स्वातंत्र्याचा प्रश्न लांबणीवर टाकतील व भोजनोत्तर, मेक्सिकोहून आलेल्या ताज्या सूचना लक्षांत घेऊन चालू बाजारभाव वाचतील! आणि कुणी सांगावें...त्या दोन्ही गोष्टींकडे दुर्लक्ष करून खुशाल झोंपीहि जातील. प्रामाणिक मनुष्य व देशभक्त यांचा भाव-प्रवाह आजकाल कसा काय आहे? ते कांकू करतात, खेद प्रदर्शित करतात व कधींकधीं अर्जविनंत्याहि करतात. परंतु कळकळीनें, परिणामकारक स्वरूपाचें असें ते कांहींहि करीत नाहींत. पुढें कधीं आपणाला पस्तावण्याची पाळी येऊं नये या इच्छेनें, इतरांनीं अनिष्ट निवारावें म्हणून ते आतुरतेने वाट पाहात राहतील. शिकस्त म्हणजे ते आपलें सवंग मत व दुबळें नैतिक पाठबळ तेवढें देतील आणि योग्य त्या गोष्टीला सुयश चिंतितील. कारण ती त्यांच्या हिताची गोष्ट असते. एका सद्गुणी माणसागणिक सद्गुणाचे नऊशें-नव्याणव पाठिराखे असतात. परंतु एखाद्या गोष्टीच्या तात्पुरत्या 'पालका'शीं व्यवहार करण्यापेक्षां त्या गोष्टीच्या प्रत्यक्ष 'मालका'शीं व्यवहार करणें अधिक सोपें असतें.

सर्व प्रकारचें मतदान हा एक प्रकारचा जुगार आहे; त्याला किंचित् नैतिक झिलई असते एवढेंच. मतदारांचें चारित्र्य कांही पणाला लागलेलें नसतें. कदाचित्

मी मत टाकलें, तर मला योग्य वाटेल त्याप्रमाणें, मी तें टाकतों. परंतु मी केलेली ती योग्य गोष्ट फलद्रूप झालीच पाहिजे अशी कांहीं मला उत्कट आस्था असते असें नाहीं. बहुसंख्य गटाकडे ती सोंपविण्यास माझी तयारी असते. **योग्य गोष्टीसाठीं** मतदान केलें, म्हणून त्यासाठीं **कांहीं केलें** असें होत नाहीं. ती योग्य गोष्ट फलद्रूप व्हावी अशी आपली इच्छा असल्याचें आपण निर्जीवपणें लोकांपाशीं फक्त व्यक्त करतों. शहाणा माणूस योग्य गोष्टीचा हवाला नशिबावर सोंपवणार नाहीं किंवा बहुसंख्य गटाच्या प्राबल्यानें ती फलद्रूप व्हावी अशीहि इच्छा धरणार नाहीं. बहुजनसमाजाच्या कृतींत फारच थोडा सद्‌गुण असतो. अखेर शेवटीं बहुसंख्य गट गुलामगिरी नष्ट व्हावी म्हणून कौल देईल, तेव्हां तो एक तर गुलामगिरीबद्दल उदास बनलेला असेल, किंवा, त्याच्या मतदानानें नष्ट होणार असलेली गुलामगिरी अत्यल्प प्रमाणांत उरलेली असेल. अशा वेळीं तेच कार्य ते गुलाम असतील. आपल्या मतानें जो स्वतःचें स्वातंत्र्य प्रतिपादन करतो त्याच्याच मतामुळें गुलामगिरी लौकर नष्ट होण्यास चालना मिळेल.

बाल्टिमोर किंवा दुसऱ्या कुठेंतरी, अध्यक्षपदासाठीं उमेदवार निवडण्याकरितां मुख्यतः संपादक व पेशानें राजकारणी असलेल्या मंडळींची एक परिषद भरणार असल्याचें मी ऐकतों. परंतु मला असें वाटतें कीं, ही मंडळी कोणता निर्णय घेतात त्याच्याशीं एखाद्या स्वतंत्र वृत्तीच्या, बुद्धिवान्, व आदरणीय व्यक्तीला काय सोयरसुतक? तरीपण त्याच्या शहाणपणाचा व प्रामाणिकपणाचा लाभ आपल्याला घेतां येणार नाहीं काय? कांहीं स्वतंत्र वृत्तीच्या माणसांचीं मतें आपल्याला मिळतील असा भरंवसा ठेवतां येणार नाहीं काय? परिषदांना हजर न राहणाऱ्या बऱ्याचशा व्यक्ती आपल्या देशांत नाहींत काय? परंतु नाहीं: या तथाकथित आदरणीय माणसाबद्दलच देशानें निराश होण्यासारखी परिस्थिति असतांना, हाच माणूस आपल्या भूमिकेपासून व आपल्या देशापुढील निराशाजनक गोष्टींपासून त्वरेनें दूर सरकल्याचें माझ्या दृष्टोत्पत्तीस येत आहे. कारण, अशा प्रकारें निवडलेल्या उमेदवारांपैकीं एकमेव **उपलब्ध** उमेदवार म्हणून हा माणूस बेधडक कोणताहि एकजण पत्करतो. यावरून जणूं काय तो असें सिद्ध करतो, कीं, तथाकथित लोकनायकाच्या कोणत्याहि कार्यासाठीं आपण स्वतः **उपलब्ध** आहोंत. एखादा तत्त्वहीन परकीय माणूस किंवा भाडोत्री आदिवासी यांच्या विकत घेतलेल्या मतापेक्षां ह्याच्या मताची किंमत जास्त नसते.

केवळ, आपलें अमुक एक मत आहे या समजुतीवर एखादा माणूस कसा काय समाधान मानूं शकेल व त्यांतच आनंद मानील? आपण व्यथित आहोंत

असें जर त्याचें मत असलें तर त्यांत आनंद मानण्यासारखें कांहीं आहे काय? जर आपल्या शेजाऱ्यानें आपणाला एका डॉलरला नागवलें, तर आपली नागवणूक झाल्याचें समजतांच तुम्ही कांहीं स्वस्थ बसत नाहीं. किंवा तुमची नागवणूक झाल्याचें सांगून, अथवा आपलें देणें देऊन टाकण्याबद्दल त्याला अर्जविनंती करूनहि आपण गप्प बसत नाहीं. तर, आपण आपली पूर्ण रक्कम मिळविण्यासाठीं तात्रडतोब परिणामकारक उपाययोजना करतों आणि पुन्हा कधींहि आपली अशी फसवणूक होऊं नये म्हणून खबरदारी घेतों.

अन्याय्य कायदे अस्तित्वांत आहेत; मग, ते पाळण्यांत आपण समाधान मानायचें, कीं, ते दुरुस्त करून घेण्याची आपण खटपट करायची व ती यशस्वी होईपर्यंत ते पाळत राहायचें?—कीं बेधडक आपण ते मोडायचे? ह्या अशा प्रकारच्या सरकारच्या अंमलाखालील लोकांना असें वाटतें कीं, ही कायदेदुरुस्ती करण्यासाठीं आपल्याकडून बहुसंख्य गटाचें मन वळेपर्यंत आपण थांबलें पाहिजे. त्यांची अशी समजूत आहे कीं, त्यांनीं प्रतिकार केला तर, जी अनिष्ट गोष्ट निवारायची तिच्यापेक्षां, तिच्यावर करावयाची उपाययोजनाच अधिक अपायकारक ठरेल. परंतु, उपाययोजनाच अधिक अपायकारक ठरणारी आहे हा दोष मुळीं सरकारचाच. कारण ती अधिक अपायकारक ठरण्यास सरकारच कारणीभूत होतें. सुधारणा व्हावी अशी अपेक्षा ठेवून तिला योग्य तो वाव तें अधिक तत्परतेनें कां देत नाहीं? अल्पसंख्य शहाण्या गटाशीं तें सौहार्दानें कां वागत नाहीं? कोणतीहि दुखापत होण्यापूर्वींच आरडाओरडा करून तें प्रतिकार कां करतें? सरकारला त्याचे दोष दाखवून देऊन त्याला अधिक कार्यक्षम बनविण्याच्या दृष्टीनें, दक्षतेनें वागण्याबद्दल नागरिकांना तें उत्तेजन कां देत नाहीं? तें नेहमीं ख्रिस्तासारख्याला क्रुसावर कां चढवतें, कोपरनिकस व लुथर यांच्यासारख्यांना वाळींत कां टाकतें, आणि वॉशिंग्टन व फ्रँकलिन यांच्यासारख्यांना बंडखोर कां ठरवतें?

बुद्धिपुरस्सर असा कृतीनें, सरकारी सत्तेचा अवमान केल्यास सरकारच्या दृष्टीनें तो एकमेव अभूतपूर्व गुन्हा ठरेल असें कुणाला वाटेल; हो, नाहींतर, त्याबद्दल निश्चित, योग्य व प्रमाणशीर अशी शिक्षा त्यानें कां ठरवून दिलेली नाहीं? कसलीहि मालमत्ता नसलेला एखादा माणूस सरकारसाठीं—राज्यासाठीं केवळ नऊ शिलिंग कमावण्यास एकदां कुठें नकार देतो म्हणून त्याला, मला माहीत असलेल्या कोणत्याहि कायद्यानें मर्यादा घालून न दिलेल्या अशा अमर्याद काळापर्यंत, तुरुंगांत घालण्यांत येतें. जे त्याला तुरुंगांत घालतात तेच स्वतःच्या

मर्जीनुसार त्याच्या तुरुंगवासाची मुदत ठरवितात. परंतु, नऊ शिलिंगांच्या नव्वद पट रकमेची त्यानें सरकारची चोरी केली, तर त्याला मात्र लौकरच पुन्हा मुक्त करण्यांत येतें.

जर हा अन्याय, सरकारी यंत्रणेच्या आवश्यक घर्षणाचा एक भाग असेल, तर तो सोडून द्या;—सोडून द्या. कदाचित् तें सुरळितपणें झिजतहि जाईल—खात्रीनें ती यंत्रणा झिजून जाईल. या अन्यायाला जर एकादी स्वतःची अशी वेगळी स्प्रिंग, एखादें कप्पीचाक, एखादें दोरखंड, किंवा एखादा उलंडा असेल, तर कदाचित्, उपाययोजनाच अधिक अपायकारक ठरेल किंवा काय याचा तुम्हाला विचार पडेल. परंतु दुसऱ्याला अन्यायकारक ठरणाऱ्या गोष्टीचा हस्तक बनण्याची पाळी या पायीं तुमच्यावर येत असेल, तर मी म्हणेन कीं, तो कायदाच मोडा. तुमचें जीवन हें ती यंत्रणा बंद पाडणारी प्रतिरोधक शक्ति बनूं द्या. जी गोष्ट गैर म्हणून तिचा मी निषेध करतों तिचा पाठपुरावा तर मी करीत नाहीं ना, याची खबरदारी कांहीं झालें तरी मला घेतली पाहिजे.

अनिष्ट गोष्टी सुधारण्यासाठीं सरकारनें तरतूद करून ठेवलेल्या कांहीं उपाययोजनांचा अवलंब करायचें म्हटलें, तर अशा उपाययोजनांची मला कांहीं माहिती नाहीं. त्या कालापव्यय करणाऱ्या आहेत. त्यांतून कांहीं निष्पन्न होईपर्यंत एखाद्या मनुष्याचें आयुष्य संपुष्टांतहि येईल. शिवाय इतर अनेक गोष्टींकडे मला लक्ष द्यायचें असतें. मी ह्या जगांत आलों तो, मुख्यतः, वस्तीसाठीं. हें एक चांगलें स्थान बनविण्यासाठीं नव्हे;—तर हें स्थान चांगलें असो वा वाईट असो, येथें राहायचें म्हणून. मनुष्याला सर्वच कांहीं करावयाचें नसतें; तर, कांहीं तरी करायचें असतें. परंतु **प्रत्येक गोष्ट** करणें त्याला शक्य नसतें म्हणून त्यानें **कांहींतरी** गैर गोष्ट करण्याची जरुरी आहे असें नाहीं. मला अर्जविनंत्या करण्याचें जसें गव्हर्नरचें किंवा कायदेमंडळाचें काम नाहीं, तसेंच त्यांना अर्जविनंत्या करीत राहण्याचें मलाहि कांहीं कारण नाहीं. आणि जर त्यांनीं माझ्या अर्जविनंत्यांकडे दुर्लक्ष केलें, तर मग मी काय करावयाचें ? परंतु ह्या बाबतींत सरकारनें कोणत्याहि उपाययोजनेची तरतूद करून ठेवलेली नाहीं; त्याची घटनाच मुळीं अनिष्टप्रद आहे.

जे स्वतःला नष्टीकरण पंथाचे लोक म्हणवून घेतात त्यांनीं, स्वतः व स्वतःची मालमत्ता या दोन्ही दृष्टींनीं, मॅसॅच्युसेट्स् सरकारला असलेला आपला पाठिंबा प्रभावीपणें ताबडतोब काढून घ्यावा असें सांगण्यास मी कचरत नाहीं. त्यांचें एकानें मताधिक्य होऊन त्याद्वारें त्यांचा हक्क फलद्रूप होईपर्यंत त्यांनीं थांबण्याचें

कारण नाहीं. त्यांच्या बाजूला ईश्वर असला कीं झालें; मग त्या दुसऱ्या एकाद्या गोष्टीसाठीं खोळंबायचें कांहींहि कारण नाहीं. दुसरें असें कीं, आपल्या शेजाऱ्यांहून जास्त बरोबर असणारा कोणीहि मनुष्य एका मताधिक्यानें आधींच वरचढ असतो.

ह्या अमेरिकन सरकारशीं, किंवा त्याचें प्रतिनिधि असलेल्या राज्य सरकारशीं, वर्षांकांठी एकदां माझी थेट व समोरासमोर गांठ पडते—आणि ती म्हणजे करवसुली करणाऱ्या माणसाच्या स्वरूपांत. माझ्याप्रमाणें राहाणाऱ्या माणसाची त्याच्याशीं अशीच—या एकाच प्रकारानें गांठ पडते. अशावेळीं तें स्पष्टपणें सांगतें : 'मला ओळखून घे'; आणि ह्या बाबतींत, त्याबद्दलचें आपलें अल्प समाधान व प्रेम व्यक्त करण्याची सर्वांत सोपी, अत्यंत प्रभावी, व सद्यःस्थितींत आपण करावयाची अत्यावश्यक गोष्ट म्हणजे त्याला नकार देणें ही होय.

मला हें चांगलें माहीत आहे कीं, ह्या मॅसॅच्युसेट्स् राज्यांत एक हजार, शंभर, मी सांगेन त्या दहा माणसांनीं—फक्त दहा **प्रामाणिक** माणसांनीं—नव्हे, अवघ्या **एका प्रामाणिक** माणसानें जर गुलामांचा कब्जा सोडून देऊन, ह्या सहभागीदारींतून प्रत्यक्षपणें अंग काढून घेतलें, आणि त्यासाठीं तुरुंगवास पत्करला, तर अमेरिकेंतील गुलामगिरी नष्ट झालीच समजा. कारण, प्रारंभ कितीहि लहान दिसला तरी हरकत नाहीं; एकदां चांगलें केलेलें कृत्य कायमचें होऊन राहातें. परंतु त्याबद्दल चर्चा करीत बसणेंच आपल्याला अधिक आवडतें; तेंच आपलें कार्य असें आपण समजतों.

कुणालाहि अन्याय्य रीतीनें तुरुंगांत टाकणाऱ्या सरकारच्या राजवटींत न्यायी माणसाचें खरें स्थानसुद्धां तुरुंगच होय. जर कुणाला असें वाटत असेल कीं, तेथें त्यांचा प्रभाव पडणार नाहीं वा त्यांचा आवाज सरकारच्या कानांना त्यानंतर पीडा देणार नाहीं, किंवा तुरुंगाच्या भिंतींआड ते शत्रू म्हणून राहणार नाहींत; तर असें म्हणावें लागेल कीं, सत्य हें चुकीच्या गोष्टीहून किती जास्त खंबीर आहे हें त्यांना माहीत नाहीं. तसेंच ज्यानें स्वतः व्यक्तिशः थोडेंफार अनुभवलें आहे तो अन्यायाशीं झुंज किती जास्त वाक्चातुर्यानें व प्रभावीपणें देऊं शकतो ह्याची त्यांना कल्पना नाहीं. तुमचें संपूर्ण मत देत जा. केवळ कागदाची एक पट्टी म्हणून नव्हे,—तर तुमचें संपूर्ण नैष्ठिक बळ म्हणून. जोंपर्यंत अल्पसंख्य गट बहुसंख्य गटाशीं जुळवून घेत असतो तोंपर्यंत तो दुर्बळ असतो; तेव्हां तो, खरें म्हणजे, अल्पसंख्य गटसुद्धां रहात नाहीं. परंतु जेव्हां तो आपल्या सर्वस्वासह —सबंध वजनासह खेंचून धरतो, तेव्हां तो अनिवार्य ठरतो. एकतर सर्व न्यायी

माणसांना तुरुंगांत डांबायचें, नाहींतर युद्ध व गुलामगिरीची पद्धति सोडून द्यावयाची असा विकल्प समोर उभा राहिला, तर अशा वेळीं त्या दोहोंपैकीं कोणत्या गोष्टीची निवड करावयाची हें ठरवितांना सरकार कांकूं करणार नाहीं. जर सहस्र माणसांनीं ह्या वर्षी कर भरला नाहीं, तर तो कर भरून, हिंसा करण्यासाठीं व निरपराध्यांचें रक्त सांडण्यासाठीं सरकारला साहाय्य करण्याएवढी ती हिंसक व रक्तलांछित उपाययोजना खास ठरणार नाहीं. खरें म्हणजे, शांततामय क्रांति जर शक्य असेल, तर तिचें हें लक्षण आहे. कर वसूल करणारा किंवा दुसरा एखादा सरकारी अधिकारी जर मला विचारूं लागला (एकदां एकानें विचारलेंहि होतें): "पण मी करूं तरी काय?" तर माझें त्याला उत्तर आहे—"जर खरोखरीच कांहीं करण्याची तुमची इच्छा असेल, तर आपल्या जागेचा राजीनामा द्या." प्रजेनें राजनिष्ठा सोडली व अधिकाऱ्यानें आपल्या जागेचा राजीनामा दिला कीं, क्रांति सिद्धीस गेलीच समजा. परंतु समजा, रक्ताचा सडा पडणें अपरिहार्य झालें. पण, सदसद्विवेकबुद्धि जायबंदी झाली, तर तो एक प्रकारचा रक्तपातच नाहीं काय? ह्याच जखमेंतून मनुष्याचा खरा मर्दपणा व अमरत्व हीं वाहून जातात, आणि रक्तस्राव होऊन तो चिरंतन मृत्यूच्या आधीन होतो. हें रक्त सध्यां वाहत असल्याचें माझ्या दृष्टोत्पत्तीस येत आहे.

गुन्हेगाराची मालमत्ता जप्त करण्यापेक्षां त्याला तुरुंगवासाची शिक्षा करणें अधिक बरें असें मला विचाराअंतीं वाटतें. वास्तविक ह्या दोन्ही गोष्टी सारख्याच कार्यभाग साधतील. कारण, जे अत्यंत निर्भेळ हक्क बजावतात ते अर्थातच आचारभ्रष्ट सरकारला अत्यंत धोकादायक ठरणारे असतात; आणि म्हणून साहजिकच मालमत्तासंचय करण्याला त्यांना सर्वसाधारणपणें फारसा अवधी मिळतच नसतो. अशांना सरकार तुलनात्मक दृष्ट्या फारच थोडें उपयोगी पडतें. आणि, जेव्हां मुद्दाम स्वतःच्या हातांनीं खपून त्याची कमाई करणें त्यांना भाग पडतें, तेव्हां तर क्षुल्लक करहि भरमसाट भासतो. जर कुणी पैसा बिलकूल न वापरतां राहणारा असेल, तर त्याच्याकडून पैशाची मागणी करण्यास खुद्द सरकारहि कचरेल. परंतु श्रीमंत माणूस—कोणतीहि मत्सरग्रस्त तुलना करण्याचें आपण सोडून देऊं—जी संस्था त्याला श्रीमंत बनवते तिचा नेहमीं अंकित झालेला असतो. निखालस बोलायचें तर असें म्हणतां येईल कीं, ज्याच्याकडे पैसा अधिक त्याच्यापाशीं सद्‌गुण कमी. कारण, मनुष्य व त्याचीं उद्दिष्टें यांच्यामध्यें पैसा आड येत असतो. आणि तोच तीं त्याला साध्य करून देत असतो. असा पैसा कमावण्यास मोठासा सद्‌गुण लागतो असें मुळींच नाहीं.

एरवीं ज्या प्रश्नांचीं उत्तरें देण्याची त्याच्यावर सक्ती झाली असती, ते बरेचसे प्रश्न या पैशामुळें गुलदस्तांत पडून राहतात. मात्र, हा पैसा जो एकच एक नवा प्रश्न निर्माण करतो, तो कठीण पण अनावश्यक असतो. तो म्हणजे–तो पैसा कसा खर्च करावयाचा ? अशा प्रकारें त्याच्या पायांखालचा नैतिक आधारच हिरावला जातो.

ज्याला 'ऐपत' म्हणतात ती ज्या प्रमाणांत वाढते त्या प्रमाणांत जगण्याची संधि कमी कमी होत जाते. म्हणून श्रीमंत असतांना सुसंस्कृतपणा वाढविण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे, स्वतः गरीब असतांना अंगिकारलेल्या योजना कृतींत आणण्याचा प्रयत्न करणें.

माझ्या जास्तींत जास्त स्वतंत्र शेजाऱ्यांशीं जेव्हां मी संभाषण करतों, तेव्हां मला असें आढळून येतें कीं, कांहीं झालें तरी चालू सरकारचें संरक्षण मिळाल्याशिवाय त्यांचें निभावणार नाहीं. एवढेंच नव्हे, तर कायदेभंग केल्यास आपल्या मालमत्तेला व कुटुंबाला त्या गोष्टीची जी झळ पोंचण्याचा संभव आहे, त्या परिणामांना ते घाबरतात. माझ्यापुरतें बोलावयाचें झाल्यास सरकारच्या संरक्षणावर कधींसुद्धां अवलंबून राहण्याचा विचारहि मला शिवायला नको आहे. परंतु, सरकारकडून प्रातिकराची मागणी येते, तेव्हां त्याची सत्ता मी जुमानली नाहीं, तर तें लगेच माझी सर्व मालमत्ता जप्त करील व तिची नासाडी करील. आणि अशाप्रकारें माझा व माझ्या मुलांचा बेसुमार छळ करील. हें खडतर कर्म आहे. यामुळें एखाद्याला प्रामाणिकपणें, त्याचप्रमाणें बाह्यतः आरामशीरपणें जीवन कंठणें अशक्य होऊन बसतें. मालमत्तेचा संचय करण्यांतहि कांहीं अर्थ नाहीं. कारण ती पुन्हा जावयाची हें ठरलेलें. अशा स्थितींत आपण भाड्यानें जागा घ्यावयाची किंवा कुठें तरी बस्तान ठोकायचें, आणि थोडकेंसें पीक काढून तेंहि लौकर खाऊन टाकायचें. अवांतर व्याप न वाढवतां स्वतःपुरता आटोपशीर प्रपंच मांडावयाचा, व स्वावलंबनानें राहून, कोणत्याहि वेळीं निघायच्या दृष्टीनें बंदोबस्त करून नेहमीं तयारी ठेवायची.

सर्व दृष्टींनीं तुर्की सरकारचा उत्तम नागरिक बनल्यास तुर्कस्तानांतहि एखाद्या मनुष्याला श्रीमंत होतां येतें. कन्फ्युसिअसनें म्हटलें आहेः "जर एखाद्या सरकारचा कारभार न्यायबुद्धीनें चालला असेल, तर त्या देशांत दारिद्य व विपत्ति असणें त्या सरकारला लज्जास्पद होय. आणि सरकारचा कारभार जर न्यायबुद्धीनें चाललेला नसेल तर संपत्ति व मानसन्मान ह्या गोष्टी शरमेच्या होत."

सहा वर्षें मी डोईपट्टी भरलेली नाहीं. ह्या कारणासाठीं एकदां मला रात्रभर

तुरुंगांत टाकण्यांत आलें होतें. आणि त्यावेळीं, दोन तीन फूट जाडीच्या भक्कम दगडांच्या त्या भिंती, फूटभर जाडीचा तो लांकडी–लोखंडी दरवाजा, आणि प्रकाश मंदावणारी गजांची जाळी या सर्वांचा विचार करीत राहिलों असतां मला वाटलें : मी म्हणजे केवळ रक्तमांस व हाडांचा बनलेलों आहें अशी समजूत करून घेऊन अशाप्रकारें मला डांबून ठेवणारी ही शासनसंस्था किती मूर्ख आहे !...इतर कोणत्याहि प्रकारें माझा उपयोग करून घेण्यापेक्षां अशाप्रकारें माझी तजवीज करणेंच शेवटीं या शासनसंस्थेला योग्य वाटावें ही केवढी विलक्षण गोष्ट !...मला असें दिसून आलें कीं, मी आणि माझे नगरवासी यांच्यामध्यें केवळ दगडांची एक भिंत उभी आहे; पण माझ्याएवढें स्वतंत्र होण्यासाठीं त्याहूनहि बिकट भिंत त्यांना उल्लंघावी किंवा फोडून काढावी लागेल. मी तुरुंगांत पडलों आहें असें मला क्षणभरहि वाटलें नाहीं. उलट, तुरुंगाच्या भिंती उभारून दगडा-चुन्याची अतिशय नासाडी करण्यांत आली आहे असेंच मला वाटलें. आमच्या नगरांतील सर्व माणसांपैकीं मीच एकट्यानें जणूं काय कर भरला आहे असें मला वाटूं लागलें. मला कसें वागवावें ह्याची त्यांना बिलकूल जाणीव असलेली दिसत नव्हती; तर अर्धवट माणसांसारखे ते वागत होते. त्यांच्या प्रत्येक धमकींत व प्रत्येक खुशामतींत घोडचूक झालेली असे. कारण त्यांची अशी समजूत होती कीं, त्या दगडी भिंतीच्या पलीकडे जाण्याचीच माझी मुख्य इच्छा असेल.

माझें चिंतन चाललेलें असतांना, कुलूप लावून परिश्रमपूर्वक दरवाजा बंद करतांना त्यांना पाहून मला हंसूं कोसळे. त्यानंतरहि माझें चिंतन आपलें अडथळ्याशिवाय खुशाल निश्चिंतपणें चालू राही. आणि हें माझें चिंतनच खरोखरी धोकेबाज होतें. त्यांना माझ्यापर्यंत पोंचतां येत नव्हतें, म्हणून माझ्या देहाला शासन करण्याचा निश्चय त्यांनीं केला होता. मुलें जशीं, ज्याच्याबद्दल मत्सर वाटत असेल त्याच्यासन्निध जातां येत नसल्यास त्याच्या कुत्र्यालाच शिव्या देतात, तशी यांची स्थिति. सरकार अर्धशहाणें, आपल्यापाशीं असलेले चांदीचे चमचे सांभाळूं पाहणाऱ्या एकटेल्या स्त्रीसारखें भित्रें, शत्रु कोण व मित्र कोण हें ओळखूं न शकणारें असें असल्याचें माझ्या प्रत्ययाला आलें. आणि म्हणून त्याजबद्दलचा माझा उरलासुरला आदर पार नाहींसा झाला;—उलट मला त्याची कींव वाटूं लागली.

अशाप्रकारें, सरकार मनुष्याच्या बौद्धिक किंवा नैतिक अक्कलेशीं कधींहि बुद्धि-पुरस्सर सामना देत नाहीं. तर केवळ त्याचा देह, त्याचीं इंद्रियें यांच्याशींच देतें.

उच्च प्रकारचा शहाणपणा किंवा प्रामाणिकपणा यांचें बळ त्याच्यापाशीं नाहीं; बाह्य सामर्थ्याच्या दृष्टीनें मात्र तें प्रबळ आहे. सक्ती करून घेण्यासाठीं कांहीं मी जन्मलेला नव्हतों. माझ्या स्वतःच्या पद्धतीप्रमाणें मी श्वासोच्छ्वास करीन. सर्वांत सामर्थ्यवान कोण आहे तें तरी पाहूं. माझ्यापेक्षां उच्च कायदा जे मानतात तेच फक्त माझ्यावर सक्ती करूं शकतील. आपल्यासारखें बनविण्यासाठीं हे माझ्यावर सक्ती करूं पाहतात. **माणसांनीं** या-ना-त्या प्रकारानें जीवन कंठावें अशी **सक्ती** लोकांच्या समुदायानें त्यांच्यावर केल्याचें मी ऐकलेलें नाहीं. असें (सक्तीचें) जीवन कंठायचें म्हणजे......!...

जेव्हां एखादें सरकार मला म्हणतें: 'तुमचा पैसा स्वाधीन करा, नाहींतर तुमचें जीवन,' तेव्हां माझा पैसा त्याला देण्याची घाई मी कां म्हणून करूं? तें कदाचित् मोठ्या अडचणींत सांपडलें असेल आणि काय करावें हें त्याला सुचत नसेल. पण त्याला मी काय करूं? त्यानेंच स्वतः त्यांतून मार्ग काढला पाहिजे; मी करतों तसें करा कीं. उगाच त्याबद्दल धुसफूस करून कांहींहि साधणार नाहीं. समाजाची यंत्रणा सुरळित चालवण्याची जोखीम कांहीं माझ्यावर नाहीं. मी कांहीं तशा प्रकारच्या एंजिनिअरचा मुलगा नाहीं. ओक झाडाचें फळ व चेस्टनटचें फळ अशीं दोन्ही शेजारीं शेजारीं पडलीं, तर दुसऱ्याला वाट करून देण्यासाठीं त्यांपैकीं एक आपला अंकुर आवरून धरतें असें नाहीं. तर दोन्ही आपापल्या स्वभावानुसार—निसर्गनियमांनुसार अंकुर धरून पालवतात, वाढतात आणि, प्रसंगीं एक दुसऱ्याला बाजूला डावलून त्याच्यावर मात करीपर्यंत शक्य तेवढीं फोफावतात. जर एखाद्या रोपट्याला त्याच्या स्वभावानुसार जगतां आलें नाहीं तर तें मरतें; तीच गत माणसाची.

तुरुंगांतली रात्र विलक्षण व मोठी मनोरंजक होती. मी तुरुंगांत प्रथम प्रवेश केला, तेव्हां इतर कैदी सदरे घालून दरवाजांतच सायंकाळची हवा खात मजेंत गप्पा मारीत होते. परंतु तेवढ्यांत जेलर म्हणाला, "हां, चला मंडळीं, कड्याकुलपें लावण्याची वेळ झाली." त्याबरोबर ते कैदी पांगले. बाजूच्या रिकाम्या खोल्यांत परत जातांनाची त्यांची चाहूल मला ऐकूं आली. मग माझ्या खोलींतील सहकाऱ्याचा माझ्याशीं परिचय करून देण्यांत आला. त्यावेळीं "हा प्रथम दर्जाचा व हुषार माणूस आहे," असें जेलर त्याच्याबद्दल मला म्हणाला. दरवाजाला कुलुप लावून जेलर गेल्यावर, हॅट कुठें लावायची हें त्यानें मला दाखवलें आणि आपण तिथें एकंदरींत कसे काय राहतों हेंहि सांगितलें. महिन्यांतून एकदां त्या खोल्यांना रंगसफेती करण्यांत येई. ही

खोली तरी अत्यंत शुभ्र असून अत्यंत साध्या पद्धतीच्या सामानसुमानानें सजव-लेली होती. शहरांतील ही सर्वांत नीटनेटकी खोली असावी. तिथें मी कुठून व कां आलों हें साहजिकच जाणून घेण्याची त्याची इच्छा होती. माझी हकीगत सांगितल्यावर, तो प्रामाणिक माणूस असल्याचें अर्थातच गृहीत धरून, मी त्याचीहि हकीगत विचारली. जगरहाटीला अनुसरून तो प्रामाणिकहि दिसला. तो म्हणाला: " अहो, काय सांगावं...! धान्याचं कोठार जाळल्याचा माझ्यावर त्यांचा आरोप आहे. पण मी तें मुळीं जाळलंच नाहीं. "

त्याच्या म्हणण्यावरून मी एकंदरींत असा तर्क लढवला कीं, दारूच्या नशेंत एखाद्या धान्यकोठारांत हा जाऊन झोंपला असेल आणि तिथें यानें आपला पाइप शिलगावून ओढला असेल. त्यामुळें साहजिकच त्या कोठाराला आग लागून तें जळालें असेल. हुशार व बुद्धिमान म्हटला जाणारा हा माणूस आपला खटला सुरू होण्याची तीन महिने वाट पहात होता. आणि कदाचित् आणखी तेवढाच अवधी त्याला थांबावें लागणार असेल. परंतु तो आतां तेथें चांगलाच रुळला होता व प्राप्त स्थितींत समाधान मानूं लागला होता. कारण, कांहींहि कारण नसतांना तिथें राहण्याची त्याच्यावर पाळी आली होती. शिवाय, आपल्याला चांगली वागणूक मिळत असल्याचा त्याचा समज होता.

त्याने एक खिडकी पटकावली होती आणि मी दुसरी. आणि मला असें आढळून आलें कीं, तेथें कुणाला बराच काळ रहावें लागलें तर त्या खिडकीबाहेर पहात बसणें हाच त्याचा मुख्य उद्योग होऊन बसेल तिथें राहून गेलेले छोटे छोटे सर्व धर्मग्रंथ मी लौकरच वाचून काढले. एवढेंच नाहीं, तर पूर्वीचे कांहीं कैदी कुठून कसे फरारी झाले, गजांची जाळी कुठेंकुठें कशी काय कापून काढण्यांत आली ह्याची मी तपासणी केली, आणि त्या खोलींत राहून गेलेल्या निरनिराळ्या लोकांचा इतिहासहि ऐकला. कारण, मला असें आढळून आलें कीं, तुरुंगाच्या भिंतींबाहेर प्रसृत न झालेला इतिहास व गप्पाष्टकें यांचा प्रादुर्भाव इथेंहि होता. जिथें रचण्यांत आलेल्या कविता मागाहून पत्रकाच्या स्वरूपांत छापल्या जातात, पण प्रसिद्ध केल्या जात नाहीत असें सबंध शहरांतील हें बहुधा एकच ठिकाण असावें. कांहीं तरुण कैद्यांचे पळून जाण्याचे प्रयत्न उघडकीस आल्यावर त्यांनीं रचलेल्या कवितांची एक लांबलचक यादी मला दाखविण्यांत आली. ह्या कविता गाऊन जणूं कांहीं त्यांनीं सूड उगवून घेतला.

माझ्या त्या सहकारी कैद्याकडून त्या रात्रीं शक्य ती सर्व माहिती मी काढून घेतली. हो, पुन्हा कदाचित् त्याची भेटहि झाली नसती. परंतु अखेरीला त्यानें

माझा बिछाना मला दाखवून दिला आणि दिवा विझवण्याची कामगिरी माझ्यावर सोपवून शेवटीं तो झोपीं गेला.

रात्रभर तेथें पडून राहायचें म्हणजे दूरवरच्या एखाद्या देशांत प्रवास करण्यासारखें होतें. अशाप्रकारचा अनुभव कधीं येईल याची मला बिलकूल कल्पना नव्हती. नगरातील मोठाल्या घड्याळाचे ठोके, जणूं कांहीं मीं पूर्वीं कधीं ऐकले नव्हते असे मला जाणवले. तीच गोष्ट गांवांतील संध्याकाळच्या विविध आवाजांची. कारण गजांच्या जाळीच्या आंत असलेल्या खिडक्या उघड्या ठेवून आम्ही झोंपलों होतों. मध्ययुगीन पार्श्वभूमीवर जसें कांहीं माझ्या जन्मगांवाचें दर्शन मला होत होतें. जवळच असलेल्या गांवच्या खानावळींतील स्वयंपाकघरांत जें जें कांहीं घडत होतें व बोललें जात होतें, त्याचा मी निर्हेतुक असा अप्रत्यक्ष प्रेक्षक व श्रोता बनलों होतों. हा अनुभव मला सर्वस्वी नवा, दुर्मिळ असा होता. माझ्या गांवचें तें निकट दर्शन होतें. त्याच्या अंतर्भागांत मी बराचसा शिरलों होतों. गांवच्या संस्था पूर्वीं मी कधींहि पाहिल्या नव्हत्या. ही त्यांपैकींच एक वैशिष्ट्यपूर्ण संस्था. कारण तें एक परगण्याचें गांव होतें. या गांवचे रहिवाशी कसे काय असतील याबद्दल मी तर्क लढवूं लागलों.

सकाळीं, दरवाजाला ठेवण्यांत आलेल्या ठराविक भोंकांतून आम्हांला न्याहारी देण्यांत आली. त्या भोंकांतून आंत जाऊं शकतील अशा लांबट चौकोनी, टीनच्या छोट्या तबकड्यांतून पाव आणि पींटभर चॉकोलेट पेय, व सोबत लोखंडी चमचा असा एकंदर थाट होता. तीं भांडीं परत मागण्यांत आलीं, तेव्हां नवशिकेपणामुळें उरलेला पावाचा तुकडा मी तत्परतेनें परत करूं लागलों. परंतु माझ्या सहकाऱ्यानें तो हिसकावून घेतला. तो म्हणाला कीं, दुपारच्या किंवा रात्रीच्या जेवणासाठीं मी तो ठेवून द्यावा. त्यानंतर लौकरच नजीकच्या एका शेतांत गवत वाळविण्याच्या कामगिरीवर त्याला नेण्यांत आलें. (असा तो रोज जायचा व दुपारपर्यंत काम करीत राहायचा.) म्हणून जातांना त्यानें माझा निरोप घेतला. 'पुन्हा आपण भेटूं शकूं कीं नाहीं कुणास ठाऊक' असें तो म्हणाला.

कुणीतरी मध्यें पडून माझ्या वांट्याचा कर भरला म्हणून माझी लौकरच सुटका झाली. तुरुंगाबाहेर पडलों, तेव्हां, तरुणपणीं तुरुंगांत जाऊन केस पिकल्यावर लटपटत्या पायांनीं बाहेर पडणाऱ्या कैद्याप्रमाणें बाहेरच्या जगांत फार मोठे फेरबदल घडून आलेले कांहीं मला दिसले नाहींत. आणि तरीसुद्धां, कालप्रवाहाचा वस्तुतः जेवढा प्रभाव पडूं शकेल त्याहून कितीतरी मोठा बदल त्या शहरांत, सरकारांत व देशांत घडून आल्याचें माझ्या दृष्टोत्पत्तीस आलें. ज्या राज्यांत मी रहात

होतों तें आतां मला अधिक स्पष्टपणें प्रतीत होऊं लागलें. ज्या लोकांत मी रहात होतों ते लोक, चांगले शेजारी व स्नेही म्हणून कितपत विश्वासू आहेत तें माझ्या निदर्शनास आलें. त्यांची मैत्री ही केवळ भल्या दिवसापुरती आहे; योग्य तीच गोष्ट करावी याकडे त्यांची फारशी प्रवृत्ति नाहीं; त्याचे पूर्वग्रह व धर्मभोळेपणा यांमुळें चिनी व मलायी लोकांप्रमाणें, माझ्यापेक्षां त्यांचा वंश जणूं काय साफ वेगळा आहे. मानवजातीसाठीं त्याग करण्याच्या बाबतींतच काय, पण आपल्या मालमत्तेसाठींसुद्धां त्यांना धोका पत्करायचा नसतो. एकंदरींत ते तितकेसे कांही थोर मनाचे लोक नाहींत. तर, चोर त्यांच्याशीं जसा वागेल तसें ते त्याच्याशीं वागतील. आणि विशिष्ट बाह्य निरीक्षण करून, अधूनमधून प्रार्थना करून आणि निरर्थक पण विवक्षित धोपट मार्ग वेळोवेळीं आक्रमत राहून ते आपल्या आत्म्याचें रक्षण करूं इच्छितात. माझ्या शेजाऱ्यांची ही एकप्रकारें कठोर चिकित्सा ठरेल. कारण, आपल्या गांवीं तुरुंगासारखी संस्था आहे ह्याची जाणीव त्यांच्यापैकीं बऱ्याचजणांना नसावी असा माझा कयास आहे.

पूर्वीं आमच्या गांवीं अशी प्रथा होती कीं, एखादा गरीब ऋणको तुरुंगांतून बाहेर पडला कीं त्याची ओळखीची मंडळी, तुरुंगाच्या खिडकीच्या, गजांच्या जाळीसारख्या भासणाऱ्या हातांच्या आडव्या-उभ्या बोटांच्या फटींतून पहात, "कसं काय, ठीक आहे ना?" असें विचारून त्याचें स्वागत करीत असे. माझ्या शेजाऱ्यांनीं कांहीं अशाप्रकारें माझें स्वागत केलें नाहीं. तर, जणूं कांहीं एखाद्या लांबच्या प्रवासाहून मी परतल्यासारखें प्रथम त्यांनीं माझ्याकडे पाहिलें, व मग एकमेकांकडे. नीट करून ठेवलेला बूट आणण्यासाठीं मोच्याकडे जात असतांना मला तुरुंगांत नेऊन ठेवण्यांत आलें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं मला तुरुंगाबाहेर सोडण्यांत आलें, तेव्हां तो दुरुस्त करून ठेवलेला बूट पुन्हा पायांत चढवून मी जणूं कांहीं माझा उरलेला छोटासा प्रवास पुरा केला.

हा झाला 'माझ्या तुरुंगवासा'चा एकंदर इतिहास.

हमरस्ता-कर भरण्यास मी कधींहि नकार दिलेला नाहीं. कारण, वाईट नागरिक बनण्याची जशी माझी इच्छा आहे, तशीच चांगला शेजारी बनण्याचीहि आहे. आणि शाळांना आश्रय देण्याचा प्रश्न घेतला, तर माझ्या देशबांधवांना शिक्षण देण्याचें माझ्यापुरतें कार्य मी सध्यां करीत आहें. प्रातिकराचें अमुक एक कलम मला मान्य नाहीं म्हणून तो देण्याचें मी नाकारतों असें नाहीं. तर, सरकारबद्दल निष्ठा म्हणून दाखवायची नाहीं आणि त्याच्यापासून, प्रभावीपणानें अंग काढून घेऊन अलग रहावयाचें अशीच मुळीं माझी इच्छा आहे. डॉलर

तसा निष्पाप असतो. परंतु माझ्या डॉलरचा उपयोग काय केला जातो—म्हणजेच माझ्या राजनिष्ठेचे परिणाम काय होतात याचा मागोवा घेणें माझें काम आहे. एरव्हीं, एखादा माणूस किंवा गोळी घालण्यासाठीं एखादी बंदूक खरीदण्यासाठीं माझ्या डॉलरचा उपयोग केला जाईपर्यंत माझ्या डॉलरच्या मार्गाचा मागोवा घेण्याची फार करून मी पर्वा बाळगीत नाहीं. खरें म्हणजे माझ्या पद्धतीनुसार सरकारशीं मी शांतपणें युद्ध पुकारीत असतों. मात्र, एवढें असूनहि त्याचा जो कांहीं उपयोग किंवा फायदा करून घेतां येईल तो मी अजूनहि जरूर करून घेईन. कारण अशा बाबतींत ती गोष्ट साहजिकच आहे.

माझ्याकडून मागणी करण्यांत आलेला कर, सरकारबद्दल सहानुभूति वाटून कुणी भरला, तर पूर्वी स्वतःच्या बाबतींत तसें ते वागले तशीच त्याची ही कृति ठरते. किंवा, खरें म्हणजे, अशा प्रकारें सरकारला अभिप्रेत असेल त्याहून जास्त प्रमाणांत, अन्यायाला ते उत्तेजन देत असतात, असें म्हटलें पाहिजे. ज्या व्यक्तीवर कर लादलेला असतो तिच्याबद्दलच्या चुकीच्या कळकळीच्या भावनेनें—तिची मालमत्ता वांचवावी किंवा तिचा तुरुंगवास चुकवावा म्हणून ही मंडळी त्या व्यक्तीचा कर स्वतः भरत असेल, तर असें म्हणावें लागेल कीं, सार्वजनिक हिताच्या बाबतींत आपल्या खाजगी भावना कितपत ढवळाढवळ करीत आहेत याचा त्यांनीं शहाणपणानें विचार केलेला नाहीं.

एकंदरींत, सध्यां माझी भूमिका ही अशी आहे. परंतु अशा प्रकरणांत जादा सावध राहणें कुणाला शक्य नसतें. हो, न जाणों, दुराग्रहीपणानें किंवा मनुष्यांच्या मतांना फाजील मान दिल्यानें त्याच्या कृतीला अनिष्ट कलाटणीहि मिळेल. स्वतःच्या म्हणून असतील तेवढ्या गोष्टी प्रसंगपरत्वें करण्याची दक्षता मात्र त्यानें घ्यावी.

कधीं कधीं मला वाटतें: "कांहीं कां असेना, ह्या लोकांचा उद्देश चांगला असतो;—ते अज्ञानी असतात एवढेंच. त्यांना योग्य तें ज्ञान झालें, तर त्यांच्या हातून अधिक चांगली कृति होईल. त्यांच्या मनांत नसलेली वागणूक तुम्हांला द्यायला लावून तुमच्या शेजाऱ्यांना तुम्ही दुःख कां देतां?" परंतु पुन्हा माझ्या मनांत विचार येतो: "तरीपण, त्यांच्याप्रमाणें मी कृति कां करावी—किंवा इतरांना निराळ्या प्रकारचें दुःख, कितीतरी जास्त प्रमाणांत मी कां सोसू द्यावें—ह्याचें स्पष्टीकरण त्यावरून होत नाहीं."

कुणाहि मनुष्याबरोबर किंवा राष्ट्राबरोबर भांडायची माझी इच्छा नाहीं. त्याचप्रमाणें, उगाच नस्ती चिरफाड करून सूक्ष्म भेदाभेद करण्याची किंवा

माझ्या शेजाऱ्यांहून मला वरचढ ठरविण्याचीहि माझी इच्छा नाहीं. खरें म्हणजे, मला असेंहि म्हणतां येईल कीं, देशाच्या कायद्यांशीं जुळवून घेण्यासाठीं मी जशी कांहीं सबबच शोधतोंय्. त्यांच्याशीं जुळवून घ्यायला तसा मी एका पायावर तयार आहें. मात्र हेंहि खरें कीं, या बाबतींत माझी मलाच शंका घेण्यास सबळ कारण आहे. आणि दर वर्षी जेव्हां कर वसूल करणारा माझ्याकडे येतो, तेव्हां देशाच्या सरकारचीं तसेंच राज्य सरकारांचीं कृत्यें व त्यांची भूमिका, आणि त्यांच्याशीं जुळवून घेण्यासाठीं कांहींतरी सबब शोधून काढणाऱ्या जनतेची मनोवृत्ति यांचें परीक्षण करण्याकडे माझी प्रवृत्ति होते. माझी अशी समजूत आहे कीं, अशाप्रकारचें माझें सर्व कार्य सरकार लौकरच माझ्या हातून काढून घ्यायला समर्थ होईल. आणि मग माझ्या इतर देशबांधवांपेक्षां मी कांहीं विशेष चांगला देशभक्त ठरणार नाहीं. खालच्या दृष्टिकोनांतून पाहिलें तर घटना, सदोष असली तरी, फार चांगली आहे; कायदा व न्यायालयेंहि फार आदरणीय आहेत. फार काय, हें राज्य व हें अमेरिकन सरकार हीं बऱ्याच बाबतींत, कित्येक बड्या मंडळींनीं वर्णन केल्याप्रमाणें कृतज्ञता वाटावी एवढीं उत्कृष्ट व दुर्मिळहि वाटतील. परंतु थोड्याशा उच्च दृष्टिकोनांतून पाहिलें तर मी वर्णन केल्याप्रमाणें तीं दिसतील. त्याहूनहि उच्चतर व उच्चतम दृष्टिकोनांतून पाहिलें तर, त्या काय चिजा आहेत, किंवा त्या पाहण्यालायक किंवा विचार करण्यालायक कितपत आहेत हें कुणी काय सांगावें ?...

एवींतेवीं ह्या सरकारशीं मला फारसें कांहीं कर्तव्य नाहीं म्हणा; म्हणून शक्य तेवढे कमी विचारच मी त्याला 'समर्पण' करीन. ह्या जगातहि, सरकारच्या अधिकाराखालीं असा मी फारसे क्षण कांही रहात नाहीं. मनुष्य जर विचारमुक्त, लहरमुक्त व कल्पनामुक्त असेल, **नसलेली गोष्ट** कधींहि फार काळ त्याला **असल्यासारखी** वाटत नसेल, तर असमंजस सत्ताधारी किंवा सुधारक त्याच्यावर प्राणघातक आघात करूं शकत नाहींत.

बहुतेक लोक माझ्याहून निराळ्या विचाराचे आहेत ह्याची मला जाणीव आहे. परंतु पेशानें ह्या किंवा अशाच प्रकारच्या विषयांच्या अभ्यासाला ज्यांचें जीवन वाहिलेलें आहे, ते माझें समाधान फारसें करीत नाहींत. मुत्सद्दी व आमदार-खासदार ही मंडळी जवळजवळ पूर्णपणें राज्यसंस्थेमधीलच असल्यानें स्पष्टपणें व उघड्यानागड्या स्वरूपांत त्यांना ती कधींहि पाहतां येत नाहीं. बदलत्या समाजाबद्दल ते बोलत असतात, परंतु त्याशिवाय त्यांना दुसरें विरंगुळ्याचें साधनच नसतें. विशिष्ट अनुभव व तारतम्यभाव त्यांना असेल; आणि त्यांनीं

कल्पकतापूर्ण, एवढेंच नव्हे तर उपयुक्त पद्धती शोधून काढल्या आहेत यांतहि शंका नाहीं. यासाठीं आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभारहि मानतों. परंतु त्यांचें सर्व शहाणपण व उपयुक्तता अत्यंत मर्यादित. जगाचा अंमल कांहीं, धोरण व कार्योपयुक्तता यांनीं चालत नसतो ह्या गोष्टीचा त्यांना विसर पडण्याचा संभव असतो. वेब्स्टर* सरकारांत कधींहि सामील होत नाहीं. आणि म्हणून त्याच्या-बद्दल त्याला अधिकारवाणीनें बोलतां येणार नाहीं. सध्यांच्या सरकारांत आवश्यक सुधारणा व्हावी असें ज्यांना वाटत नाहीं, अशा आमदार-खासदारांना त्याचें म्हणणें शहाणपणाचें वाटेल. परंतु विचारवंतांच्या व सार्वकालीन कायदे करणा-ऱ्यांच्या दृष्टीनें पाहिल्यास त्याला विषयाचें नीट आकलन झालेलें कधींहि दिसून येत नाहीं. मला अशीं कांहीं माणसें माहीत आहेत कीं, या विषयावरील त्यांचे संथ व चतुर विचार त्याच्या मनाच्या पल्ल्याच्या व आदरातिथ्यशीलतेच्या मर्यादा लौकरच दृष्टोत्पत्तीस आणून देतील. तथापि, बहुतेक सुधारकांचा माफक पेशा, आणि एकंदर राजकारणी लोकांचा त्याहूनहि माफक शहाणपणा व शब्दचातुर्य यांच्याशीं तुलना केली असतां, त्याचे एकट्याचे शब्द तेवढे सुज्ञपणाचे व मूल्यवान वाटतात. आणि, त्यासाठीं आम्ही त्या जगन्नि-यंत्याचे ऋणीहि आहोंत. तुलनात्मक दृष्टीनें पहातां—तो नेहमीं सामर्थ्यशील, कल्पक, आणि विशेष म्हणजे व्यवहारी दृष्टीचा असल्याचें दिसून येतें. एवढें असूनहि, चातुर्य हा त्याचा गुण नसून सारासार विचार हा आहे. कायदेपंडिताचें सत्य हें खऱ्या अर्थानें सत्य नसतें. तर ती एक—प्रकारची सुसंगतता किंवा सुसंगत अशी कार्योपयुक्तता असते. सत्य हें नेहमीं स्वतःशीं सुसंवादी असतें;—गैरकृत्याशीं गोंवलेला न्याय स्पष्ट करण्याशीं त्याला विशेष असें कांहीं कर्तव्य असतें असें नाहीं. घटनेचा त्राता असें जें त्याला म्हटलें जातें त्या मानाला मात्र तो खरोखरीच पात्र आहे. केवळ प्रतिकारादाखल काय ते ठोसे तो लगावील तेवढेच. एरव्हीं नाहीं. तो नेता नसून अनुयायी आहे. त्याचे नेते म्हणजे '८७ सालचीं माणसें. तो म्हणतोः "निरनिराळीं राज्यें प्रथमतः ज्या व्यवस्थेमुळें एका संघराज्यांत एकत्र झालीं त्या व्यवस्थेला धक्का देण्याचा मी कधींहि प्रयत्न म्हणून केला नाहीं; आणि यापुढें कधीं तसा करायचाहि माझा

* डॅनिएल वेब्स्टर (१७८२–१८५२) : प्रमुख घटनातज्ज्ञ, कायदेपंडित व वक्ता. हा व्हिग पक्षाच्या प्रमुख सदस्यांपैकीं होता व 'अमेरिकेच्या घटनेचें कडवें समर्थन करणारा' म्हणून विख्यात होता.

विचार नाहीं. एवढेंच काय, पण तशा प्रयत्नाला मी कधींहि उत्तेजन दिलेलें नाहीं, कीं, यापुढें कधीं उत्तेजन देण्याचा माझा मानसहि नाहीं."

घटनेनें गुलामगिरीला दिलेल्या मंजुरीबद्दल विचार करतांना तो म्हणतो : "मूळ घटनेंतील रचनेचा तो एक भाग असल्यानें तो तसाच राहूं दे...ज्या राज्यांत गुलामगिरी अस्तित्वांत आहे, तिची पद्धत त्या राज्यांतील सरकारांनीं स्वतः विचार करून, घटकावयवांबद्दलच्या जबाबदारीला जागून, औचित्य, मानवता, व न्याय यांना अनुसरून आणि परमेश्वराला स्मरून ठरवून घ्यावयाची आहे. मानवतेच्या भावनेनें प्रेरित होऊन किंवा इतर कोणत्याहि कारणानें इतरत्र स्थापन झालेल्या संस्थांना त्याच्याशीं कांहींहि कर्तव्य नाहीं. त्यांना मीं कधींहि कोणत्याहि प्रकारें उत्तेजन दिलेलें नाहीं, कीं कधीं देणारहि नाहीं."

कायदेकानूविषयक अलौकिक बुद्धिमत्ता असलेला मनुष्य अमेरिकेंत अजून दृष्टोत्पत्तीस आलेला नाहीं. जगाच्या इतिहासांतच मुळीं असलीं माणसें दुर्मिळ असतात. वक्ते, राजकारणी, व्याख्याते सहस्रावधि आहेत. परंतु, आजकाल त्रस्त करून सोडणारे प्रश्न मिटविण्यास कोण समर्थ आहे हें सांगण्यासाठीं एकाहि वक्त्यानें अजून आपलें तोंड उघडलेलें नाहीं. आपणाला वक्तृत्वासाठीं वक्तृत्व आवडतें,—त्यांतून एकादे वेळीं कोणतें तरी सत्य बाहेर पडतें किंवा तें वीरश्रीला स्फूर्ति देतें म्हणून नव्हे. खुला व्यापार, आणि संघटनेचें व राष्ट्राशीं नीतीमत्तेनें वागायचें स्वातंत्र्य यांचें तौलनिक मूल्य आपल्या कायदेमंडळातील सदस्यांना अजून उमगलेलें नाहीं. करआकारणी, अर्थव्यवस्था, व्यापार, उत्पादन व शेती यांजबद्दलचे एकंदरींत माफक प्रश्न सोडविण्यासाठीं लागणारी प्रतिभा वा बुद्धिमत्ता त्यांच्यांत नाहीं.

कदाचित् मला बोलण्याचा हक्क पोंचत नसेल, पण विचारतों : न्यू टेस्टॅमेन्ट (नवा करार) लिहिल्याला आज अठराशें वर्षें होऊन गेलीं. पण ह्या एवढ्या कालावधींत, कायदेशास्त्रावर त्यानें टाकलेल्या प्रकाशाचा लाभ घेण्याची कुवत असलेला, शहाणा व व्यवहारचतुर कायदेपंडित अद्याप कुठें निर्माण झाला आहे काय ?

जें सरकार मी मानायला तयार आहें—हो, ज्यांना माझ्याहून अधिक ज्ञान आहे व जे माझ्याहून अधिक चांगलें कार्य करूं शकतात; एवढेंच काय, पण अनेक बाबतींत ज्यांना तेवढेंसें ज्ञान नाहीं, कीं तेवढें चांगलें कार्यहि करतां येत नाहीं अशांची आज्ञा मी आनंदानें पाळीन—तर, अशा सरकारचा अधिकारहि अशुद्ध स्वरूपाचा असतो. अगदीं काटेतोल बोलायचें म्हणजे त्याला शासित

लोकांची मंजुरी व संमति आवश्यक आहे. त्याला जेवढें कांहीं मीं सोडून दिलेलें असतें, त्याखेरीज माझा देह व माझी मालमत्ता यांजवर त्याचा कसलाहि विशुद्ध हक्क पोंचत नाहीं. निरंकुश राजेशाहीपासून मर्यादित राजेशाहीपर्यंत, आणि मर्यादित राजेशाहीपासून लोकशाहीपर्यंतची प्रगति ही व्यक्तीचा योग्य आदर राखणारी प्रगति आहे. चिनी तत्त्ववेत्तासुद्धां व्यक्ति हा साम्राज्याचा पाया आहे असें मानण्याइतका शहाणा होता. जी लोकशाही आपल्याला माहीत आहे, ती, राज्यशासनांतील अंतिम स्वरूपाची सुधारणा ठरेल काय? मनुष्याचे हक्क मान्य करून ते सुसंघटित करण्याच्या दृष्टीनें पुढचें पाऊल टाकणें शक्य नाहीं काय? ज्या व्यक्तीपासून सरकारला त्याची सर्व सत्ता व अधिकार प्राप्त होतात, ती व्यक्ति ही एक अधिक उच्च व स्वतंत्र सत्ता आहे असें सरकार मानीपर्यंत व तसें तिला वागवीपर्यंत तें सरकार खरेंखुरें मुक्त व ज्ञानसंपन्न होणार नाहीं. सर्व मनुष्यांशीं न्यायानें वागून व्यक्तीला शेजाऱ्याप्रमाणें आदरानें वागविणें ज्याला परवडेल अशा सरकारची अखेर कल्पना तेवढी करून त्यांतच मी समाधान मानतों. सरकारच्या कार्यांत हस्तक्षेप न करणारे किंवा त्याच्या मिठींत समाविष्ट न होणारे जे कांहीं थोडे लोक शेजारधर्म व देशबांधवांबद्दलचें सर्व कांहीं कर्तव्य पाळतात, ते सरकारपासून अलिप्त राहूं लागले तरी, अशा प्रकारचें सरकार ती गोष्टहि आपल्या स्वास्थ्याशीं विसंगत मानणार नाहीं. एखाद्या सरकारला अशा प्रकारचें फळ आलें, आणि ज्या द्रुतगतीनें तें पक्व झालें त्याच वेगानें तें गळून पडूं देण्याची कळ त्यानें सोसली, तर त्याहूनहि अधिक परिपूर्ण व तेजस्वी सरकार अस्तित्वांत येण्याचा मार्ग सुकर होईल. अर्थात् हेंहि मीं माझ्या कल्पनेंतच पाहिलें आहे; अद्याप कुठेंहि प्रत्यक्षांत मला तें दिसलेलें नाहीं.

# मी कुठें आणि कशासाठीं राहिलों ?*

आपल्या जीवनाच्या विशिष्ट मोसमांत प्रत्येक ठिकाण घर बांधायला अनुरूप आहे असें वाटण्याकडे आपल्या मनाची प्रवृत्ति असते. अशाच काळांत, मी जेथें राहातों त्या ठिकाणापासून बारा मैलांच्या परिसरांतील सबंध टापूची अशाप्रकारें मीं पाहणी केली आहे. माझ्या कल्पनासाम्राज्यांत ह्या सर्व शेतवाड्या मी एकापाठोपाठ एक अशा खरीदल्या आहेत; कारण मला त्या सर्वच खरीदायच्या होत्या, आणि त्यांची किंमतहि मला ठाऊक होती. प्रत्येक शेतकऱ्याच्या वाड्यावर मी गेलों, त्याचीं रानवट सफरचंदें चाखलीं, शेतीविषयीं त्याच्याशीं संभाषण केलें, त्यानें सांगितलेल्या—कोणत्याहि किंमतीला त्याचें शेत घेतलें, व मनांतल्या मनांत त्याच्यापाशींच तें गहाणहि टाकलें. जास्त किंमतहि देऊं केली. करारपट्टा करून घेतला नाहीं एवढेंच. बाकी सर्व झालें. करारादाखल त्याचा शब्द मानला (हो, कारण मला बोलायला फार आवडतें.)—त्या जमिनीची मशागत केली, आणि मला वाटतें, थोडीफार त्याचीहि. बराच काळपर्यंत तिचा उपभोग घेतल्यावर मग त्याच्यापाशींच ती राहूं दिली. ह्या अनुभवामुळें माझी स्नेही मंडळी मला एक प्रकारचा खरोखरीचा इस्टेट दलाल म्हणून मानूं लागली. जिथेंजिथें म्हणून मीं बैठक मारली तिथेंतिथें जणूं मी राहणार होतों; आणि सृष्टीचा तो देखावाहि माझ्याकडून परावर्तित झालेला तोच भाव व्यक्त करीत होता. घर म्हणजे तरी बैठकीशिवाय दुसरें काय आहे ?—ग्रामीण भागांतील बैठक विशेष चांगली. घर बांधायच्या बऱ्याचशा जागा लौकर सुधारतां येण्यासारख्या नाहींत असें मला आढळून आलें. कांहीं जणांना त्या गांवापासून खूपच लांब वाटल्या असत्या; तर माझ्या दृष्टीला तें गांवच फार दूर वाटत होतें. 'ठीक, तिथं मला राहतां येईल,' मी म्हणालों. आणि तेथें मी राहिलोहि,

* वॉल्डन (१८५४) या ग्रंथाच्या पहिल्या आवृत्तींतील दुसरें प्रकरण.

—तासभर, उन्हाळ्यांतील व हिंवाळ्यांतील जीवनाचा उपभोग घेतला; वर्षे कशीं झरझर निमटून गेलीं हें पाहिलें; हिंवाळ्याचे आघात सोसले व वसंतऋतूचें आगमनहि पाहून घेतलें....

माझ्या कल्पनाशक्तीची मजल एवढ्यापर्यंत गेली कीं, कित्येक शेतवाड्यांबद्दल मला नकारहि मिळाला;—मला तरी नकारच पाहिजे होता म्हणा; पण प्रत्यक्ष ताबा घेऊन मीं माझे हात कधीं पोळून घेतले नाहींत. हॉलोवेल ठिकाण मीं खरीदलें, तेव्हां मात्र मी त्याचा जवळजवळ प्रत्यक्ष ताबा घेण्याच्या बेतांत होतों. बियाणें निवडण्याला मीं सुरुवात केली होती; आणि तें शेतावर नेण्यासाठीं एकचाकी हातगाडी बनविण्यासाठीं सामुग्रीहि जमविली होती. परंतु त्या जमिनीचें करारपत्र मालकानें देण्यापूर्वी त्याच्या बायकोनें-प्रत्येक मनुष्याची बायको अशीच असते म्हणा—बेत बदलला. ती शेतवाडी आपल्यापाशींच ठेवावी असें तिला वाटलें. आणि म्हणून त्या करारांतून मुक्त करण्यासाठीं त्यानें मला दहा डॉलर्स देऊं केले. आतां, खरें सांगायचें तर, माझ्यापाशीं अवघे दहा सेंट्स् काय ते शिल्लक उरले होते. आणि तो दहा सेंट्स् असलेला, किंवा शेतीवाडी असलेला, किंवा दहा डॉलर्स असलेला, किंवा या सर्व गोष्टी असलेला मनुष्य मीच होतों किंवा काय हें सांगणें माझ्या गणिताच्या आवांक्याबाहेरचें आहे. तथापि ते दहा डॉलर्स व ती शेतवाडीहि मीं त्याच्याकडे राहूं दिली. कारण मीं तें प्रकरण खूप ताणलें होतें. किंवा खरें म्हणजे, औदार्यानें असें म्हणतां येईल कीं, खरीदलेल्या किंमतीलाच मीं त्याला ती शेतवाडी विकली; आणि तो कांहीं श्रीमंत माणूस नसल्यानें दहा डॉलर्स वर त्याला देणगीदाखल दिले. आणि एवढें होऊनहि माझ्याजवळ माझे दहा सेंट्स्, बियाणें व शेतकीचीं अवजारें उरलींच होतीं. अशाप्रकारें माझ्या दारिद्र्याला कमलाहि धक्का न पोंचतां मी **'श्रीमंत'** बनल्याचें मला आढळून आलें. परंतु सृष्टीचा तो देखावा मीं माझ्यापाशींच ठेवून दिला. आणि तेव्हांपासून दरसाल, त्यापासून जें कांही ' उत्पन्न ' मिळालें तें मीं हातगाडीशिवायच वाहून नेलें आहे. सृष्टीच्या देखाव्यांची बहार काय वर्णावी !...

एखाद्या शेतवाडीच्या अत्यंत मौल्यवान् अशा भागाचा उपभोग घेऊन परतलेला कवि मी कित्येकदा पाहिलेला आहे. त्या शेतवाडीचा तिरसट खाष्ट शेतकरी मात्र आपल्या त्या शेतांत फक्त थोडींशींच (रानवट) सफरचंदें लागल्याबद्दल विवंचना करीत बसलेला असतो. एखाद्याची शेतवाडी कवीनें तालबद्ध बनविलेली असतांना, तिला मोठें भपकेबाज अदृश्य कुंपण करून देऊन तिचें ' दूध ' काढून, तें तापवून त्यावरील 'मलई' काढून घेऊन उरलेलें 'निःसत्व दूध' त्या शेतकऱ्याला

तो ठेवीत असतांना ही गोष्ट त्या शेतमालकाला कित्येक वर्षें आकलनहि होत नाहीं.

हॉलोवेल शेतवाडीनें माझें मन आकर्षून घेतलें होतें तें खरोखरी अशा कारणांसाठीं : पहिली गोष्ट म्हणजे, तें अगदीं एका बाजूला—गांवापासून सुमारें दोन मैल दूर होतें. दुसरी गोष्ट अशी कीं, अगदीं जवळचा शेजारीसुद्धां तिथून अर्धा मैल अंतरावर होता. त्याचप्रमाणें, हमरस्ताहि शेतवाडीनजीकच्या विस्तीर्ण मैदानापलीकडून गेला होता; त्यानंतर नदीच्या बाजूचा कटडा (वसंत ऋतूंत याच्यामुळें नदीवरील धुक्यादहिंवरापासून शेतवाडीचें रक्षण होतें असें मालकाचें म्हणणें; पण त्या गोष्टीशीं मला कांहीं कर्तव्य नव्हतें.) घराचा व कोठाराचा करडा रंग व त्यांची मोडकळीची अवस्था, आणि मी व पूर्वीचा रहिवाशी यांच्यामधील मध्यंतर ठरणारीं तीं जीर्णशीर्ण कुंपणें. तीं ढोली असलेलीं, शेवाळानें आच्छादलेलीं सफरचंदाचीं पोकळ झाडें—सशांनीं कुरतडलेलीं;—कोणत्या प्रकारचे शेजारी मला लाभतील हें दाखवून देणारीं. परंतु या सर्वांहूनहि, त्या नदीवरील प्रथमपासूनच्या माझ्या सफरींची होणारी आठवण हें विशेष आकर्षण होतें. लाल मॅपल वृक्षांच्या राईत तें घर गुरफटलेलें असे व तेथील कुत्र्याचें भुकणें त्या वृक्षगर्जींतून मला ऐकूं येई. मालकानें आरंभलेल्या कमी-अधिक दुरुस्त्या व सुधारणा पुऱ्या होण्यापूर्वींच ती शेतवाडी खरीदण्याची मला घाई झाली होती. परंतु मी वर सांगितल्याप्रमाणें शेवटीं प्रकार घडला.

तेव्हां, मोठ्या प्रमाणावर शेतकी करण्याबद्दल मी एवढेंच सांगूं शकेन कीं, माझें बीं-बियाणें मी तयार ठेवलें होतें. (मी नेहमीं स्वतः बागेची मशागत केलेली आहे.) कित्येकांच्या मतें कालानुसार बीं सुधारत जातें. परंतु, चांगल्या-वाइटाची शहानिशा काळच करतो याबद्दल मला तरी शंका नाहीं. आणि, जेव्हां कधीं मी लागवड करीन तेव्हां माझी फारशी निराशा होण्याचा संभव नाहीं. परंतु माझ्या बांधवांना मी एकदांच सांगून ठेवतों कीं, "शक्य तेवढा काळ स्वतंत्रपणें व वचनबद्ध न होतां—कशांत गुंतून न राहतां जीवन कंठा. मग तुम्ही एखाद्या शेतवाडींत गुंतवले जातां कीं परगण्यांतील तुरुंगांत, ही म्हणण्यासारखी फरकाची बाब नाहीं."

एका नौकेची गोष्ट सोडली, तर ज्या एकुलत्या एका घराचा मी यापूर्वी मालक बनलों होतों, तें घर म्हणजे एक तंबू होता. उन्हाळ्याच्या दिवसांत सफरीसाठीं गेल्यावेळीं मी त्याचा उपयोग करीत असें, व तो अजूनहि माझ्या घरच्या पोटमाळ्यावर गुंडाळून ठेवलेला आहे. परंतु त्यावेळची नौका मात्र, एकाकडून दुसऱ्याकडे, दुसऱ्याकडून तिसऱ्याकडे अशी हस्तें-परहस्तें माझ्यापासून

दूर जात जात शेवटीं कालप्रवाहांत गडप झाली. मला मिळालेला हा आसरा पूर्वीपेक्षां जास्त असल्यामुळें जगांत स्थिरस्थावर होण्याच्या दृष्टीनें मीं थोडीशी प्रगति केली होती. तुटपुंजा आच्छादिलेला हा सांगाडा म्हणजे माझ्याभोंवतालीं बनलेलें एक प्रकारचें कायम स्वरूपाचें घरकूल होतें व तें बांधणाऱ्यावरच शेकत होतें. एखाद्या चित्राच्या आगखड्याच्या रेषांसारखें कांहीसें तें भासत होतें. हवा खाण्यासाठीं मला बाहेर जावें लागत नसे. कारण आंतील वातावरणाचा ताजेपणा नेहमीं टिकून असे. मी बसें तिथेंच दरवाजा असायचा ना—त्यामुळें ऐन पावसाळ्यांतहि घरांत असल्यासारखें वाटत नसे. 'हरिवंश' या संस्कृत ग्रंथांत असें म्हटलें आहे कीं, 'पक्ष्यांविरहित निवासस्थान म्हणजे मसाल्या-विरहित मांसासारखें आहे.' माझें निवासस्थान कांहीं असें नव्हतें. कारण, मी मुळीं आपसूकच पक्ष्यांचा शेजारी बनलों होतों. म्हणजे एखाद्या पक्ष्याला पिंजऱ्यांत कोंडून ठेवून नव्हे; तर त्यांच्या निकट सान्निध्यांत मीच स्वतःला एक प्रकारें पिंजऱ्यांत कोंडून घेतलें होतें. एरव्हीं नेहमीं बागेंत येणाऱ्या पक्ष्यांचेंच नव्हे, तर रोमांचक गाणीं म्हणणाऱ्या रानपांखरांचें सान्निध्यहि मी मिळविलें होतें.

कॉन्कॉर्ड गांवाच्या दक्षिणेस दीड मलावर, गांवापासून कांहीसें उंचावर, त्या गांवाच्या आणि लिंकन गांवाच्यामध्यें असलेल्या प्रशस्त जंगलांत, एका छोट्या तळ्याच्या कांठावर मी ठाकलों होतों. आपल्याकडे नांवाजलें गेलेलें जें एकुलतें एक मैदान—कॉन्कॉर्ड रणमैदान,* त्याच्या दक्षिणेस दोन मैलांवर हें ठिकाण होतें. परंतु जंगलांत मी इतक्या सखल भागांत होतों कीं, केवळ अर्ध्या मैलावर असलेला तळ्याचा पलीकडचा किनारा, बाकीच्या वनश्रीनें भरलेल्या भागाप्रमाणें दूरवरचें क्षितिज वाटायचें. पहिल्या आठवड्यांत जेव्हां जेव्हां मी त्या तळ्याकडे दृष्टि टाकीत असें, तेव्हां तेव्हां, एखाद्या पर्वताच्या उंचावरल्या कुशींत एखादें सरोवर असावें व इतर तलावांच्या पृष्ठभागापेक्षां खूप उंचीवर त्याचा तळ असावा असा माझा ग्रह होई. आणि जेव्हां सूर्य उगवे, तेव्हां रात्रीचें धुक्याचें वस्त्र तें फेकून देत असल्याचें दिसून येई व कुठें कुठें त्याच्या झिरमिरत्या लाटा किंवा नितळ चमकता पृष्ठभाग कमीअधिक प्रकट होत. धुकें तर, सर्व बाजूंनीं भुतांखेतांसारखें हळूहळू लपतछपत जंगलांत सरकत जाई. हेंच धुकें मग, डोंगरा-पर्वताच्या कुशींत दिसतें त्याप्रमाणें, नेहमींपेक्षां उशिरापर्यंत झाडावर तरंगत राही.

* १७७५ सालच्या एप्रिलमध्यें ब्रिटिश व अमेरिकन क्रांतिकारक यांच्यामध्यें येथें पहिली चकमक झडली.

ऑगस्टमध्यें सुरू होणाऱ्या सौम्य पर्जन्यवादळांच्या दरम्यानच्या काळांत शेजारी म्हणून ह्या छोट्या तलावाचें महत्त्व विशेष वाटत असे. कारण त्यावेळीं हवा व पाणी हीं दोन्ही पूर्णपणें निश्चल असायचीं; तर अभ्राच्छादित आकाशामुळें तिसऱ्या प्रहरालाच सायंकालीन प्रशांतता प्राप्त व्हायची; आणि रानपांखरें गात राहायचीं व या किनाऱ्यापासून त्या किनाऱ्यापर्यंत त्यांचें गाणें ऐकूं यायचें. अशा प्रकारचा तलाव याच काळांत सर्वांत नितळ असतो. आणि, त्याच्यावरील हवेचा स्वच्छ निरभ्र भाग उथळ व ढगांमुळें काळसर गडद बनल्यामुळें तें पाणी, प्रकाश व प्रतिबिंबें यांसहवर्तमान जणूं काय या पृथ्वीतलावरचा स्वर्ग बनायचें, आणि म्हणून त्याला अधिकच महत्त्व यायचें. नजीकच्या एका टेकाडावरचें जंगल थोड्या दिवसांपूर्वींच तोडण्यांत आलें होतें. तेथून त्या तलावापलीकडच्या, किनाऱ्यावरील टेकाड्यामधून दक्षिणेकडे रुंद पण निमुळता होत गेलेला वनश्रीचा देखावा रमणीय दिसे. दुतर्फा वनश्रीच्या समोरासमोरच्या दोन्ही बाजू परस्परांकडे उतरत्या होत जात, त्या, वृक्षराजीनें भरलेल्या एखाद्या जंगली दरींतून त्या दिशेनें वाहणाऱ्या प्रवाहासारख्या भासत. परंतु प्रत्यक्षांत अर्थातच तेथें प्रवाह नव्हता. या दिशेनें मी, जवळच्या हिरव्यागर्द टेकड्यांमधून व टेकड्यांवर कांहीं अंतरापर्यंत, आणि क्षितिजावरच्या, निळाईनें नटलेल्या त्याहून उंच टेकड्यांपर्यंत दृष्टि फेकीत असें. खरोखर, पायाच्या चवड्यावर उभें राहून, वायव्येकडील आणखी दूरवरच्या पर्वतश्रेणीचीं कांहीं अधिक निळसर शिखरें माझ्या दृष्टीच्या टप्प्यांत येत. तीं स्वर्गाच्या खास टांकसाळींतील अस्सल निळाईचीं नाणींच होतीं जणूं. याशिवाय गांवचा कांहीं टापूहि माझ्या नजरेस पडे. परंतु इतर दिशांकडून, याच ठिकाणाहूनहि, माझ्या भोंवतालच्या जंगलापलीकडे किंवा वरच्या बाजूला मला कांहीं दिसूं शकत नसे. पृथ्वीला तरतेपणा आणून तिला तरंगती ठेवण्यासाठीं आपल्या आसमंतांत एखादा जलसंचय असणें चांगलें. हो, अगदीं छोट्या विहिरीलाहि इतकें मूल्य आहे कीं, तिच्यांत आपण डोकावून पाहिलें कीं, पृथ्वी हें भूखंड नसून जलवेष्टित बेट आहे हें आपल्या लक्षांत येतें.

माझ्या दरवाजांतून दिसणारा देखावा अधिकच संकुचित होता, तरीसुद्धां मला गचडी झाल्यासारखें किंवा कोंडल्यासारखें मुळींच वाटत नव्हतें. तिथें माझ्या कल्पनाशक्तीला चालना देणारें भरपूर कुरण होतें. संस्कृत कवि दामोदर* याच्या गुरांच्या कळपांना नवीन व मोठालीं कुरणें हवीं झालीं तेव्हां तो उद्गारलाः

* अकराव्या शतकांतील नामवंत संस्कृत कवि.

"अफाट क्षितिजाची मौज लुटण्याचें भाग्य ज्या प्राण्यांना लाभतें त्यांच्यासारखे सुखी जीव जगांत दुसरे कुणी नाहींत."

स्थळ आणि काळ दोन्ही बदललीं होतीं, आणि इतिहासाच्या ज्या कालखंडांनीं व विश्वाच्या ज्या विभागांनीं मला अतिशय आकर्षून घेतलें होतें त्यांच्या सन्निध मी वास करीत होतों. ज्योतिर्विद् रात्रीच्या वेळीं अंतराळांतील कित्येक प्रदेश न्याहाळतात ना—तेवढ्या दूर अंतरावर मी ऱ्हात होतों.

माझें जीवन प्रत्यक्ष निसर्गाच्या बरोबरीनें सारखेंच साधेपणाचें व निष्पाप बनविण्याची हर्षोत्फुल्ल प्रेरणा प्रत्येक प्रभात देत होती. ग्रीकांप्रमाणें ऑरोराचा मी निःस्सीम भक्त आहें. लौकर उठून मी तळ्यांत स्नान करीत असें. तो एक धार्मिक विधि होता व तो माझ्या हातून उत्तम प्रकारें पार पडत असे.... प्रभातसमय हा दिवसाचा अविस्मरणीय काल असून ती जागें होण्याची वेळ असते. या वेळीं आपल्या डोळ्यांवर कमींत कमी झांपड असते; आणि एरव्हीं, उरलेल्या दिवसभरांत व रात्रीं झोपेच्या तंद्रींत असलेला आपला जीव निदान तासभर तरी अंशतः जागा होतो.

मनुष्यानें आपल्या भोगलोलुप जीवनाचा अंशतः त्याग केल्यास त्याचा आत्मा, किंवा खरें सांगायचें तर त्याचीं गात्रें याजमध्यें दर दिवशीं उत्साहाचा—सामर्थ्याचा पुनःसंचार होतो. आणि, त्याची मूलप्रकृति व बुद्धिवैभव हीं त्याचें जीवन यथाशक्ति श्रेष्ठ बनविण्याचा प्रयत्न करतात. मला तर असें वाटतें कीं, सर्व संस्मरणीय घटना प्रभातसमयीं व प्रभातकालच्या वातावरणांत घडतात. वेदांत* म्हटलें आहे : "प्रभातकालाबरोबर बुद्धिचातुर्य प्रभावित होतें." काव्य व कला, आणि मनुष्याच्या अत्युत्तम व अत्यंत संस्मरणीय कृती अशाच समयीं निर्माण होतात. ज्याचा लवचिक व प्रभावी विचार सूर्याच्या गतीशीं बरोबरी करतो, त्याला सबंध दिवसच मुळीं प्रभातकालासारखा असतो. घड्याळांत कितीहि वाजले किंवा मनुष्यांच्या प्रवृत्ती व त्यांचे परिश्रम कांहींहि सांगत असले तरी त्याची फिकीर नाहीं. मी जागा असतों तेव्हां प्रभातसमय असतो; आणि माझ्यांत प्रातःकाल संचरलेला असतो. नैतिक सुधारणा म्हणजे निद्रा झुगारून देण्याचा प्रयत्न होय. माणसें जर अधूनमधून डुलक्या घेत नसतील, तर दिवसभराची त्यांची कामगिरी इतकी तुटपुंजी कां आढळून येते ? ते कांहीं कच्चे हिशेबी नसतात. झोपेच्या तंद्रीनें त्यांना घेरलें नसतें, तर त्यांनीं थोडेंफार कार्य

* प्राचीन भारतांतील धर्मपर चार संस्कृत ग्रंथ.

साधलें असतें. शारीरिक श्रमासाठीं लक्षावधि लोक जागतात; परंतु प्रभावी बौद्धिक कार्यासाठीं जागणारा लाखांत केवळ एखादाच सापडेल. आणि, काव्यमय किंवा स्वर्गीय जीवनासाठीं तळमळणारा तर कोटींत एखादाच आढळेल. जागें राहणें म्हणजेच जिवंत राहणें होय. पूर्णपणें जागा असलेला माणूस अद्याप मला आढळलेला नाहीं. मग त्याच्या डोळ्याला डोळा तरी मी कसा भिडवणार ?

आपण आपल्याला जागें करून जागें ठेवण्यास शिकलें पाहिजे. तेंसुद्धां कृत्रिम साधनानीं नव्हे; तर पहांटेची सतत याद ठेवून. कारण आपल्याला कितीहि गाढ झोंप लागली तरी ती आपला त्याग करीत नाहीं. जाणत्या प्रयत्नानिशीं आपलें जीवन समृद्ध करण्याचें मनुष्याचें सामर्थ्य इतकें निर्विवाद आहे कीं, त्याहून दुसरी कोणतीच अधिक उत्साहवर्धक गोष्ट मला माहीत नाहीं. एखादें विशिष्ट चित्र रंगवितां येणें किंवा पुतळा कोरतां येणें, आणि अशाप्रकारें कांहीं वस्तू सुंदर बनविणें ही गोष्ट कांहींशा कर्तबगारीची तर खरीच; पण ज्या वातावरणांतून व माध्यमांतून आपण पाहतों, जें आपल्याला नीतिदृष्ट्या करतां येतें तेंच कोरणें आणि रंगवणें किती तरी अधिक तेजस्वी ठरणारें आहे. दिवसाच्या गुणधर्मावर प्रभाव पाडणें हीच सर्वश्रेष्ठ कला होय.

मला विचारपूर्वक जगायचें होतें. जीवनांतील केवळ निसर्गसिद्ध गोष्टींशीं सामना द्यावयाचा होता. म्हणून मी जंगलांत गेलों होतों. शिवाय, त्याला जें कांहीं शिकवायचें होतें तें मी शिकूं शकलों कीं नाहीं हेंहि मला पाहायचें होतें. हो, नाहींतर मृत्युपंथाला लागल्यावर असें आढळून यायचें कीं, मी मुळीं नीटपणें जगलोंच नाहीं. जें जीवन नव्हतें तें जगण्याची कांहीं माझी इच्छा नव्हती; जगणें कितीतरी प्रिय असतें. त्याचप्रमाणें, अगदीं निरुपाय झाल्याखेरीज मला संन्यास आचरायचा नव्हता. तर, जीवनाचा सखोल उपभोग घेऊन त्याचें सर्व सत्त्व मला शोषून घ्यायचें होतें. जीवनांतील गैर गोष्टी उधळून लावणाऱ्या दांडगाईनें व तडफदारपणानें, लढवय्या स्पार्टनसारखें मला जगायचें होतें. जीवन कोंपऱ्यांत सारून त्याची अगदीं दशादशा करून सोडायची, आणि, तें क्षुद्र असल्याचें सिद्ध झालें, तर त्याचा तो क्षुद्रपणा जगाच्या वेशीवर टांगायचा. आणि जर तें उदात्त असलें, तर अनुभवानें तें पारखायचें व माझ्या पुढील सफरींत त्याचा खराखुरा वृत्तान्त कथन करायचा. कारण, बहुतेक माणसें, माझ्या मतें, त्याजबद्दल विलक्षण संदेहांत असतात. तें देवकृत आहे कीं दैत्यकृत याचा बोध त्यांना होत नाहीं, आणि त्यांनीं शेवटीं कांहींशा उतावळीनें असा निष्कर्ष काढलेला असतो

कीं, 'देवाचा उदोउदो करायचा व त्याचा सतत आनंद लुटायचा' हेंच मनुष्याचें या जगांतील अंतिम ध्येय आहे.

आणि, बऱ्याच काळापूर्वी आपलें रूपांतर मनुष्यांत झाल्याचें पुराणकथा सांगत असूनहि आपण अजून कीडमुंग्यांसारखें क्षुद्र जीवन व्यतीत करीत असतों; पिग्मी लोकांसारखे आपण बगळयांशीं लढतों. चुकीमागून चूक होते आहे व बुडत्याचा पाय खोलांत जावा तसें ठिगळावर ठिगळ चढत आहे. नस्त्या तपशीलापायीं आपलें जीवन वायां जात आहे. सारें कसें सोपेंसोपें साधेंसाधें हवें. रोज तीनदां जेवण्याऐवजीं जरूर तर फक्त एकदां जेवा. शंभर डिशेसच्या जागीं पांच. आणि इतर गोष्टीहि या प्रमाणांत कमी करा. आपलें जीवन, छोट्याछोट्या राज्यांच्या बनवलेल्या जर्मन फेडरेशनसारखें आहे. या फेडरेशनची सीमा सतत सारखी इतकी बदलत राहते कीं, अमुक एका वेळीं त्या सीमेची रचना कशी काय आहे हें एखाद्या जर्मनालासुद्धां सांगतां येणार नाहीं.

आपल्या राष्ट्राचें जीवन खूपच धांवपळीचें बनत चाललें आहे. लोकांना वाटतें कीं, राष्ट्राला व्यापाराची आवश्यकता आहे; तांदळाची निर्यात करावयास हवी. तारायंत्रावरून बोलतां यायला हवें नि ताशीं तीस मैल फेरफटका मारतां यावा—हो, मग तो त्यांना मारायचा असो किंवा नसो. परंतु आपल्याला वानरांसारखें राहायचें आहे कीं माणसांसारखें, हें जरा अनिश्चितच आहे असें वाटतें.

जीवनाची नासाडी करीत असें धांवपळीचें जीवन आपण कां व्यतीत करावें? आपणाला भूक लागण्यापूर्वीच आपली उपासमार करून घेण्याचा आपला निश्चय झालेला दिसतो. वेळींच हवा असणारा एक टांका घातला कीं, तो न घातल्यास घालावे लागणारे, पुढील नऊ टांके वांचतात असें लोक म्हणतात. आणि म्हणूनच कीं काय, उद्यांचे नऊ टांके वांचविण्यासाठीं ते हजार टांके आजच उरकून घेत आहेत.

माझ्यापुरतें सांगायचें, तर पोस्ट ऑफिसशिवाय मी भागवून घेऊं शकेन. टपालाद्वारें फारच थोडें महत्त्वाचें असें दळणवळण होत असतें असें मला वाटतें. टीकात्मक दृष्टीनें बोलायचें झाल्यास—कांहीं वर्षांपूर्वीं मीं लिहिल्याप्रमाणें—टपाल हंशीलाच्या मोलाइतकीं महत्त्वाचीं, एखादुसऱ्या पत्राहून अधिक पत्रें कांहीं मला आयुष्यांत कुणाकडून आलेलीं नाहींत. आणि वृत्तपत्रांत कोणतेंहि संस्मरणीय वृत्त मला तरी कधींहि वाचायला मिळत नाहीं. एखाद्या मनुष्याला लुबाडला, एखाद्याचा खून केला, किंवा एखादा अपघातांत ठार झाला, किंवा एखादें घर जळालें, किंवा एखादें जहाज फुटलें, किंवा एखाद्या स्टीमबोटीचा

स्फोट झाला, किंवा रेल्वेमार्गावर एखादी गाय गाडीखालीं ठार झाली, किंवा एखादा पिसाळलेला कुत्रा ठार झाला, किंवा हिंवाळ्यांत एखादी टोळधाड आली, तर अशा घटनेचें वर्णन एकदां वाचलें कीं, पुन्हां कधीं तसलेंच वर्णन आपल्याला वाचण्याची जरुरी नाहीं. एकदां वाचलें कीं पुरे. तत्त्वज्ञाला सर्व प्रकारचें वृत्त म्हणजे गप्पाष्टकांसारखें असतें. जे कुणी तें वृत्त संपादन करतात आणि वाचतात ती मंडळी म्हणजे चहा घेतां घेतां बातम्या चघळणाऱ्या म्हाताऱ्या बायका होत. एवढें असूनहि ह्या गप्पाष्टकांसाठीं आसुसलेले कांहीं थोडे लोक नाहींत.

बातमी!...जें कधींहि जुनें झालेलें नाहीं, तें काय तें जाणून घेणें त्याहून किती तरी महत्त्वाचें!..."कीओयू–हे–यू (वेई राज्याची महान् असामी) ह्यानें खौंगत्सेउ याजकडे, त्याजकडील समाचार जाणून घेण्यासाठीं एक दूत पाठवला. खौंगत्सेउ यानें त्या दूताला आपल्या शेजारीं बसवून घेतलें नि विचारलें : 'आपले धनीसाहेब काय करताहेत ?' दूतानें आदरपूर्वक उत्तर दिलें : 'आमचे धनीसाहेब आपले कित्येक दोष कमी करूं पहात आहेत; पण त्यांना कांहीं अजून या उद्दिष्टाची पूर्तता करतां आलेली नाहीं.' तो दूत निघून गेल्यावर तो तत्त्वज्ञ उद्गारला : 'वाः! दूत असावा तर असा!...'" अशा प्रकारची एखादी भाकड प्रवचनकथा, रविवारसारख्या विश्रांतीच्या दिवशीं, पेंगुळणाऱ्या शेतकऱ्यांना सांगण्याऐवजीं उपदेशक प्रवचनकारानें गर्जून सांगितलें पाहिजे—"जरा सबूर!...बस्स झालं! झपाटा तर इतका दाखवतांय्, मग रखडतांय् कां?" हो, रविवार हा खरें म्हणजे नवीन आठवड्याचा पहिला ताजातवाना दिवस नाहीं; तर संपलेल्या कंटाळवाण्या आठवड्याचा तो अखेरचा दिवस होय.

ढोंगधत्तुरा व भ्रम हीं जणूं खंबीर सत्यें आहेत आणि वस्तुस्थिति मात्र काल्पनिक आहे असें मानलें जातें. परंतु आपली वंचना करून न घेतां लोक जर हळुहळु वस्तुस्थितीचें निरीक्षण करूं लागले, तर आपल्याला ज्ञात असलेल्या गोष्टींशीं तुलना करतां, जीवन हें एखाद्या परीकथेसारखें आणि अरबी सुरसकथांसारखें बनेल. जें अपरिहार्य आहे आणि ज्याला अस्तित्वांत राहण्याचा हक्क आहे, तेवढ्याचाच जरी आपण आदर राखला, तरी संगीत व काव्य यांचे निनाद रस्तोरस्तीं घुमत राहतील. जेव्हां आपली धांदलधांवपळ नसते व आपण शहाणेसुर्ते असतों, तेव्हां आपल्या हें लक्षांत येतें कीं, महान् व लायक अशा गोष्टींनाच काय तें कायम स्वरूपाचें व निर्विवाद असें अस्तित्व असतें; आणि क्षुद्र भयभीति नि क्षुद्र सुखें ह्या सत्यस्थितीच्या केवळ छाया होत. ही गोष्ट नेहमीं उल्हसित करणारी व उदात्त असते.

जीवनाचा खेळ खेळणारीं मुलें त्याचा खरा कायदा व त्याचे संबंध मोठ्या माणसांपेक्षां अधिक स्पष्टपणें उमगतात. मोठीं माणसें मात्र स्वतःला अनुभवानें —म्हणजेच अपयशानें जास्त शहाणीं समजतात खरीं, पण योग्य प्रकारें जीवन जगण्यांत उलट अपयशीच ठरतात. एका हिंदु तत्त्वज्ञानपर ग्रंथांत मी असें वाचलेंय्—"एका राजाचा एक मुलगा बालपणीं नगराबाहेर, कुठें तरी जंगलांत टाकला गेला. तिथें एका जंगली माणसानें त्याला वाढविला. अर्थातच, जंगली स्थितींत वाढल्यामुळें आपण जंगलीच माणूस असल्याचा मोठेपणीं त्याचा समज झाला होता. परंतु एकदां त्याच्या बापाच्या एका मंत्र्याला त्याचा शोध लागला, तेव्हा ता राजपुत्र असल्याची सत्यस्थिति त्या मंत्र्यानें त्याच्या निदर्शनास आणली. तेव्हां मग आपल्या स्थितीबद्दलची त्याची गैरसमजूत नाहींशी झाली व आपण राजपुत्र असल्याचें तो समजून चुकला. अशाच प्रकारें आत्म्याची स्थिति होते. प्राप्त परिस्थितीच त्याला खरी वाटूं लागते. आणि सद्गुरूनें सत्यस्थिति त्याच्या दृष्टोपत्तीस आणून दिली कीं, मग मात्र 'अहं ब्रह्माऽस्मि' अशी त्याची खात्री पटते."

ज्यांत मी मासे धरायला जातो असा काळ हा एक ओढा आहे. त्यांतलें पाणीहि मी पितों. परंतु पाणी पितां पितां त्या ओढ्याचा वालुकामय तळ मला दिसतो व हा ओढा किती उथळ आहे हें माझ्या दृष्टोत्पत्तीस येतें. त्याचा बारीकसा प्रवाह निसटून जातो; पण अनाद्यनन्त तत्त्व कायम राहतें. मी खूप खूप पीत राहीन. ताऱ्यांनीं रत्नखचित बनलेल्या आभाळांत मासे धरीन. मला एकहि मोजतां येत नाहीं. मूळाक्षरांतील पहिलें अक्षरहि मला माहीत नाहीं. जन्मल्या दिवशीं मी जेवढा शहाणा होतों तेवढाहि आतां उरलेलों नाहीं याबद्दल मी नेहमींच खंत करीत आलोंय्. बुद्धि ही खाटकाच्या सुऱ्यासारखी आहे. ती तारतम्यानें अज्ञात गोष्टींचा छेद करीत जाते. यापुढें जरुरीपेक्षां जास्त कामांत मला माझे हात गुंतवायचे नाहींत. माझें डोकें म्हणजेच माझे हात-पाय. माझ्या सर्व उत्तमोत्तम कार्यप्रवृत्ति त्याच्यांत एकवटल्या आहेत अशी माझी भावना आहे. माझी अंतःप्रेरणा तर मला असें सांगते कीं, कांहीं प्राणीं आपल्या नाकाडाचा व पुढल्या पंजांचा उपयोग करतात ना, तसा उपयोग करून जमीन उकरण्यासाठीं माझें डोकें हा अवयव आहे; आणि याच्या साहाय्यानें जमीन उकरून नि बोगदा पाडून ह्या डोंगरांतून मी वाट काढीन.

# फुटलेलें जहाज*

ज्या सागरानें पृथ्वीचा दोन तृतियांश भाग व्यापला असल्याचें सांगतात, त्या सागराचा, पूर्वी कधीं न पाहिलेला असा देखावा बघण्याची इच्छा होऊन १८४९ च्या ऑक्टोबरमध्यें मी केप कॉडला भेट दिली. त्यानंतर पुन्हा एकदां पुढल्या जूनमध्यें; आणि मग १८५५ च्या जुलैमध्यें एकदां ट्रुरोला,—एकुलत्या एका सोब-यानिशीं पहिल्यांदा व अखेरची भेट दिली; नि दुसऱ्यांदा एकट्यानें. केपला एकूण सुमारें तीन आठवडे मी घालवले. ईस्टहॅमपासून प्रॉव्हिन्सटाउनपर्यंत पायीं रपेट केली—दोनदां अटलांटिकच्या बाजूनें, आणि एकदां उपसागराच्याहि बाजूनें, चार-पांच मैल सोडून. माझ्या वाटेवर पांच सहा वेळां तरी मी केप ओलांडलें. परंतु समुद्रावर अगदीं ताजातवाना गेल्यामुळें मी फारच थोडा खारावलों. कॉन्कॉर्डच्या दहा मैलांच्या परिसरांतील तळ्या-तलावांकडे सफरी करण्यास मी सरावलेलों आहें. परंतु मागाहून माझ्या सफरींची कक्षा मी समुद्रकिनाऱ्यापर्यंत वाढविली आहे.

केप कॉड हा मॅसॅच्युसेटस्‌चा एक उघडावाघडा नि वांकलेला बाहू आहे. बुझार्डचा उपसागर हा त्याचा खांदा; केप मॅलेबरे हा कोपर; तर ट्रुरो हें मनगट. नि प्रॉव्हिन्सटाउनची पुळण ही वळलेली मूठ. त्यामागें, हिरव्या पर्वतराजीशीं पाठ करून नि सागराच्या तळाशीं पाय रोवून, एखाद्या तालीमबाजासारखें आपल्या उपसागराचा सांभाळ करीत, स्वसंरक्षणार्थ राज्य उभें ठाकलेलें.

नकाशाचा अभ्यास केला असतां माझ्या असें लक्षांत आलें कीं, केपच्या कोपरापासूनच्या पुढील हाताच्या पूर्वेला किंवा बाहेरच्या अंगाला, किनाऱ्याच्या सर्वसाधारण रेषेपासून तीस मैलांहून अधिक अंतरावर एक सलग पुळणीचा पट्टा असला पाहिजे. तेथील सागराचा देखावा उत्तम असेल. परंतु ऑर्लीन्समधील नॉसेट बंदराला द्वार करून देणाऱ्या पुळणींतील भगदाडामुळें, जमिनीवरून

* १८६३ सालीं प्रथम प्रकाशित झालेल्या 'केप कॉड' मधून.

जायचें तर मला तें ठिकाण ईस्टहॅममधूनच गांठावें लागेल. आणि तेथून मग सुमारें अठ्ठावीस मैलांवरील रेस पॉइंटपर्यंत मला कदाचित् कसल्याहि अडथळ्या-विना थेट चालत जातां येईल.

मॅसच्युसेट्स्‌मधील कॉन्कॉर्डहून आम्ही मंगळवार ता. ९ ऑक्टोबर १८४९ रोजीं निघालों. बॉस्टनला पोंचल्यावर आम्हाला असें आढळून आलें कीं, आदल्याच दिवशीं यावयाची प्रॉव्हिन्सटाउनची बोट भयंकर वादळामुळें अजून आलेली नाहीं. एवढेंच नव्हे, तर—"मनुष्यसंहार! कोहासेट येथें एकशें-पंचेचाळीस माणसें दगावलीं," असा फलक आम्ही रस्त्यावर पाहिला. तेव्हां मग कोहासेटच्या वाटेनें जायचें आम्हीं ठरवलें. मृतांचीं प्रेतें ओळखून काढायला, जिवंत राहिलेल्यांचें सांत्वन करायला किंवा संध्याकाळीं निघणाऱ्या प्रेतयात्रांत सामील व्हायला म्हणून निघालेले अनेक आयरिश लोक आम्ही गाड्यातून चाललेले पाहिले. आणि जेव्हां आम्ही कोहासेटला पोंचलों, तेव्हां आम्हाला असें दिसून आलें कीं, जवळजवळ सर्व उतारू, मैलभर अंतरावरच्या त्या पुळणीकडे चाललेले आहेत. जवळपासच्या प्रदेशांतूनहि बरींचशीं माणसें गोळा होत होतीं. शेंकडों माणसें—कांहीं पायीं, तर कांहीं गाड्यांतून अशीं कोहासेटवरून अखंड प्रवाहामारखीं चाललीं होतीं. ह्या लोकांत, शिकारीचा पोशाख केलेली आणि बंदुका, शिकारीचें साहित्य व कुत्रे बरोबर असलेली शिकारी मंडळीहि होती. स्मशानभूमीजवळून जातांना, एखाद्या तळघरासारखा एक मोठा बोगदा नुकताच खोदलेला आम्हाला दिसला. आणि एका सुरेख नागमोडी नि खडकाळ रस्त्यानें आम्हीं किनारा गांठणार इतक्यांत, शेतावरील कित्येक गाड्या प्रार्थनागृहाकडे चाललेल्या आम्हाला आढळल्या. प्रत्येक गाडीवर देवदाराच्या खम्बरीत अशा तीन मोठ्या पेट्या होत्या. ह्या पेट्यांत काय होतें तें विचारण्याची आम्हाला गरज पडली नाहीं. ते गाडीवाले प्रेतवाहक बनले होते. अनेक वाहनांचे घोडे किनाऱ्यानजीकच्या कुंपणाला बांधलेले होते. आणि मैलभर किंवा त्याहून अधिक लांबीचा पुळणीचा वर–खालचा पट्टा, प्रेतें शोधणाऱ्या, व फुटलेल्या जहाजाचे तुकडे तपासणाऱ्या लोकांनीं फुलून निघाला होता. तेथें किनाऱ्यापलीकडे ब्रूक आयलंड नांवाचें एक लहानसें बेट होतें, व त्यावर एक छोटी झोपडी होती. मॅसच्यु-सेट्स्‌चा हा किनारा—नान्टास्केटपासून सिट्युएटपर्यंत अत्यंत खडकाळ गणला जातो. लाटांनीं हे खडक उघडे पाडले आहेत; पण त्यांना ते ढांसळून टाकतां मात्र आलेले नाहींत. येथें कियेकदां जहाजें फुटलेलीं आहेत.

आयर्लंडमधील गालवे येथून, वसाहतवाल्यांना घेऊन निघालेलें 'सेंट जॉन'

नांवाचें जहाज रविवारीं सकाळीं फुटलें होतें; नि आतां मंगळवारची सकाळ होती, तरी समुद्र अजून खवळलेला होता व त्याच्या लाटा खडकांवर धूमधडाक्यानें आदळून फुटत होत्या. मी मघां म्हटल्या तशा अटरा-वीस मोठ्या पेट्या, पाण्यापासून कांहीं यार्डांच्या अंतरावर एका हिरव्यागार टेकाडावर ठेवलेल्या होत्या व भोवतालीं लोकांचा घोळका जमला होता. जीं कांहीं सत्तावीस-अठ्ठावीस प्रेतें सांपडलीं होतीं तीं सारीं तेथें गोळा करून ठेवलेलीं होतीं. कांहींजण कांहीं पेट्यांचीं झांकणें खिळे ठोकून तांतडीनें बंद करीत होते; तर इतर कांहींजण गाड्यांवर टाकून पेट्या घेऊन जात होते. दुसरे काहींजण, अजून बंद न केलेलीं झांकणें उघडून, आंत डोकावून प्रेत तपाशीत होते व त्याच्या अंगावर उरलेल्या फाटक्यातुटक्या कपड्यांवर सैलशी शुभ्र चादर पांघरीत होते. दुःखाची अवकळा कांहीं कुठें मला दिसली नाहीं; गंभीरपणानें कामगिरी उरकण्यांत मात्र लोक गढून गेले होते. एकजण कुणा एकाचें प्रेत ओळखून काढण्याचा प्रयत्न करीत होता, आणि प्रेतसंस्काराची व्यवस्था पाहणारा किंवा सुतार—कुणीतरी एकजण अमुक एक मूल कोणत्या पेटींत ठेवलेलें आहे अशी चौकशी दुसऱ्या कुणाकडे तरी करीत होता. कांहीं प्रेतांवरचीं वस्त्रें दूर सारण्यांत आलीं, तेव्हां कुणाचा कसला, तर कुणाचा कसला अवयव फुगलेला किंवा खडकावर आपटून वा माशानीं खाल्ल्यामुळें जखमी झालेला मीं पाहिला. कुठें कुठें एकाच पेटींत दोन-तीन मुलें, किवा बापलेक एकत्र ठेवण्यांत आलीं होतीं, नि त्या पेटीवर लाल खडूनें कदाचित् असेंहि लिहिलें गेलें असतें—"अमुक एकजण आणि तिच्या बहिणीचें मूल."

भोवतालच्या गवताळ टापूंत शिडाच्या व कापडाच्या चिंध्या विखुरल्या होत्या. ह्या किनाऱ्यानजीक राहणाऱ्या एकजणाकडून मागाहून मी असें ऐकलें कीं, आधीं आलेल्या एका स्त्रीनें आपलें बालक आणण्याची कामगिरी पाठीमागें आपल्या बहिणीकडे सोंपविली होती. तिला आतां एका पेटींत—ती बहुधा आतांच जिचा मी उल्लेख केला ती असेल—आपल्या बहिणीच्या बाहुपाशांत असलेलें आपलें मूल सांपडलें; जणूं काय तिची बहीण तिला अशा प्रकारें सांपडायची होती!... आणि त्या दृश्याचा परिणाम त्या बाईवर असा झाला कीं, अवघ्या तीन दिवसांच्या आंत त्या मुलाची ती आई मरण पावली.

ह्या दृश्याकडून आम्हीं बाजूला वळलों आणि त्या खडकाळ किनाऱ्यावर चालायला लागलों. पहिल्याच खाडींत त्या फुटलेल्या जहाजाचे, रेती नि लव्हाळीं यांनीं आच्छादिलेले बारीक बारीक तुकडे विखुरलेले दिसले. बरींचशीं पिसेंहि

पडलीं होतीं. पण जहाजाचे ते भाग इतके जुने व गंजलेले दिसले कीं, बरींच वर्षे पडून राहिलेले, कुठल्या तरी जुन्यापुराण्या फुटक्या जहाजाचे ते अवशेष असावेत असाच प्रथम माझा समज झाला. अगदीं कॅप्टन किड* याचें स्मरण मला झालें. तसेंच तीं पिसें समुद्रपक्ष्यांचीं गळून पडलेलीं असावींत असें वाटलें. आणि कदाचित् या एकंदर घटनेबद्दल आजूबाजूच्या परिसरांत एखादी दंतकथाहि प्रचलित असेल. हेंच सेंट जॉन जहाज का?—असें मी एका खलाश्याला विचारलें. तो म्हणाला—'होय.' तें कुठेंसें आपटलें?—असें मी विचारतांच त्यानें किनाऱ्यापासून मैलभर अंतरावर, आमच्या समोरच दिसणाऱ्या ग्रॅम्पस्रॉक नांवाच्या एका खडकाकडे बोट दाखविलें नि सांगितलें: "जहाजाचा एक भाग तिथं चिकटून राहिलेला दिसतोय पहा,—एखाद्या लहानशा होडीसारखा."

मी बघितलें. नांगर, साखळदंड, आणि दोरखंडें यांमुळें जहाजाचा तो भाग अडकून राहिला असावा असा तर्क होता. मी जेवढीं प्रेतें पाहिलीं तेवढेच लोक बुडाले किंवा काय असें मी विचारलें.

"छे–छे! हे पाव हिश्यानंसुद्धां नाहींत." तो म्हणाला.

"मग बाकीचीं कुठं आहेत?"

"तो जहाजाचा भाग दिसतो ना, त्याच्याच खालीं बहुतेकजण सांपडलेले आहेत."

ह्या खाडींतच सांचलेली जहाजाची मोडतोड इतकी होती कीं, गाड्यांतून ती भरून न्यावयाची झाली, तर कित्येक दिवस लागले असते. कित्येक फूट उंचीचा ढिगारा पडला होता; आणि त्यावर कुठं कुठें एखादी बायकी हॅट, किंवा एखादें जाकीट पडलेलें होतें. ह्या मोडतोडीच्या ढिगाऱ्यापाशीं जमलेल्या गर्दींत अनेक लोक, वादळामुळें सांचलेलीं लव्हाळीं गोळा करून गाडींत भरत होते व पाण्याबाहेर नेऊन टाकीत होते. त्यांतच सांपडलेले कपड्यांचे तुकडे बऱ्याच वेळां त्यांना बाजूला काढावे लागत होते; आणि न जाणो, त्यांच्याखालीं अचानक एखादें माणसाचें प्रेतहि त्यांना सांपडलें असतें. कुणीहि माणसें बुडालीं असलीं, तरी हीं लव्हाळीं म्हणजे उत्तम प्रकारचें मूल्यवान खत असतें ही गोष्ट कांहीं ते लोक विसरलेले नव्हते. समाजजीवनाच्या अंतरंगांत ह्या फुटलेल्या जहाजानें लक्षांत येण्यासारखे फारसे कांहीं कंप निर्माण केलेले नव्हते.

* विल्यम किड (१६४५?—१७०१): स्कॉच दर्यावर्दी व नामांकित चांचा.

ज्या ब्रिटिश जहाजाच्या मागून जाण्याचा प्रयत्न 'सेंट जॉन'नें केला होता, त्या जहाजाच्या डोलकाठ्या मैलभर दक्षिणेकडे, खडकांच्यावर आम्हाला दिसत होत्या. त्याच्या नांगराचे साखळदंड किंवा दोरखंडें अडकलीं नाहींत, आणि सुदैवानें मग तें कोहासेट बंदरांत जाऊन पोंचलें. थोड्याशा अंतरावर, किनाऱ्यावरील एका खडकावर पुरुषी कपडे आम्हाला दिसले. तर त्यापलीकडे एक बायकी स्कार्फ, एक झगा, एक गवती हॅट, त्या गलबताचा ओवरा व मोडून तुकडे तुकडे झालेली एक उंच नि कोरडी डोलकाठी आम्हाला दिसली. दुसऱ्या खडकाळ खाडींत, पाण्यापासून कित्येक यार्ड अंतरावर, व वीस फूट उंचीच्या खडकामागें त्या जहाजाच्या एका बाजूचा भाग अजून अभंग राहिलेला दिसत होता. तो बहुधा चाळीसएक फूट लांब नि चौदाएक फूट रुंद असावा. आधींच्या छोट्या छोट्या तुकड्यापेक्षां ह्या मोठ्या, खिळखिळ्या झालेल्या तुकड्यावर लाटांनीं जो भयंकर प्रभाव गाजवला होता, तो पाहून मी अधिकच आश्चर्यचकित झालों. मोटमोठाले लाकडी तुकडे व लोखंडी ओढण्या यांची बेसुमार मोडतोड झाली होती. त्यावरून माझी अशी खात्री झाली कीं, लाटांच्या प्रभावापुढें कोणत्याहि वस्तूचा पाडाव लागणार नाहीं. अशा स्थितींत लोखंडाच्या ठिकऱ्या उडतील व लोखंडी जहाज, खडकांवर आदळून एखाद्या अंड्याच्या कवचीसारखें तडकून जाईल. परंतु कांहीं ठिकाणचें लाकूड इतकें कुजलेलें होतें कीं, माझ्या छत्रीचें टोक त्यांत जवळजवळ रोवलें गेलें. ह्याच तुकड्यावर कांहींजणांचा जीव वांचला असें माहीतगार म्हणाले. वादळाच्या वेळीं खवळलेला समुद्र ह्या खाडींत कुठें शिरला होता तेंहि त्यांनीं दाखविलें. आतां मात्र ही खाडी कोरडी पडली होती. कुठें व कोणत्या स्थितींत हा तुकडा येऊन पडला हें समजून आलें, तेव्हां, त्यावर कोण कसे वांचले याचेंच मला नवल वाटलें. कांहीं अंतरावर सेंट जॉन'चा एक खलाशी आपली कहाणी सांगत होता. त्याच्यासभोवतीं बरेच लोक जमले होते. तो एक सडपातळ तरुण होता व कांहींसा क्षुब्ध होऊन जहाजाच्या कप्तानाची हकीगत सांगत होता. तो म्हणाला कीं, जेव्हां त्यांनीं जहाजाला जोडलेल्या नौकेंत उडी घेतली, तेव्हां ती नौका पाण्यानें भरली. आणि तें जहाज तर कलंडत होतें. त्यामुळें नौकेंत भरलेल्या पाण्याच्या वजनामुळें, ज्या दोरानें नौका जहाजाला बांधली होती तो दोर तुटला, व साहजिकच त्यांची फारकत झाली.

एवढ्यांत दुसरा एक माणूस मध्येंच येऊन सांगूं लागला: 'हां, हा सरळ घडलेली हकीगतच सांगतोय्. काय समजलेत, नावेंतील पाण्याच्या वजनानें नावेचा दोर तुटला. पाणी भरलेली नाव कीं नाहीं फार जड असते—" इत्यादि

इत्यादि. ही हकीगत तो मोठ्या भसाड्या व अप्रस्तुत कळकळीच्या स्वरांत सांगत होता. जणूं काय तो पैजेवर बोलत होता. मात्र, एकंदर प्रकरणांत त्याला माणुसकीची आस्था कशी ती नव्हती.

दुसरा एक धिप्पाड माणूस जवळच एका खडकावर उभा होता. समुद्राकडे एकटक पहात, सरावलेल्या व्यसनी माणसासारखा तंबाखूची मोटाली गोळीवर गोळी चघळत होता.

दुसरा एकजण आपल्या सोबत्याला हांक मारीत म्हणत होता: 'चल रे, आपण जाऊं या. सगळं कांहीं पाहून झालंय्. स्मशानयात्रेसाटीं थांबण्यांत कांहीं अर्थ नाहीं."

थोडेंसें पुढें, खडकावर उभा असलेला एकजण आम्ही पाहिला. तो वांचलेल्यांपैकीं असल्याचें कुणी तरी सांगितलें. तो गंभीर दिसत होता आणि त्यानें जाकीट व भुरकट रंगाची विजार पेहरली होती. आपले दोन्ही हात त्यानें खिशांत सारले होते. मी त्याला कांहीं प्रश्न विचारले व त्यांचीं उत्तरेंहि त्यानें दिलीं. परंतु एकंदरींत त्याबद्दल बोलण्याला तो नाखूष दिसला व लौकरच तेथून निघूनहि गेला. त्याच्याच बाजूला, लाईफ बोटमधील एक माणूस तलकापडी जाकीट घालून उभा होता. 'सेंट जॉन' जहाजाची नाव वाटेंत दिसली, तींत त्या जहाजावरील सर्व खलाशी व नोकर असल्याचें पाहून, त्याना मदत नको असें आपणाला कसें वाटलें व त्यामुळें ब्रिटिश जहाजाच्या मदतीसाटीं आपण कसे गेलों तें सांगून तो म्हणाला: "खवळलेल्या लाटांमुळें, सेंट जॉन जहाजावर माणसें उरलीं आहेत हें कांहीं आपणाला दिसलें नाहीं. नाहीं तर कांहीजणांना तरी वांचवतां आलें असतें."

आणखी थोड्या अंतरावर सेंट जॉन जहाजाचा बावटा सुकण्यासाठीं एका खडकावर पसरून ठेवला होता. तो उडून जाऊं नये म्हणून त्याच्या कोपऱ्यावर दगडहि ठेवले होते. जहाजाचा हा किरकोळ पण महत्त्वाचा व वैशिष्ट्यपूर्ण भाग, जो आतांपर्यंत वाऱ्याचें खेळणें बनून राहिला होता, तो आतां खात्रीनें किनारा गांठणार होता. ह्या खडकांवरून एकदोन घरें दिसत होतीं. त्यांत, अपघातांतून वांचलेले, पण ज्यांच्या मनाला व शरिराला बसलेला धक्का अजून पुरता ओसरला नव्हता असे कांहींजण होते. एकजण तर जगण्याची आशाच नव्हती.

कोहासेट खडक दिसतील या अपेक्षेने आम्ही किनाऱ्यावर आणखी खालीं खालीं जाऊं लागलों. तों, अर्ध्या मैलाच्या आंत एका लहानशा खाडींत एक म्हातारा, त्याचा मुलगा व त्यांचे इतर साथीदार, त्या प्राणांतिक वादळानें आणून टाकलेलीं लव्हाळीं बेगुमानपणें गोळा करीत होते. वास्तविक ज्या ग्रॅम्पस् खडकावर सेंट

जॉन जहाज आपटून बुडालें, तो खडक त्यांच्या दृष्टीच्या अगदीं टप्प्यांत होता. पण एवढें असूनहि जगांत कुठें कधीं जहाज फुटलेंच नाहीं अशा समजुतीनें व निर्विकार वृत्तीनें ते आपलें कार्य करीत होते. जहाज फुटलें आहे ही गोष्ट त्या म्हाताऱ्याच्या कानावर गेली होती. एवढेंच नव्हे, तर त्याबद्दलची बरीचशी हकीगतहि त्याला समजली होती. परंतु ती घटना घडल्यापासून आपण कांहीं तिकडे वळलों नाहीं असें तो म्हणाला. त्याला फक्त त्या सांचलेल्या लव्हाळ्यांशीं कर्तव्य होतें. (लव्हाळ्याचे दोन-तीन प्रकारहि त्यानें सांगितले.) आणि तीं लव्हाळीं गाडींत भरून तो आपल्या शेतवाडीवर नेत होता. लाटांनीं आणून टाकलेली तीं प्रेतें त्याला अवांतर लव्हाळ्यासारखींच वाटत होतीं; पण तीं त्याच्या उपयोगाचीं नव्हतीं.

मागाहून आम्ही बंदरांतील लाइफ बोटीकडे आलों. पुन्हा तांतडीनें जावें लागल्यास तयारी असावी या दृष्टीनें ती सज्ज राहिली होती. संध्याकाळीं मग आम्ही कांहीं अंतरावरून गेलेली स्मशानयात्रा पाहिली. अगदीं पुढें कप्तान व त्याच्याबरोबर वांचलेले इतर लोक चालले होते.

एकंदरींत तें दृश्य कांहीं माझ्या अपेक्षेप्रमाणें तितकेंसें मला परिणामकारक वाटलें नाहीं. पुळणीवर कुठेंतरी आड बाजूला एखादें प्रेत मला आढळलें असतें, तर, त्याचा परिणाम माझ्यावर अधिक झाला असता. एकप्रकारें मला तो वादळी वारा व त्या लाटा यांच्याबद्दलच सहानुभूति वाटूं लागली. कारण तीं बिचारीं मानवी प्रेतें लोटीत लोटीत व छिन्नविच्छिन्न करीत किनाऱ्यावर नेऊन टाकण्याची त्या दिवसाची त्यांची जणूं कांहीं कामगिरीच होऊन बसली होती. हाच जर निसर्गाचा कायदा असेल, तर दहशत घेण्यांत किंवा कींव करीत राहण्यांत वेळ दवडण्यांत काय अर्थ आहे? शेवटचा दिवस आला असतां, स्नेह्यासोबत्याची होणारी फारकत किंवा व्यक्ती-व्यक्तींचें धूसर भवितव्य यांजबद्दल आपण फारसें लागून घेतां नये. सर्वसाधारणपणें मानवाच्या वांट्याला येणाऱ्या गोष्टींना अपवाद ठरून जोंपर्यंत तीं कोणत्याहि प्रकारें आपणाला बाधक ठरत नाहींत, तोंपर्यंत, रणांगणावर साचतात तशीं कितीहि प्रेतें सांचलीं तरी हरकत नाहीं. सर्व स्मशानभूमि एकवटल्या, तर त्या नेहमींच बहुसंख्य ठरतील. खासगीदृष्ट्या व्यक्तीला आपल्या सहानुभूतीची आवश्यकता असते. आपल्या आयुष्यभरात माणसाला फक्त एकाच स्मशानयात्रेला हजर राहणें, व एकच प्रेत पाहणें शक्य असतें. तरीहि त्या किनाऱ्यावरचे रहिवाशी ह्या घटनेमुळें बिलकुल विचलित झाले नाहींत असें मला आढळून आलें.

ह्या मृतदेहांची काय पर्वा करायची? खरोखरी, कीडमुंग्या किंवा मासे यांच्याशिवाय त्यांचा दुसरा कोणी स्नेहीसोबती नाहीं. त्यांचे मालक—कोलंबस व इतर संशोधक प्रवाश्यांसारखे नूतन जगाकडे येत होते. एवढेंच नव्हे, तर किनाऱ्यापासून मैलाच्या टप्प्यांत ते येऊन पोंचले होते. परंतु किनारा गांठण्यापूर्वींच, कोलंबसाच्या स्वप्नींहि नसेल अशा अधिक नूतन जगांत जाऊन दाखल झाले होते. मात्र, ह्या बाबतींत कोलंबसाहून विज्ञानानें अजून अधिक कांहीं शोधून काढलें नसलें तरी, अशा प्रकारचें जग अस्तित्वांत आहे याला कितीतरी सार्वत्रिक स्वरूपाचा व खात्रीलायक पुरावा आहे. किनारा गांठणारे त्यांचे पोकळ लङ्ख देह मी पाहिले; परंतु दरम्यान ते स्वतः आणखी दूरवर पश्चिमेकडील कोणत्या तरी किनाऱ्यावर जाऊन पडले होते. त्याच किनाऱ्याकडे आपण सर्वजण वळत आहोंत नि सरते शेवटीं तोच गांठणार आहोंत; मग तो कदाचित् त्यांच्यासारखा वादळा-अंधारांतूनहि आपण गांठूं. जहाज फुटून पुन्हा ते जीवनांत येऊन ठाकले नाहींत याबद्दल आपण ईश्वराचे निःसंशय आभार मानले पाहिजेत. देहापासून फारकत करून घेणें कठिण तर खरेंच; परंतु एकदां तो देह गेल्यावर त्याच्याविना चालवून नेणें तसें सोपें आहे. त्यांच्या सर्व योजना व आशाआकांक्षा बुडबुड्यासारख्या फुटून गेल्या. खवळलेल्या अटलांटिक महासागरानें डझनावारी अर्भकें खडकांवर नेऊन आदळलीं. छेः छेः!... सेंट जॉन जहाजानें जरी इथें बंदर केलें नाहीं, तरी त्याला तिथला संदेश आलाय् खास. कितीहि जोरदार वारा असला तरी तो कांहीं चैतन्याला डळमळवूं शकत नाहीं. तो चैतन्याचा श्वासोच्छ्वास आहे. न्यायी मनुष्याचें उद्दिष्ट एखाद्या ग्रॅम्पसच्या किंवा भौतिक खडकावर तडकूं शकणार नाहीं; तर उलट स्वतः यशस्वी होईपर्यंत तेंच खडक तडकावून टाकील.

# रविवार*

*कॉन्कॉर्ड आणि मेरीमॅक् या नद्यांवर थोरो व त्याचा भाऊ जॉन यांनीं जी सफर एक आठवडाभर केली, तिजबद्दलचें वर्णन थोरो यांनीं ज्या दैनंदिन निबंधांत केलेलें आहे त्यांचा हा संग्रह आहे. रविवार हा या निबंधमालिकेचा मुख्य भाग; तो कांहीं ठिकाणीं गाळून दिलेला आहे. सफरीचा पहिला दिवस होता शनिवार.*

## *शनिवार*

शेवटीं, १८३९ सालच्या ऑगस्ट महिन्याच्या अखेरच्या दिवशीं—शनिवारीं आम्ही दोघे भाऊ —कॉन्कॉर्डचे रहिवासी, नदीवरील ह्या बंदरांतून सफरीवर निघालों. झिमझिमत्या उबदार पावसामुळें सकाळ धूसर बनली होती; व त्यामुळें सहाजिकच आमची सफर लांबणीवर पडण्याची पाळी आली होती. परंतु अखेर एकदांचीं पानें नि गवतें वाळलीं; आणि निसर्गानें स्वतःची एखादी महान् योजना परिणतावस्थेस न्यावी, त्याप्रमाणें प्रसन्न व ताजीतवानी वाटणारी अशी सौम्य संध्याकाळ आम्हाला लाभली. छिद्राछिद्रांतून बराच काळ झिरपल्यामुळें पूर्वीपेक्षां अधिक निकोपपणानें ती पुन्हा श्वासोच्छ्वास करूं लागली. म्हणून मग आम्ही आमची नौका कांठावरून जोरानें लोटून हांकारली. त्यावेळीं लव्हाळ्यांनीं आम्हाला लवून अभिवादन केलें, नि एक प्रकारें 'शुभास्ते पंथानः' अशी शुभेच्छा व्यक्त केली. आम्ही संथपणें प्रवाहाच्या उताराला लागलों.

## *रविवार*

अगदीं दक्षिणेकडे एक सुरेख नदी पसरल्याचें रेड इंडियन लोक आम्हाला सांगतात. ते तिला म्हणतात मेरीमॅक.

* 'ए वीक ऑन् दि कॉन्कॉर्ड ॲण्ड मेरीमॅक् रिव्हर्स' मधून.

सकाळीं ती नदी नि जवळपासचा प्रदेश यांवर दाट धुकें पसरलेलें होतें. त्यामधून आमच्या विस्तवाचा धूर, अधिकच सूक्ष्म धुक्यासारखा वलयावलयांनीं वर वर चढत होता. परंतु आम्ही फारशीं वल्हीं मारलीं नाहींत, तोंच सूर्य उगवला आणि धुकें सरासर वितळलें. फक्त जलपृष्ठावर वेडीवांकडी रेंगाळणारी किरकोळ वाफ तेवढी उरली. ती रविवारची निवांत सकाळ होती. पिवळ्या प्रकाशापेक्षां उपेची लाली व शुभ्रता यांनीं ती विनटली होती.

परंतु सकाळ जो प्रभाव पाडते तो सकाळच्या दंवाबरोबरच नाहींसा होतो. आणि कोणतीहि गोष्ट कितीहि जतन करून ठेवणारा मर्त्य मनुष्य दुपारपर्यंत कांहीं सकाळच्या टवटवीतपणाची आठवण जपून ठेवूं शकत नाहीं. निरनिराळ्या बेटां-जवळून, किंवा जीं झऱ्यांतील बेटें होतीं त्यांजजवळून, प्रवाहाच्या उतरतीकडे पाठ करून वल्हीं मारीत जसजसे आम्ही जाऊं लागलों तसतशीं आम्ही त्यांना कांहीं ना कांहीं नांवें देऊं लागलों. एका बेटावर आम्ही मुक्काम ठोकला होता, त्याला आम्ही 'फॉक्स आयलन्ड' (कोल्ह्याचें बेट) म्हणूं लागलों. तर, दुसरें एक सुंदर, दाट जंगलानें व्यापलेलें, खोल पाण्यानें वेष्टिलेलें, द्राक्षवेल पसरलेलें बेट होतें. लाटांवर हिरव्यागार झुडपांचा व फुलांचा ढीग पडलेला असावा तसें तें दिसत होतें. आम्ही या बेटाला 'ग्रेप आयलन्ड' (द्राक्ष बेट) म्हणूं लागलों. बॉलस हिलपासून थेट बिलेरिका प्रार्थनागृहापर्यंत नदीचें पात्र, कॉन्कॉर्डमध्यें आहे त्याहून दुप्पट रुंद होतें. खोल, गढद, संथ प्रवाह—कधीं निवांत डोंगरांमधून, तर कधीं पहाडांमधून, दुतर्फा असलेल्या दाट झाडीमधून वाहत जातो. वाळुंजाच्या झाडांनीं किनारलेलें, जंगलांतलें एक लांबच लांब सरोवर होतें तें. दूरदूरच्या टप्प्यांवर आम्हाला नाहीं दिसलें कुठें घर, लागवडीस आणलेली जमीन, कीं जवळपास कुठें मनुष्यवस्ती असल्याची एखादी निशाणी.

अशा प्रकारें, द्राक्षांच्या व फुलांच्या बारीक बारीक लतापल्लवांच्या नवनव्या झुबक्यांमधून आम्ही पाणी कापीत जात असतांना पाण्याचा पृष्ठभाग इतका निश्चल होता, आणि हवा व पाणी दोन्ही इतकीं पारदर्शक होतीं कीं, एखाद्या पाणकावळ्याच्या किंवा रॉबीन पक्षाच्या नदीवरील उड्डाणाचें खालच्या पाण्यांतील प्रतिबिंब वरच्या आकाशांतल्याप्रमाणेंच स्पष्ट दिसत होतें. पक्षी जणूं कांहीं पाण्यांत बुडालेल्या राईंतून उडून लवत्या फांद्यांवर जाऊन बसत होते, आणि त्यांच्या लकेरी जणू तळांतून उठत होत्या. पाण्यावर जमीन तरंगत होती, कीं जमिनीनें पाणी आपल्या वक्षःस्थलावर धारण केलें होतें याचाच आम्हाला संभ्रम पडला होता.

हवा इतकी लवचिक व स्फटिकासारखी बनली होती कीं, एखाद्या चित्रावर कांच बसवल्याप्रमाणें सृष्टीच्या देखाव्यावर तिचा परिणाम झाला होता व त्याला आदर्श दूरत्व नि पूर्णत्व प्राप्त झालें होतें. सृष्टीचा तो देखावा सौम्य नि प्रशान्त प्रकाशांत न्हाऊन निघाला होता.

आपलें सर्वच जीवन व त्याची कलाकुसर अशींच सुरेख व सुस्पष्ट कां असूं नयेत बरें ? आपल्या सर्वांच्या जीवनांना सुयोग्य पार्श्वभूमि पाहिजे. तीं निदान, एखाद्या तपस्व्याच्या जीवनाप्रमाणें, वाळवंटांतील वस्तू दिसतात तशीं, किंवा अमर्याद क्षितिजाच्या पार्श्वभूमीवर एखादा मोडका खांब वा ढांसळता तट दिसावा तशीं दिसायला परिणामकारक असावींत. हा लाभ व्यक्तिमत्व स्वतःच नेहमीं उठवतें. आणि त्यामुळें लगतच्या किंवा क्षुल्लक गोष्टींपासून तें वेगळें राहतें,–मग ह्या गोष्टी वस्तू असोत किंवा व्यक्ती असोत.

आरशासारखा तो पाण्याचा पृष्ठभाग आमच्या नौकेनें विचलित करायचा म्हणजे थोडीशी दांडगाईच होणार होती. कारण, त्या पाण्यांत फांदीन् फांदी आणि गवताचें पातेंन् पातें इतकें हुबेहुब प्रतिबिंबित झालें होतें कीं, कलेला त्याचें अनुकरण करणें दुर्लभ होतें. खरें म्हणजे निसर्गच स्वतःची अतिशयोक्ति करूं जाणें. अत्यंत उथळ असलेल्या संथ पाण्याच्या खोलीचा अंत लागत नाहीं. जिथें जिथें वृक्षराजी व आकाश प्रतिबिंबित झालीं आहेत तिथें तिथें अटलांटिक महासागराहूनहि अधिक खोली असते. आणि एवढें असूनहि कल्पना कुठें उथळ तळावर जाऊन ठोकर खाईल हा धोका नाहीं केवळ नदीचा तळ आपण ज्या दृष्टीनें पाहतों त्याहून, प्रतिबिंबित झाडें व आकाश पाहण्याची दृष्टि, वेगळा हेतु असलेली अधिक खुली, अलिप्त, व निर्विकार असायला हवी हें आपल्या लक्षांत येतें.

जातां जातां, दोन माणसें एका होडक्यांत बसून चाललेलीं आम्हीं पाहिलीं. आकाशांत उडत जाणाऱ्या पिसाप्रमाणें किंवा फांदीवरून तुटून अलगद पाण्यांत पडलेल्या पानाप्रमाणें झाडांच्या प्रतिबिंबामधून, मागें वळून न पाहतां मारे डौलानें ते तरंगत जात होते. त्यांचें तें तरंगणें म्हणजे नैसर्गिक तत्त्वज्ञानांतील एक सुंदर, यशस्वी प्रयोग होता. दर्यावर्दीपणाच्या कलेचें उदात्त स्वरूप आमच्या दृष्टींत बिंबवण्याचें कार्य त्यानें केलें. कारण, जसे पक्षी उडतात किंवा मासे पोहतात तशीं हीं माणसें नौकानयन करीत होतीं. मनुष्याच्या सर्व कृती कितपत न्याय्य व उदात्त होऊं शकतील याची प्रचीति आम्हाला यावरून आली. एवढेंच नव्हे, तर आपलें जीवन, संबंध अर्थरचनात्मक दृष्ट्या कलेच्या किंवा निसर्गाच्या सर्वोत्तम कृतींसारखेंच सुंदर होऊं शकेल, हेंहि कळून चुकलें.

जुनाट भुऱ्या पहाडांवर ठाण मांडून बसलेला सूर्य कोपऱ्याकोपऱ्यांतून दृष्टिक्षेप करीत होता; तर मजेदार हवा-उजेडांत लव्हाळीं खूष होऊन गेलेलीं दिसत होतीं; किरणें आरामशीरपणें हवापाणी चाखीत होतीं; बेडूक, एक डोळा सोनेरी सूर्याकडे लावून व पायाचें एक बोट बोरूच्या काटकीवर ठेवून जणूं चिंतनांत मग्न झाले होते;—ज्या आश्चर्यकारक विश्वांत ते आपली कामगिरी बजावतात त्या विश्वाला जणूं काय ते डोळ्यांनीं खुणावीत होते. कुमारिका चर्चला जातात त्याप्रमाणें मासे विशेष गंभीरपणानें व धीमेपणानें पोहत होते; सोनेरी व रुपेरी मासोळ्याचे घोळके आकाशाचें दर्शन घेण्यासाटीं मधूनच जलपृष्ठावर येत, आणि मग डुबक्या देऊन आजूबाजूला सुळ्‌कन् पळून जात. एकाच मनाच्या नियंत्रणा-खालीं असल्याप्रमाणें ते एकदम झपाट्यानें पळत होते. ते सारखे एकामागून एक सुळ्‌कन् पुढें पुढें सरकत होते खरे; पण एवढें असूनहि आपल्या पलटणीचा आकार बदलूं न देतां तो ते कायम राखीत होते. सर्व पिलावळ एकत्र धरून ठेवणाऱ्या एखाद्या पारदर्शक कातडीनें जणूं कांहीं त्यांना कवटाळून धरलें होतें;—छोटी छोटी बहीणभाऊ आणि मंडळी आपापले नव्यानें फुटलेले इवलाले पंख कसे काय काम देतात तें हालवून पहात—कधीं जागच्या जागीं गिरगिरत, तर कधीं पुढें सुळकांडी मारीत होती. आणि जेव्हां आम्ही त्यांना किनाऱ्याकडे हांकून लावलें व त्यांची फारकत केली, तेव्हां ते युक्ति लढवून मोठ्या शिताफीनें नौकेखालीं निसटले. जुन्या लांकडी पुलांवरून कोणी प्रवासी जात नसे. साहजिकच नदी व मासे खालच्या खांबां-कमानींमधून खुशाल संथपणें जात.

जंगलाच्या मागें थोड्या अंतरावर बिलेरिका नांवाचें एक गांव होतें. फार पूर्वीं कांहीं वसलेलें नाहीं. प्रारंभीं स्थायिक झालेल्या लोकांचींच नांवें मुलांना अद्यापि दिलेलीं दिसतात. तें इतकें नवीन असल्याचें मी कांहीं ऐकलें नव्हतें. इथला निसर्ग जीर्ण झालेला, शेतें सर्व धुपून गेलेलीं, आणि प्रार्थनागृहाला वयोमानानुसार जुनी, पडकी अवकळा प्राप्त झालेली दिसत नव्हती का? त्याच्या तारुण्यावस्थेची हकीगत समजून घ्यायची असली, तर कुरणांवरील त्या जुनाट भुऱ्या खडकांना विचारा. त्या प्रार्थनागृहांत एक घंटा आहे. तिचे निनाद कधीं कधीं कॉन्कॉर्ड जंगलापर्यंत जाऊन पोंचतात. मी ऐकलंय्—हां, हें पहा, ऐका तुम्हीच. अशा प्रकारच्या ह्या आवाजानें प्रारंभीं स्वप्नाळू रेड इंडियन माणसें दचकून उठलीं असलीं, आणि त्यांची शिकार घाबरून पळून गेली असली तर त्यांत कांहीं नवल नाहीं. परंतु आज मात्र ह्या डोंगरा-पहाडांत नि जंगलांत घंटेचे हे पडसाद घुमलेले ऐकायला मला मोठी मौज वाटते.

दुसऱ्या बाजूला, कार्लाइल ह्या जंगलवजा शहरापर्यंत रस्ता जातो. हें शहर कमी नागरी असलें तरी अधिक नैसर्गिक आहे. तेथील जमीन चांगली शाबूत आहे. छोटेंसें शहर आहे म्हणून त्याचें हंसें होतें हें मला माहीत आहे. परंतु एवढें असूनहि तिथें कधींहि मोठीं माणसें जन्मू शकतील, असें तें ठिकाण आहे. कारण, चांगले व वाईट वारे भेदभाव न करतां ह्या शहरावरून खुशाल वाहतात. शहरांत एक प्रार्थनागृह असून घोड्याच्या पागाहि आहेत. त्याचप्रमाणें एक पथिकाश्रम व लोहाराचें दुकान आहे, आणि तोडाय्–सवरायला अजून बरेंचसें जंगल उपलब्ध आहे.

ह्या ब्रिलेरिका गांवीं सालोसाल निवडक अशा भक्कम माणसांचा रहिवास झाला असला पाहिजे.—निदान गांवकारकुनांची परंपरा तरी निर्माण झाली असेल. अन् शिवाय तुम्हांला संशोधन करतां येईल अशीं जुनीं कागदपत्रें तिथं आहेत. एका वसंतऋतूंत गोरा माणूस आला व आपल्यासाठीं त्यानें घर बांधलें. सूर्यप्रकाश आंत यावा म्हणून त्यानें जागा मोकळी केली. एक शेत सुकवून तयार केलें. जुनेपुराणे भुरे दगडधोंडे रचून कुंपणें बनविलीं. निवासस्थानाभोंवतालचीं पाईनचीं झाडें तोडलीं. पूर्वींच्या प्रदेशांतून आणलेलें बगिच्यांतील रोपट्यांचें बीं रोवलें. आणि रानटी पाईन व जुनीपर वृक्षांच्या बरोबरीनें नागरी सफरचंदाचें झाड, रानभर सुवास दरवळीत मोहरावें म्हणून प्ररिश्रम केले. त्यांचा जुना सांठा अजून शिल्लक उरलाय्. रानांतून व नदीकांठावरून सुरेख एल्म झाडें त्यानें खुडलीं, आणि गांवांतील आपला टापू अगदीं सफाईदार व नितळ केला. नदीनाल्यांवर त्यानें दांडगाईनें पूल बांधले. रानटी गवत कापून काढलें. विळे-कोयते पाजळून हरणां-अस्वलांना भिववून सोडलें. त्यानें एक गिरणी उभारली, आणि पडित जमिनींत इंग्लिश बियाण्याचीं शेतें उगवलीं. तिथल्या रानटी फुलांच्या ताटव्यांमध्येंच विविध इंग्लिश फुलांचें बीं त्यानें पेरलें. आणि अशा प्रकारें त्यानें गांव वसवलें.

गोरा माणूस येतो तो झोपाळू बुद्धिमत्तेचा पण विचारी असतो. स्वतःच्या ज्ञानाची त्याला नीट कल्पना असते. सत्ताधाऱ्याशीं आज्ञाधारकपणें वागण्याची त्याची वृत्ति असते. एका अनुभवी वंशाचा हिशेबी वृत्तीचा वंशज असतो तो. त्याचें व्यवहारी ज्ञान आश्चर्यकारक असतें. आळशी पण कार्यक्षम, धीमा पण चिकाटीचा, कडक पण न्यायी, अल्प विनोदबुद्धीचा पण अस्सल; शिकार व खेळ यांजबद्दल तिरस्कार असलेला पण कामसू माणूस असतो तो. रेड इंडियन लोकांकडून तो हरणाच्या कातड्याचे बूट–टोपल्या खरीदतो, त्यांचे शिकारीचे टापू

विकत घेतो; आणि शेवटीं, आपलें दफन कुठें करण्यांत आलें हें तो विसरतो आणि नांगराच्या फाळानें स्वतःचींच हाडें उकरून काढतो.

मध्य व्हिलेरिकाच्या समोर जेव्हां आम्ही होतों, तेव्हां दोहों बाजूंकडील शेतजमिनी आम्हाला मऊसर व कमावलेल्या इंग्लिश थाटाच्या दिसल्या. तेथील लोक शांततेचें व नागरी जीवन व्यतीत करीत होते. रहिवाशी निव्वळ शेतकरी होते, व सुसंघटित सरकारच्या कारभाराखालीं रहात होते.

मक्याच्या शेतांत दरसाल उगवणारीं पाइनचीं झाडें पाहून मी उत्साहभरित होऊन जातों. रेड इंडियन माणसाला सुधारून नागरी बनविण्याच्या गोष्टी आपण बोलतों. पण त्याच्या सुधारणेला हें नांव योग्य नव्हे. सावधानतेनें वागायचें स्वातंत्र्य आणि त्याच्या मंद रानटी जीवनाचा अलिप्तपणा यांमुळें आपल्या गांवठी दैवतांबरोबरचे संबंध तो कायम राखतो; आणि वेळोवेळीं, दुर्मिळ व विवक्षित अशा निसर्गप्रणीत समाजजीवनाशीं एकरूप होऊन जातो.

ग्रामीण जीवनाच्या कांहीं सात्त्विक मौजा असतात हें तर खरेंच. आणि कधीं कधीं जमिनींतून पिकाचें जास्त उत्पादन काढण्यांत व हंगामांत तें पीक गोळा करण्यांत मोठी गंमत असते. मात्र, आमच्या कवींनीं गायिलेलीं आहेत त्याहून निराळीं, रानटी, व अधिक प्राचीन अशींही कांहीं निसर्गाचीं अंगें आहेत. ती कविता केवळ गोऱ्या माणसाची आहे. होमर व ओशिअन हे कवीसुद्धां लंडन किंवा बॉस्टनमध्यें कधींहि पुनरुज्जीवित होऊं शकणार नाहींत. आणि एवढें असूनहि केवळ परंपरेमुळें किंवा ह्या रानटी फळांच्या अर्धवट दरवळत गेलेल्या स्वाद-सुवासामुळें हीं शहरें कशीं पुनरुत्साहित झालेलीं आहेत पहा. रेड इंडियन माणूस गुणगुणत असलेल्या गाण्याचे सूर आपण क्षणभर कान देऊन ऐकले, तर, सुधारणेच्या बदली आपला रानटीपणा सोडून द्यावयाला तो कां कबूल होणार नाहीं हें आपल्या लक्षांत येईल. राष्ट्रें लहरी नसतात. पोलाद व पांघरायचीं ब्लँकेट्स् ह्यांचा मोह टाळणें कठिण असतें हें खरें, पण रेड इंडियन म्हणून राहण्यांतच रेड इंडियन माणसाला हिताचें वाटतें.

माझ्या बैठकीच्या खोलींत बसून, कवींचें काव्य वाचीत बरेच दिवस घालवल्यानंतर एका भल्या पहांटे मी बाहेर पडलों. सगळीकडे धुकें पसरलें होतें. अशा वेळीं, विज्ञान किंवा वाङ्मय यांनीं ज्याचें संशोधन केलेलें नाहीं अशा, शहरांतील जमिनीच्या टापूपलीकडल्या, सरावांतल्याहून वेगळ्या निसर्गातून ऐकूं यावें त्याप्रमाणें, शेजारच्या झाडींतून घुबडाचें ओरडणें माझ्या कानीं आलें. जंगल किती प्रचंड व घनदाट असतें याबद्दलच्या माझ्या लहानपणींच्या कल्पनांची

प्रचीति पक्ष्यांच्या जातींतील एकाहि प्राण्यानें मला आणून दिलेली नाहीं.

कॉन्कॉर्ड नदीचा प्रवाह बंद पडल्यासारखा संथ आहे. परंतु चिंतनशील प्रवाशाला त्याचा देखावाच अधिक सूचक वाटतो. आणि ह्या दिवशीं तर त्याचें पाणी प्रतिबिंबांनीं व्यापून गेलेलें होतें. त्या मानानें आमची नोंदसुद्धां कांहींच नव्हे. बिलेरिका येथील धबधब्याशीं जाऊन पोंचण्याच्या जरा आधीं ती आंखडते आणि अधिक वेगवान व उथळ बनते. यावेळीं तिचा तळ गोट्यांनीं भरलेला पिवळा पिवळा बनतो.—कालव्यांतून जाणारी नौकाहि त्यांतून जेमतेमच गेली असती. वरचा अधिक रुंद व अधिक संथ भाग मात्र डोंगरावरील सरोवरासारखा दिसत होता. सबंध कॉन्कॉर्ड, बेडफोर्ड व बिलेरिका कुरणांमधून जातांना तिच्या प्रवाहाची खळबळ आम्हाला कुठेंहि ऐकूं आली नाहीं. फक्त जिथें एखादी उपनदी तिच्यांत घुसलेली आहे तिथें काय खळबळ ऐकली असेल तेवढीच.

परंतु आतां मात्र ही संथ, गंभीर व प्राचीन नदी एखाद्या ओहोळासारखी उडी घेत असलेली आमच्या कानीं पडली. अगदीं बिलेरिका धबधब्याच्या वर आम्ही तिची खाडी सोडली आणि कालव्यांत प्रवेश केला. ह्या कालव्यांतून ती धांवत होती म्हणण्यापेक्षां तिचा प्रवाह नेला गेला होता—तो थेट, मिडलसेक्स-मधील मेरीमॅकपर्यंत तब्बल सहा मैल जंगलांतून. आणि आमच्या पर्यटनांतील ह्या टापूंत रेंगाळत राहण्याची आमची इच्छा नसल्यानें आमच्यापैकीं एकजण किनाऱ्याच्या कडेनें दोरखंडानें धरून होडी ओढीत धावूं लागला; तर दुसरा, होडी किनाऱ्याला आदळूं नये म्हणून काठीनें ती सांवरूं लागला. आणि अशा प्रकारें आम्ही तें सबंध अंतर तासापेक्षां किंचित् जास्त वेळांत तोडलें. हा कालवा देशांतील सर्वांत जुना असून विशेष आधुनिक रेल्वेरस्त्यांच्या बाजूला तर तो अगदीं जुनापुराणा वाटतो. कॉन्कॉर्ड नदीकडूनच त्याला पाणीपुरवठा होत असल्यानें तिच्या सरावलेल्या पाण्यावरच एक प्रकारें अजून आम्ही तरंगत होतों. दळणवळणादि व्यापारी फायद्यासाठीं एवढें हें पाणी ही नदी भाड्यानें देते. परंतु ज्या जंगलांतून व कुरणांतून हा कालवा नेला आहे, त्यांच्या बरोबरीचें ह्याचें वयोमान नसल्यानें ह्याच्या देखाव्यांत तेवढासा मिलाफ झाल्याचें आढळून येत नाहीं. त्यामुळें जमीन व पाणी यांजवर कालाचा जो तडजोडीचा प्रभाव पडतो त्याच्या दर्शनाला आम्ही मुकलों. परंतु युगें लोटतील तसतसा निसर्ग उणीव भरून काढून भरपाई करील, आणि हळूहळू त्याच्या किनाऱ्यांवर शोभतील अशीं झुडुपें व फुलझाडें लावील. पाण्यावरील पाईन झाडावर पाणकावळा आधींच बसलेला असून खालीं पाण्यांत मासे पोहतहि

१०२७१

आहेत. अशा प्रकारें, पूर्णावस्था प्राप्त होण्यासाठीं कारागिराच्या हातून सर्व कामगिऱ्या जाऊन त्या थेट निसर्गाच्या स्वाधीन होतात.

हा रस्ता निवांत व सुखावह होता. नव्हतीं कुठें घरें कीं कुणी प्रवासी. चेम्सफोर्ड येथील पुलावर कांही तरुण मंडळीं उगाच भटकत होती तेवढीच. कठड्यांवर रेलून निर्लज्जपणानें आमच्याबद्दल नसत्या चांभारचौकशा ती मंडळी करूं लागली, तेव्हां त्यांच्यापैकीं विशेष धिटाई दाखवणाऱ्या मनुष्याच्या दृष्टीला आम्ही दृष्टि भिडवली, आणि असें रोखून पाहिलें कीं, कसंसंच वाटून शेवटीं तो नरमलेला दिसला. आमच्या दृष्टींत कांहीं विशेष प्रभाव होता असें नव्हे; पण त्याच्यांत लाजलज्जेची जी कांहीं भावना उरली होती तिनें त्याला हतबल केलें.

मेरीमॅकला पोंचण्याच्या जरा आधीं, कालव्यावरच्या शेवटच्या पुलाखालून आम्ही जाऊं लागलों, तेव्हां चर्चमधून बाहेर पडलेली मंडळी थांबून वरून आमच्याकडे पाहूं लागली, आणि रूढी इतकी प्रबल आहे कीं, तिला अनुसरून ती धर्मबाह्य तुलना करण्यांत रंगून गेलेली दिसली. परंतु, लख्ख सूर्यप्रकाश पडलेल्या त्या निरभ्र दिवसाचें निरीक्षण आम्ही सचेतपणानें करीत होतों.

एखाद्या माणसाला त्याची चूक तुम्ही त्याच्या आयुष्यभरांत क्वचितच पटवूं शकाल. म्हणून, विज्ञानाची प्रगति सावकाश होते असा जो समज आहे त्यावर आपण समाधान मानलें पाहिजे. त्या मनुष्याची खात्री पटली नाहीं, तरी त्याच्या नातवंडांची पटण्याचा संभव आहे.

सुधारलेल्या देशांत सामान्यतः जो देव पुजला जातो, त्याला ईश्वरी नामाभिधान असलें तरी त्याच्यांत देवत्व असतें असें मला वाटत नाहीं. तर मनुष्यजातीची अनिवार सत्ता व आदरणीयता त्याच्या ठिकाणीं एकवटलेलीं आहेत. माणसें एकमेकांबद्दल पूज्यबुद्धि बाळगतात, अद्याप देवाबद्दल नाहीं. ज्यांच्या त्यांच्या परिस्थितीला अनुरूप असे त्या त्या लोकांचे देव असतात. 'सोसायटी' बेटावरील रहिवाश्यांचा टोआहिट्ट नांवाचा देव होता "कुत्र्या-सारख्या आकाराचा; डोंगराखडकांवरून किंवा झाडांवरून कोसळण्याच्या बेतांत असलेल्यांना त्या धोक्यांपासून त्यानें वांचवलें." मला असें वाटतें कीं, त्याच्या-शिवाय आपलें चालूं शकेल; कारण, आपल्याला कांहीं फारशी चढण्याची कामगिरी बजावायची नाहीं. त्यांच्यांतील एखाद्या माणसाला थोडक्या अवधींत लांकडाच्या तुकड्यांतून देव घडवितां येई; पण तोच देव घाबरवून सोडून त्याची अक्कल गुंग करून सोडी.

तशा किती तरी, एवढेंच नव्हे, तर आश्चर्यकारक अशा धर्मश्रद्धा प्रचलित

आहेत. पण त्यांपैकीं एखादीलाहि आपण बिचकण्याचें कारण काय? मनुष्याची जी श्रद्धा तीच देवाची. एवढा दीर्घकाळ मी जगलोंय आणि एवढी विविध प्रकारची ईश्वरनिंदा मी ऐकलीय व पाहिलीय, पण प्रत्यक्ष नि बुद्धिपुरस्सर केलेली ईश्वरनिंदा किंवा अनादर मी कधींहि ऐकलीं नाहींत किंवा पाहिलीं नाहींत. ऐकल्या-पाहिलेल्या ईश्वरनिंदेचें स्वरूप बरेचसें अप्रत्यक्ष व सराईतपणाचें होतें. ज्या ईश्वरानें मनुष्याला निर्माण केलें त्याची प्रत्यक्ष व व्यक्तिगत अवहेलना करण्याचा गुन्हा करणारा मनुष्य आहे तरी कुठें?

आपलें जीवन दुर्घटनांनीं भरलेलें नाहीं असें म्हणावयाचें, तर त्याला कशा प्रकारचें म्हणायचें तेंच मला समजत नाहीं. जेजस ख्रिस्तासारखी कथा—जेरुस-लेमचा इतिहास हीं पाहिलीं तर तीं विश्वाच्या इतिहासाचीं एक भाग आहेत.

ख्रिस्ताच्या जीवनाचें सौंदर्य व महत्त्व यांची ओळख पटण्यासाठीं आपण ख्रिश्चन नसणें जरूर आहे. आपल्या ख्रिस्ताचा माझ्या बुद्धाच्या बरोबरीनें मी उल्लेख केल्याचें पाहून कांहींजणांचा माझ्यावर राग होईल हें मी जाणून आहें. तरीपण माझ्या बुद्धापेक्षां त्यांनीं आपल्या ख्रिस्तावर अधिक प्रेम करावें असें मला निश्चित वाटतें. कारण प्रेम हीच मुख्य गोष्ट आहे; आणि शिवाय ख्रिस्तहि मला आवडतो.

हें जग म्हणजे किती क्षुद्र व भिकार जागा आहे पहा!...त्यांत जीवन कंठण्या-साठीं आपल्याला उजेड मिळावा म्हणून दिवा पेटवायचा त्या पायींच आपला अर्धा काळ निघून जातो. हें झालें आपलें निम्में आयुष्य. परंतु तेंच सबंध ठरूं लागलें, तर हें धाडस कोण करील?

अत्यंत शहाणा मनुष्य असतो तो कोणत्याहि धर्मतत्त्वाची शिकवण देत नाहीं. त्याची कसली योजनाहि नसते. त्याला स्वर्गाला लागलेला एखादा वांसाच काय, पण एखादें कोळीष्टकसुद्धां दिसत नाहीं. सारें आकाश स्वच्छ—निरभ्र. जर मला एखादे वेळीं, दुसऱ्या एखाद्या खेपेपेक्षां अधिक स्पष्ट दिसलें, तर ज्या माध्यमांतून मी पाहतों तें त्यावेळीं अधिक स्वच्छ असलें पाहिजे.

मी कादंबरी कधींहि वाचीत नाहीं. कारण कादंबऱ्यांत खरेंखुरें जीवन व विचार तुरळकच असतात. कित्येक राष्ट्रांचे धर्मग्रंथ वाचायला मला सर्वांत जास्त आवडतें. मात्र, त्यांतल्या त्यांत हिंदु, चिनी व इराणी धर्मग्रंथांचें माझें विशेष वाचन झालें आहे. हिब्रूच्या धर्मग्रंथांचें त्याहून कमी;—त्याच्याकडे मी मागाहून वळलों. ह्यांपैकीं एखादें 'बायबल' मला द्या, म्हणजे मी आपला कांहीं काळ स्वस्थ बसलों समजा.

न्यू टेस्टॅमेंटमध्यें (नव्या करारांत) खिस्तानें केलेले बरेचसे आदेश–उपदेश प्रचलित व्यवहारांत अमलांत आणतां येण्यासारखे नाहींत. निश्चितपणें बोलायचें म्हणजे, "इतरांनीं तुमच्याशीं जसें वागावें अशी तुमची इच्छा आहे, तसें तुम्ही इतरांशीं वागा" हा उपदेशपर नियम कांहीं बहुमोलाचा म्हणतां येणार नाहीं. एकंदरींत ठीक आहे एवढेंच. प्रामाणिक माणसाला तर या नियमाशीं फारसें कांहीं कर्तव्यहि नाहीं. अशा बाबतींत कोणताहि नियम आंखलेला नसणें हीच गोष्ट मुळीं बहुमोलाची ठरेल. कांहीं गोष्टींची वजावट केल्याशिवाय तें पुस्तक जशाचें तसें स्वीकारण्यासाठीं मुळींच लिहिलेलें नाहीं. जगाच्या रंगभूमीवरील खिस्त हा एक उदात्त नट होता. "स्वर्ग व पृथ्वी हीं नाहींशीं होतील, पण माझे शब्द नाहींसे होणार नाहींत" असें जेव्हां त्यानें म्हटलें, तेव्हां त्याच्या मनांत कोणता विचार होता ह्याची त्याला जाणीव होती. अशा वेळीं मी त्याच्या सन्निध जातों. तरीसुद्धां जगावें कसें याबद्दलची अपूर्ण शिकवणच त्यानें मानव-जातीला दिली असें म्हटलें पाहिजे. त्याचे सर्व विचारच मुळीं पारलौकिकाकडे वळलेले. त्याला जो विजय अभिप्रेत आहे, त्याहून दुसरा प्रकारहि अस्तित्वांत आहे. ह्या जगांतहि आम्हांला एकप्रकारचा उदरनिर्वाह करावा लागतो, आणि आणखी कांहीं काळहि त्यासाठीं धडपड करावी लागणार आहे. अजून कितीतरी कठिण समस्या सुटावयाच्या आहेत, आणि चैतन्य व जड यांच्या झगड्यांतून जमेल तसें मानवी जीवन आम्हांला जगावयाचें आहे.

कोणत्याहि बाबतींत सज्जनपणानें न वागतांहि आपण सज्जन असावें अशी एकमेव इच्छा माणसें बाळगून असतात. कारण त्यांना असें अस्पष्टपणें वाटत असतें कीं, अखेरीला कदाचित् तेंच त्यांच्या हिताचें ठरेल.

एकदां एक पाद्री न्यू हॅम्पशायरच्या डोंगरभागांतील प्रार्थनागृहाच्या तबेल्या-कडे एका घोडक्याला हांकलून नेत होता. तो दिवस होता रविवारचा; आणि मी जात होतों डोंगरमाथ्यावर. म्हणून, त्या दिवशीं चर्चला जायचें सोडून भलतीकडे निघाल्याबद्दल त्यानें माझी खरडपट्टी काढली. खिस्ताच्या चौथ्या आदेशाचा मी भंग करीत असल्याचें त्यानें निक्षून सांगितलें; आणि अशा दिवशीं जेव्हां जेव्हां आपण एखादें साधें काम केलें तेव्हां तेव्हां कोणकोणती आपत्ती आपल्यावर ओढवली ह्याचें वर्णन तो शोकमग्न स्वरांत करूं लागला. जीं माणसें या दिवशीं धर्मबाह्य कामें करतात त्यांना चुकांत पकडून उलथून पाडण्याची कामगिरी ईश्वर करीत असतो अशी खरोखरच त्याची समजूत होती. ही धर्मभोळी समजूत देशभर पसरलेली आहे. म्हणूनच,

२५८९३ अनुक्रम १२०० रविवार वि:५ १७५९५ २५

जेव्हां एखाद्या गांवीं जावें, तेव्हां केव्हांतरी खरेंच नव्हे, तर सर्वसाधारणतः तेथील चर्च ही सर्वांत कुरूप इमारत दिसते. कारण, तिच्यांत मनुष्याची वृत्ति अत्यंत खालच्या अवस्थेला जाऊन पोंचते व अतिशय लाजीरवाणी बनते. अशा प्रकारच्या देवालयांनीं सृष्टीचे देखावे विद्रूप करण्याचें निश्चितपणें व लौकर सोडून द्यावें. प्रार्थनेच्या दिवशीं एखाद्या अनोळखी गांवाच्या रस्त्यावरून आपण जात असलों म्हणजे, वादळी वाऱ्यांत गलबतावरील अधिकारी ओरडतो तसा चर्चमध्यें प्रवचनकार पाद्री ओरडून आपल्या कर्कश आवाजानें भोंवतालचें एकंदर शांत वातावरण भ्रष्ट करून टाकीत असल्याचें आपल्या कानीं येतें. याहून विमनस्क करणारी व तिरस्करणीय गोष्ट विरळा.

एखाद्या रविवारीं, प्रवचनकाराच्या व्यासपीठावरून बोलण्याची मुभा मला द्या असें मीं मिडलसेक्सच्या पाद्याला सांगितलें, तर तो आक्षेप घेईल. कां,—तर मी त्याच्याप्रमाणें प्रार्थना करीत नाहीं म्हणून म्हणा किंवा मी धर्माधिकाऱ्याची दीक्षा घेतली नाहीं म्हणून म्हणा. ह्या गोष्टी अशा आहेत तरी काय, म्हणतों मी?

दुपारच्या वेळीं, मिडलसेक्स येथील, कालव्याच्या दरवाजांतून आम्हांला, गंभीर दिसणाऱ्या पण उदारवृत्तीच्या एका माणसानें, पॉटुकेट धबधब्याच्या अगदीं वरच्या बाजूला, मेरीमॅक नदींत सोडलें. वाचीत असलेलें पुस्तक बाजूला ठेवून तो शांतपणें आला. वास्तविक, रविवारीं ते दरवाजे उघडून देण्याची त्याची कामगिरी नसावी अशी आमची समजूत होती. दोघां प्रामाणिक माणसांसारखी योग्य व समान भूमिकेवरून त्याची-आमची दृष्टादृष्ट झाली. डोळ्यांच्या हालचालींतून परस्परांचें कायम स्वरूपाचें व अभावित सौजन्य प्रतीत होतें. असें म्हणतात कीं, लुच्चा माणूस तुमच्या दृष्टीला दृष्टि भिडवीत नसतो. त्याचप्रमाणें जणूं काय आपली कीर्ति प्रस्थापित करण्यासाठीं कीं काय, प्रामाणिक मनुष्यहि तुमच्याकडे सरळ पाहत नाहीं. दुसऱ्यांशीं दृष्टिभेट झाल्यानंतर आपली दृष्टि दुसरीकडे कधीं वळवावी हें न समजणारे कांहीं महाभाग मीं पाहिलेले आहेत. खरोखरीची आत्मविश्वासयुक्त व थोर मनोवृत्तीची व्यक्ति अशा प्रकारच्या दृष्टिभेटीच्या सामन्यांत प्रभुत्व संपादन करण्याच्या भरीस न पडण्याइतकी शहाणी असते. एकटे सापच काय ते आपली निश्चल, एकटक नजर लावून फत्ते करतात. माझा स्नेही माझ्या दृष्टीला दृष्टि भिडवतो व मला पाहून घेतो, बस् एवढेंच.

तर सांगायचें म्हणजे ह्या माणसांत व आमच्यांत लगेच निकटचें नातें निर्माण झालें. आणि आमचें फारच थोडें बोलणें झालें, तरीसुद्धां आमच्या-

बद्दलचें व आमच्या सफरीबद्दलचें कुतूहल त्याला वाटत असलेलें उघड दिसलें. उच्च गणितशास्त्राबद्दल त्याला आवड असल्याचें आम्हांला आढळून आलें.

मेरीमॅक नदीच्या विशाल वक्षःस्थळावरून, चेम्सफोर्ड व ड्रॅकुट यांच्या दरम्यान, सुमारें पाव मैल रुंदीचें पात्र दुपारच्या वेळीं आम्ही संथपणें कापीत चाललों असतां आमच्या वल्ह्यांच्या फटकाऱ्यांचे आवाज आजूबाजूच्या गांवांत प्रतिध्वनित होत होते; तसे तिकडील बारीक-सारीक आवाजांचे प्रतिध्वनी आमच्याकडे घुमत होते. एक-तृतियांश मैल अंतरावर आमची नौका जाते तों किनाऱ्यानजीकच्या एका झोंपडींतून आम्हांला कांहीं मुलांची प्रार्थनापुस्तकांतील प्रश्नोत्तररूपी घोकंपट्टी स्पष्ट ऐकूं आली. तर मधल्या रुंद पुळणीवर गायींचा एक कळप आपल्या अंगाभोवतीं शेपट्यांचे फटकारे मारीत, अंगावर बसलेल्या माश्यांशीं झटापट करीत असलेला दिसला.

ज्या भागांतून आमचा नौकाविहार चालला होता ती वस्तुतः युद्धाची व शिकारीची जुनी भूमि होती. शिकारी जमात व योद्धे यांचें प्राचीन वसतिस्थान, त्यांचे दगडधोंड्यांचे बंधारे, बाणांचीं टोकें, फरशाकुऱ्हाडी, आणि गोरे लोक येऊन त्यांनीं व्यापण्यापूर्वीं ज्या उखळींत रेड इंडियन लोक आपलें मका आदि धान्य कांडीत असत त्या उखळ्या व तीं मुसळें—सारें साहित्य नदीच्या तळाशीं चिखलांत दडलेलें होतें. त्या काळच्या उपलब्ध अवजारांनिशीं व पद्धतीनें ते जिथें मुबलक मासे पकडीत तीं ठिकाणें दंतकथेच्या स्वरूपांत अजूनहि दाखविण्यांत येत होतीं. ही कथा द्रुतगतीनें घडली असून इतिहासकाराला संकलित स्वरूपांत द्यावी लागेल.

अशा प्रकारें आम्ही न्यू हॅम्पशायर संस्थानांत प्रवेश करीत होतों; अनेकविध दऱ्याखोऱ्यांतून आलेल्या प्रवाहांमुळें जमलेल्या पुराच्या पृष्ठावर येऊन ठेपलों होतों. व्हाइट माउंटन या पर्वताच्या दुबेळक्यांतून उगम पावणारी पेमीजवॅसेट नदी व विन्नीपेसॉकी सरोवराला पाणी पुरवणारी त्याच नांवाची नदी ह्या दोहोंचा संगम होऊन मेरीमॅक किंवा स्टुरजॉन नदी बनलेली आहे. संगमापासून दक्षिणेस मॅसॅच्युसेट्सपर्यंत ७८ मैल वाहिल्यावर ती पूर्ववाहिनी बनून मग ३५ मैलांवर समुद्राला जाऊन मिळते. ढगांच्या वर व्हाइट माउंटनमधील ज्या खबदाडांतून तिचा झरा फुटतो तिथपासून प्लम आयलंडच्या पुळणीपाशीं सागराच्या खाऱ्या लाटांच्या तांडवांत जाऊन ती विलीन होते तेथपर्यंत मी तिच्या प्रवाहाचा मागोवा घेतला आहे.

वाटेंत ती ठिकठिकाणीं कोसळत जाते, पण अत्यंत सखल दरींत कोसळूनहि

तिचें धैर्य खचत नाहीं. अनेक सरोवरें, उपनद्या व व्हाइट माउंटनवरील वितळलेलें बर्फ यांच्या पाण्यानें परिपुष्ट झालेल्या ह्या नदीला, अॅमेस्बरी व न्यूबरी या शहरांच्या दरम्यान, एक-तृतियांश ते अर्धा मैल रुंदीचें पात्र असलेल्या विशाल व्यापारी नदीचें स्वरूप प्राप्त होतें. आतां तिचा किनारा पिवळट व ढांसळता नसून उंच उंच हिरव्यागार टेकड्या व कुरणें ह्यांनीं वेढलेला असतो. अधूनमधून कांहीं शुभ्र भगदाडें पडलेलीं असतात तिथें कोळी आपलीं जाळीं टाकतात. आगबोटींतून ह्या भागाची सफर मीं केलेली आहे; आणि दूरवरच्या किनाऱ्यापाशीं आपलीं जाळीं ओढीत असलेले कोळी डेकवरून पाहण्यांत किती मौज असते तेंहि अनुभवलें आहे. त्यानंतर सुप्रसिद्ध चेन पुलाखालून जात न्यूबरीपोर्ट बंदराला लागेपर्यंत अधूनमधून, जुने लांकूडसामान भरलेलें एखादें गलबत, भरतीची वा अनुकूल वाऱ्याची वाट पहात, हॅवरहिलपाशीं नांगर टाकून पडलेलें कधींकधीं आढळतें.

न्यूबरीपोर्टच्या उंच मनोऱ्यावरून पाहिल्यास ही नदी आंतल्या ग्रामीण भागांत दूरवर पसरलेली दृष्टिपथांत येते; आणि सामुद्रधुनीसारखी, कित्येक शिडाचीं जहाजेंहि तिच्या पात्रांत संथपणें सरकत असलेलीं दिसतात.

कनेक्टीकटच्या बरोबरीनें उंच चढत मेरीमॅक, तुलनेनें सरासरी निम्म्या अंतराच्या प्रवाहाद्वारें समुद्राला जाऊन मिळते. आणि त्यामुळें किनाऱ्यानजीक ठिकठिकाणीं पहिल्याच्यासारखी चांगली रुंद व सुपीक कुरणें निर्माण करण्याएवढी उसंत तिला मिळत नाहीं. परंतु त्यानंतर लौकरच द्रुतगतीनें प्रवाहाचा लोट कित्येक धबधब्यांमधून खालीं कोसळत बेधडक धांवत सुटतो. किनारा दोन्हीकडे एकंदरींत उभाट व उंच असून कांठावरच्या निरुंद पट्टीला लागून डोंगरी भाग आहे. सध्यां ह्या मधल्या निरुंद भागावर क्वचितच व तेंही अंशतःच पाणी पसरतें; व शेतकरी हा तुकडा मोलाचा मानतात. न्यू हॅम्पशायरमध्यें चेम्सफोर्ड व कॉन्कॉर्डदरम्यान हा तुकडा शंभर ते चारशें वार अशा कमी-अधिक रुंदीचा आहे. त्यापूर्वींच्या किनाऱ्यावर कित्येक ठिकाणीं झाडें तोडल्यामुळें तो धुपून गेला आहे व म्हणून त्या भागांतील तुकडा यापेक्षां कमी रुंदीचा बनलेला असावा. पॉटुकेट धरणाचा प्रभाव वर थेट क्रॉमवेल धबधब्यापर्यंत पडल्याचें दिसून येतें; आणि बऱ्याचजणांचें असें मत आहे कीं, यामुळें दोन्ही बाजूंचा किनारा खचत चाललाय् आणि नदी पुन्हा भरून येते आहे.

आपल्या इतर सर्व नद्यांप्रमाणें हिलाहि पूर येत असतो, आणि पेमीजवॅसेट नदीचें पाणी तर अवघ्या कांहीं तासांतच तब्बल पंचवीस फूट वर चढतें अशी

तिची ख्याति आहे. मालबोटी तिच्यांत वीस मैलपर्यंत जाऊं शकतात; तर कालवाबोटी मधल्या दरवाजांतून वगैरे न्यू हॅम्पशायरमधील कॉन्कॉर्डपर्यंत— म्हणजे मुखापासून सुमारें पंचाहत्तर मैलांपर्यंत मजल मारूं शकतात. आणि छोट्या नौकांना तर एकशेंतेरा मैलांवरील प्लायमाउथपर्यंत जातां येतें. रेल्वेरस्ता बांधण्यापूर्वी एक छोटी आगबोट लोवेल व नाशुआ यांच्या दरम्यान फेऱ्या मारीत असे; आणि सध्यां एक न्यूबरीपोर्ट ते हॅव्हरहिल अशा फेऱ्या मारीत असते. मुखापाशीं रेतीची भाट पडल्यामुळें व्यापाराच्या दृष्टीनें मात्र ही नदी कांहींशी निरुपयोगी आहे.

ह्या नदीचा सुद्धां शेवटीं गोऱ्या माणसानेंच तलास लावला. विनेपेसॉकी-पर्यंतच्या तिच्या खोऱ्याची प्रथम १६५२ सालीं पाहणी-मोजणी करण्यांत आली. मॅसॅच्युसेट्स्‌मधील पहिल्या वसाहतवाल्यांची अशी कल्पना होती कीं, कनेक्टी-कटचा प्रवाह एका बाजूनें वायव्येकडे वाहतो. परंतु मागाहून कनेक्टीकट मेरी-मॅकच्या प्रवाहाच्या इतकी जवळ आली कीं थोडीशी तसदी घेऊन व्यापाराचा प्रवाह या दुसऱ्या नदीकडे वळवून, डच लोकांना मिळणारा नफा आपणाला उपटतां येईल असें त्यांना वाटूं लागलें.

कॉन्कॉर्डसारखा मेरीमॅकचा प्रवाह संथ नसून ओत्रवता आहे. द्रुतगतीचा आहे. आणि प्रवाहाच्या ह्या भागांतील तळ चिकणमातीचा आहे. लव्हाळीं जवळ जवळ नाहींतच. मासेहि त्या मानानें थोडेसेच. विशेषच कुतूहलानें आम्ही त्या पिवळ्या पिवळ्या पाण्यांत पाहिलें. कारण आधींच्या नदीच्या नाईलसारख्या काळ्या पाण्याला आम्ही सरावलों होतों. शॅड आणि अलेवाइव्ज मासे त्यांच्या हंगामांत येथें पक-डण्यांत येतात. परंतु एके काळीं शॅडपेक्षां विपुल प्रमाणांत मिळणारे सालमन मासे अलीकडे दुर्मिळ झाले आहेत. अधूनमधून बास मासेहि धरले जातात. परंतु कालव्यांतले दरवाजे व धरणें मात्र मासेमारीला थोडींफार मारक ठरतात.

चेम्सफोर्डमधील ग्लासहाऊस गांवासमोरच्या रेताड किनाऱ्यावर ग्रेट वेन्ड या ठिकाणीं आम्ही विसाव्यासाठीं व रानटी वेदाण्याचीं थोडीं फळें गोळा करण्या-साठीं उतरलों. तिथें, पाण्यानजीक फुलणाऱ्या एका नवीनच प्रकारच्या फुलाचा आम्हांला शोध लागला. कवींचें आवडतें हें (हेअर वेल) फूल दोन्ही गोलार्धांत आढळतें. पुळणीवरील सफरचंदाच्या झाडाच्या दाट फांद्यांच्या सावलींत आम्हीं दुपार घालवली. तिथें त्या प्रार्थनेच्या झकास दिवशीं आमची निवांत विश्रांति डहुळायला वाऱ्याची झुळुकहि नव्हती. दीर्घ भूतकाळाचें स्मरण आम्ही शांत चित्तानें करीत राहिलों.

अशा प्रकारें सावलींत विश्रांति घेत असतांना किंवा आरामशीरपणें वल्हवीत चाललों असतांना वेळोवेळीं आम्ही आमच्या मार्गदर्शक गॅझेटीअरचा आधार घेत होतों. आणि त्यांतील ढोबळ नैसर्गिक नोंदींवरून काव्याची मौज लुटीत होतों. थोडेसें खालीं गेल्यावर बीव्हर नदी लागते. पेल्हाम, विन्डहॅम, व लंडनडेरी या शहरांतील मळे ती भिजवीत जाते. अधिकृत माहिती पुरविणाऱ्या या ग्रंथानुसार शेवटच्या शहरांतील स्कॉच-आयरिश वसाहतवाल्यांनीं म्हणे न्यू इंग्लंडमध्यें पहिल्यांदा बटाटा आणला, त्याचप्रमाणें तागाच्या कापडाचें प्रथम उत्पादन केलें.

साहित्यांत जें कांहीं सर्वोत्कृष्ट आहे त्याचा निदान कांहींसा प्रतिध्वनि तरी छापलेल्या व बांधणी केलेल्या प्रत्येक पुस्तकांत सांठवलेला असतो. काठ्या व दगड यांच्याप्रमाणें उत्तम पुस्तकेंहि उपयुक्त असतात. हा उपयोग, प्रस्तावनेंत सूचित न केलेला किंवा परिशिष्टांत पूर्ण न केलेला असा कल्पनातीत असतो.

निसर्गदृश्यांशीं सुसंवादी असणारी एखादी महान् कविता वाचण्यासाठीं सध्यां आपण काय वाटेल तें देऊं, नाहीं का ? कारण मला असें वाटतें कीं, लोक योग्य-प्रकारें वाचन करूं लागले, तर ते कवितांशिवाय दुसरें कांहीं कधींहि वाचणार नाहींत; इतिहास किंवा तत्त्वज्ञान त्यांची जागा भरून काढूं शकणार नाहींत.

काव्याची कितीहि चतुर व्याख्या केली, तरी तिचीं आवश्यक तत्त्वेंच बाजूला सारून कवि तत्काल ती खोटी ठरवील. म्हणून आपणाला तिची जाहिरात तेवढी प्रसिद्ध करतां येईल.

सर्वश्रेष्ठ लिखित शहाणपण हें तालबद्ध स्वरूपांत किंवा कोणत्याहि प्रकारें संगीतबद्ध केलेलें असेल—हें आकृतिदृष्ट्या त्याचप्रमाणें सारतः काव्य असेल याबद्दल शंका नाहीं. आणि मानवाच्या शहाणपणाचा अर्क ज्या ग्रंथांत समाविष्ट असेल त्याची एकहि ओळ तालबद्धताविरहित असण्याची आवश्यकता नाहीं.

आणि काव्य हा अंतिम व सुंदरतम परिपाक असला, तरीसुद्धां तें नैसर्गिक फळ आहे. झाडाला फळ यावें तशी मनुष्य कविता प्रसवतो;—मग ती बोलींत असो कीं भाषेंत असो. तो प्रमुख व अत्यंत संस्मरणीय असा विजय आहे, कारण इतिहास हें काव्यमय घटनांचें गद्य वर्णन आहे. हिंदु, इराणी, बाबिलोनियन, इजिप्शियन ह्या लोकांनीं तरी दुसरें काय केलें, हें कुणाला सांगतां येईल काय ?

ज्यावेळीं आपण अत्यंत शहाणे असतों, अशावेळीं आठवण्यायोग्य अशीं फारच थोडीं पुस्तकें आहेत. परंतु प्रसन्न दिवसांतहि अत्यंत उल्हसित करणारें 'इलियड' हें पुस्तक आहे; आणि सबंध आशियामायनरवर पडलेल्या सर्व

सूर्यप्रकाशाची प्रभा अजूनहि त्यांत सामावलेली आहे. आपली कोणतीहि आधुनिक उल्हासजनक किंवा परमानंद मिळवून देणारी गोष्ट त्याचें उच्च स्थान हिरावून घेऊं शकणार नाहीं किंवा त्याचें तेज फिकें पाडूं शकणार नाहीं. तर, ती जणूं मनाची प्राचीन तेवढीच अद्ययावत् निर्मिति असावी, त्याप्रमाणें वाङ्मयांत अढळ स्थान मिळवून आहे.

निवडक पुस्तकांचें वाचन करणें लाभदायक ठरेल. कारण पुस्तकें हाच आपला परिवार असतो. आंकडेशास्त्र, ललितवाङ्मय, बातम्या, अहवाल किंवा नियतकालिकें कधींहि न वाचतां केवळ, निव्वळ खरींखुरीं पुस्तकें—फक्त महान् कविता तेवढ्या आपण वाचल्या पाहिजेत. त्या कमी पडल्या, तर त्याच पुन्हा वाचा; नाहींतर जमल्यास तशा आणखी लिहा. देवासाठीं दुसरा कोणताहि त्याग करण्यापेक्षां त्याला दररोज स्तोत्रांतून आपले पूर्णत्वाला पोंचलेले विचार आपल्याला सादर करतां येतील. कारण, दिवसांतून निदान एकदां तरी आपण उच्च कोटीला पोंचायला हवें. उत्तम पुस्तकें प्रथम वाचून काढावींत; नाहींतर तीं वाचण्याची संधि कदाचित् मागाहून कधीं मिळणारहि नाहीं.

मुलाप्रमाणें आपल्याला कांहीं नेहमीं सांत्वनाची किंवा करमणुकीची आवश्यकता नसते खास. आपण मंद प्रवृत्तीचे आहोंत म्हणून जो हलक्याफुलक्या कादंबरीकडे वळतो तो केवळ झोंपेची एखादी डुलकी घेण्यापलीकडे फारसें कांहीं साधत नाहीं. मी कुठचीं पुस्तकें उत्तम मानतों ?—आपली नेभळट करमणूक करणारीं नव्हेत. तर, जीं आळशी माणसाला वाचतां येत नाहींत, भित्र्या माणसाचें मनोरंजन करूं शकणार नाहींत, पण अस्तित्वांत असलेल्या सार्वजनिक संस्थांना आमच्यापासून धोका पोचूं शकेल अशी शिकवणसुद्धां आम्हांला देतात तीं पुस्तकें.

छापलेलें व बांधणी केलेलें सर्वच साहित्य कांहीं पुस्तकांत गणतां नये. तें कांहीं उत्तम वाङ्मय ठरतेंच असें नाहीं. तर, सुधारलेल्या जीवनाचीं चैनीचीं व इतर आनुषंगिक साधनें असतात त्यांतच बऱ्याच वेळां त्यांची गणना करावी लागेल. हलक्या प्रतीचा माल नाना तऱ्हेच्या भपकेबाज आवरणाखालीं दगलबाजीनें गळ्यांत बांधला जातो. एका फेरीवाल्यानें एकदां मला म्हटल्याप्रमाणें—"व्यापाराची पद्धत अशी आहे कीं, माल कसाहि कां असेना—तो बेधडक दडपून द्यावा." सारें कांहीं चालतें.

लिहिण्याची समर्थता व शैली यांच्या आधारें कांहीं पुस्तकें धूर्तपणें अशीं रचलीं जातात कीं कधीं कधीं विद्वान मंडळींतहि त्यांची चलती होते. परंतु

अल्पावधींतच, वाघाचें कातडें पांघरलेल्या गाढवावरील कातडें गळून पडावें तसें त्यांचें खरें स्वरूप उघडें पडतें. त्यांचा भंपकपणा प्रत्ययाला येतो व या मंडळींचा भ्रमनिरास होतो.

कागद स्वस्त आहे. त्यामुळें नवीन पुस्तक लिहिण्यासाठीं आधींचें पुस्तक ‘ पुसून ’ टाकण्याची कांहीं आतां आवश्यकता नाहीं. गहूं किंवा बटाटे यांची पैदास करण्यासाठीं जमिनीची लागवड करावी तशी हे लोक साहित्याची लागवड करतात, व वाङ्मयाच्या लोकसत्ताक राज्यांत आपली वर्णी लावतात. किंवा अर्क काढून ब्रॅन्डींत रूपांतर करण्यासाठीं कांहींजण धान्याचीं पिकें काढतात त्याप्रमाणें ते संतोषानें कीर्तीसाठीं लिहितील. पुस्तकें बहुधा खरीखुरी किंवा काल्पनिक गरज भागविण्यासाठीं बुद्धिपुरस्सर व घाईघाईनें खरडलीं जातात. परंतु पुस्तकांना गहूं किंवा बटाट्यांचें स्वरूप येतां नये; तर, आपल्या कर्त्या लेखकांच्या जीवनांच्या अनिर्बंध व नैसर्गिक ‘ पिकाचें ’ स्वरूप त्यांना प्राप्त झालें पाहिजे.

विद्वत्ताप्रचुर ग्रंथांतून आपल्याला फारसें कांहीं शिकतां येत नाहीं; तर अस्सल, प्रांजळ अशा माणुसकी असलेल्या पुस्तकांतून—मनमोकळ्या व प्रामाणिक चरित्रांतून. एखाद्या लुटारूच्या जीवनापेक्षां एखाद्या सज्जनाचें जीवन आपल्याला क्वचितच सुधारील. कुजूं लागलेल्या झाडाला, तें जिवंत आहे तोंवर चांगल्या जिवंत झाडाइतकीच सूर्यप्रकाश, वारा व पाऊस यांची आवश्यकता असते.

ओघवत्या लेखनाच्या मोहकतेबद्दल अलीकडे खूपच चर्चा चालल्याचें आढळून येतें. कांहीं प्रतिभावान् साहित्यिकांचें लेखन विचारपरिप्लुत असतें, परंतु त्याचबरोबर तें अव्यवस्थित व बोजड असतें असा त्याच्याविरुद्ध आक्षेप घेण्यांत येतो. पण शास्त्रीय दृष्टीनें पाहिलें तर क्षितिजावर दिसणारीं गिरिशिखरेंसुद्धां पर्वताच्या रांगेचे केवळ भाग होत. उतरत्या वाहत जाणाऱ्या नदीपेक्षां समुद्राच्या खळबळत्या लाटेशीं विचारप्रवाहाचें साम्य अधिक आहे हें आपण लक्षांत घेतलें पाहिजे. त्याचप्रमाणें दिव्य प्रभावाची ती परिणति आहे;—प्रवाहांतील उतरणीची नव्हे. नदी उतरणीवरून खालीं धांवत सुटते म्हणून वाहते. आणि जेवढ्या द्रुतगतीनें वाहते तेवढ्याच जलदीनें खालीं उतरत जाते. आपला सबंध प्रवास उतरत्या प्रवाहांत तरंगत तरंगत पार व्हावा अशी ज्या वाचकाची अपेक्षा असते त्याचें होडकें समुद्राच्या लाटांच्या तांडवांत शिरलें कीं, तो मळमळण्याबाबत व सागराच्या पाण्याच्या हेलकाव्यांबाबत तक्रार करणें साहजिक आहे. लहानसान प्रवाह जसे सागराकडे ओढ घेतात तसा सागरहि सूर्यचंद्राकडे आकर्षित झालेला असतो.

पूर्णपणें निकोप वाक्य अत्यंत दुर्मिळ आहे हें तर खरेंच. बऱ्याचशा भागांत आपण विचाराच्या रंग–वासालाच मुकतों. हो, सकाळसायंकाळचे दंवाचे रंगहीन थेंब पाहून किंवा नीलिमाविरहित आकाश पाहून जितपत समाधान लाभेल ना—तितपत. अत्यंत आकर्षक वाक्यें बहुधा विशेष शहाणपणाचीं द्योतक नसतात; मात्र तीं अचूक लागू पडणारीं व प्रासादिक असतात. वक्ता जें कांहीं बोलतो तें जाणून घेण्याचा जणूं काय त्याला हक्क पोंचतो अशा आविर्भावांत ठाम व निर्णायक स्वरूपांत तीं बोललीं जातात. आणि जरी तीं शहाणपणाचीं नसलीं तरी निदान चांगलीं समजण्यासारखीं—'प्रासादिक' असतात. सर वॉल्टर रॅले याच्या वाङ्मयाचा अभ्यास केवळ त्याच्या अप्रतिम शैलीसाठीं करण्यासारखा आहे. कारण बऱ्याच प्रथितयश साहित्यिकांमध्यें तो असामान्य ठरणारा आहे. त्याच्या शैलीमध्यें माणसाच्या पदक्षेपासारखा एक प्रकारचा नैसर्गिक ठसकेबाजपणा आहे; आणि सर्वोत्तम आधुनिक साहित्यांत ज्या गोष्टीचा अभाव आहे, ती उसंत त्याच्या वाक्यावाक्यांत मिळते. त्याच्या पुस्तकांतील प्रकरणें इंग्लिश पार्कसारखीं आहेत. नाहींतर, मोठमोठाले वृक्ष जिथें लहानसान झुडुपांना वाढूं देत नाहींत अशा पाश्चिमात्य जंगलासारखीं आहेत म्हणा. त्यांतील खुल्या भागांतून कुणालाहि घोड्यावरून रपेट मारतां येते. त्या काळच्या सर्व नामवंत साहित्यिकांत, अलीकडच्या साहित्यिकांपेक्षां कितीतरी जास्त तडफदारपणा व नैसर्गिकपणा होता.

निरर्थक शिक्षणाहून अधिक लज्जास्पद गोष्ट दुसरी कोणती आहे काय? निदान लांकडें फोडायला तरी शिका. परिश्रमाची व अनेक माणसांशीं वगैरे संभाषण करण्याची आवश्यकता विद्वानाला किती आहे हें क्वचितच नीट लक्षांत घेतलें जातें. एखाद्याच्या बोलण्या-लिहिण्याच्या शैलींतील वाचाळपणा व भावनाविवशता हीं काढून टाकायला, मनहि ज्यांत गुंतून राहील असा धीमा परिश्रम हातांनीं करीत राहणें हा निःसंशय सर्वोत्तम तोडगा होय.

सकाळपासून रात्रीपर्यंत त्यानें खच्चून काम केलें, तर तेवढ्या वेळांतील आपल्या विचारप्रवाहाकडे आपल्याला अवधान ठेवतां आलें नाहीं म्हणून त्याला एकवेळ दुःख वाटेल. तरीपण त्या दिवसभराच्या अनुभवाची नोंद घाईघाईनें ज्या कांहीं ओळींत केली जाईल त्या ओळी, एरव्हीच्या अगदीं मोकळ्या वेळांत, रिकामपणाच्या लहरींत निर्माण झाल्या नसत्या एवढ्या संगीतमय व अस्सल उतरतील.

मात्र, तरीसुद्धां खरोखरी कार्यक्षम असलेला मजूर दिवसभर कामाची गर्दी

करून सोडणार नाहीं. तर उसंत घेऊन वेतावेतानें व धीमेपणानें विशेष आवडतें काम तेवढें तो करील. वेळेचा अस्सल मोबदला आपल्याला मिळावा हीच त्याची चिंता. कोंबडीची गोष्टहि पहा ना! सबंध दिवसभर उबवणीला बसूनहि ती एखादेंच अंडें घालते. एवढेंच नव्हे, तर दुसऱ्या अंड्यासाठीं आवश्यक असलेला मालमसाला तेवढ्या वेळांत गोळा करते असेंहि नाहीं. अत्यंत क्षुल्लक काम—मग तें नखें नीट करण्याचें कां असेना, मनुष्यानें त्यासाठीं पुरेसा वेळ घेत जावा. फुलांच्या कळ्यांची गोष्ट घ्या ना—जणूं काय वसंतऋतूचे दिवस कधीं संपायचेच नाहींत अशा भरवंशानें त्या, गडबडधांदल न करतां सावकाश, मुकेपणानें, अव्यक्तपणें उमलत असतात.

कांहीं वेळा अशा असतात कीं, त्यावेळीं कोणतीहि कृति करावयाची नसते; तर उसंत घेऊन संकल्पाची सिद्धता करावयाची असते. मातींत रुजत असलेलें बीं वर हवेंत अंकुर फोडण्याच्या अगोदर जमिनींत मूळ धरतें त्याप्रमाणें आपला संकल्प प्रथम मूळ धरत असतो.

कांहीं पुस्तकांत एकप्रकारचें घरगुती सत्य व सहजपणा असतो. हा क्वचितच आढळतो, आणि तरीहि माफक वाटतो. घरगुतीपणा हा जवळजवळ घरांतल्या-इतकाच पुस्तकांतहि मोठा गुण ठरतो; मात्र तो वाचकाला मानवला पाहिजे. सौंदर्याखालोखाल त्याचें मोल असून ती एक उच्च प्रतीची कला आहे. मात्र कांहींजणांच्याच अंगीं हा गुणधर्म असतो.

एखाद्या विषयाबाबत लिहितांना लेखक बऱ्याच अंशीं त्या विषयाबाबत पूर्वी लेखन केलेल्या लेखकांना वाट पुसतच मार्गक्रमण करीत असतो. त्यामुळें त्याचें पुस्तक हा अनेकांच्या सल्लामसलतीचा परिपाक असतो. परंतु चांगलें पुस्तक हें नवनवोन्मेषशाली असतें. विषयच एकप्रकारें नवा असतो. आणि त्याचा लेखक निसर्गाशीं हितगुज करून, पूर्वसूरींनाच केवळ वाट न पुसतां आपल्या मागाहून येण्याचा संभव असलेल्या लेखकांशींहि हितगुज करतो. कोणत्याहि विषयावर अस्सल पुस्तक लिहायला नेहमींच पुरेसा वाव व औचित्य असतें. चकचकीत ऊन्ह पडलेल्या दिवशींहि अधिक प्रकाशाला वाव असतो ना—तसें. जास्त किरणें कांहीं आधींच्या किरणांच्या आड येत नसतात.

# भ्रमन्ति*

निव्वळ नागरी स्वातंत्र्य व संस्कृति यांच्याशीं गुणवैधर्म्य असलेल्या, अनिर्बंध स्वातंत्र्य व रानटीपणा यांजसाठीं मला निसर्गाची भलावण करावयाची आहे. मनुष्याला समाजाचा एक घटक मानण्यापेक्षां निसर्गाचा रहिवासी किंवा निसर्गाचा अविभाज्य घटक मानून चालायचें आहे. मला एक पराकोटीचें विधान करावयाचें आहे; आणि तें सुद्धां मी ठामपणें करीन. कारण, सुधारणेचे पुरस्कर्ते खूप आहेतः पाद्री, स्कूल कमिटी व तुम्ही सर्वजण तिचा सांभाळ कराल.

माझ्या सबंध आयुष्यांत, फेरफटका मारण्याची-भ्रमन्तीची-भटकण्याची कला जाणणारा एखादादुसराच माणूस मला भेटला आहे. जो सतत सारखा घरीं स्वस्थ बसून राहतो तो सगळ्यांत मोठा बहाद्दर भटक्या असण्याचा संभव आहे. परंतु भटक्या हा, चांगल्या अर्थानें, शक्य तेवढ्या जवळच्या मार्गानें सागर गांठण्याच्या खटपटींत असलेल्या, नागमोडी वळणानें जाणाऱ्या नदीपेक्षां कांहीं विशेष भटकन्ती करणारा नसतो.

आजकाल आपण धर्मयोद्धेच काय, पण भटके म्हणूनसुद्धां कच्च्या दिलाचे बनलों आहोंत हेंच खरें; दीर्घ प्रयत्न करण्याची किंवा अमर्याद साहस पत्करण्याची वृत्ति आपल्यांत राहिलेली नाहीं. आपल्या मोहिमा म्हणजे नुसते दौरे असून जेथून निघतों त्या घराकडे सायंकाळीं आपण परततों. अर्धा प्रवास मुळीं मागें परतण्याचाच असतो. आईबाप, बहीणभाऊ, बायकोमुलें, स्नेहीसोबती यांना सोडून जाण्याची व पुन्हा कधींहि न पाहण्याची तुमची तयारी असेल,–तुमचें कर्जवाम तुम्ही फेडून टाकलें असेल, मृत्युपत्र केलेलें असेल, व इतर सर्व प्रकरणें

* 'अटलांटिक मन्थली' या मासिकाच्या जून १८६२ च्या अंकांत प्रथम प्रकाशित. त्यानंतर पुढील वर्षी प्रसिद्ध झालेल्या 'एक्सकर्शन्स' (सफरी) या पुस्तकांत एक प्रकरण म्हणून समाविष्ट.

मिटवलीं असतील, आणि अशाप्रकारें स्वतंत्र बनलां असाल, तर मग तुम्ही भ्रमन्तीला सिद्ध झालांत असें म्हणतां येईल.

माझ्या स्वतःच्या अनुभवाकडे वळायचें म्हणजे मला व माझ्या सोबत्याला (हो, कधीं कधीं माझ्याबरोबर एखादा सोबती असतो) स्वतःला, नव्या किंवा खरें म्हणजे जुन्या पद्धतीचे सरदार मानून घेण्यांत मोठी मौज वाटते. एके काळीं घोडेस्वाराच्या ठिकाणीं असलेली सरदारी वृत्ति व वीरश्री आतां सरदाराऐवजीं भ्रमन्ती करणाऱ्या भटकबहाद्दराच्या ठिकाणीं वास करीत असलेली किंवा कदाचित् स्थिरावलेली दिसून येते. चर्च, सरकार व जनता यांच्या भरीला एकप्रकारें हा जणूं काय देशाची चौथी मालमत्ता आहे.

जगाच्या बंधनांतून पूर्णपणें मुक्त होऊन जंगलांत व डोंगरा-माळांवर भटकण्यांत दिवसाचे निदान चार तरी तास (याहून सामान्यतः ते जास्तच असतात) घालवल्यावांचून माझें आरोग्य व माझा उत्साह मला कायम टिकवितां येणार नाहीं असें मला वाटतें. दुकानदार वगैरे मंडळी आपल्या दुकानांत सकाळ-दुपार-संध्याकाळ पायावर पाय टाकून कसे बसतात (जणूं काय पायांचें कार्य उभें राहण्याचें किंवा चालण्याचें नसून फक्त बसण्याचें आहे.) तें सारें आठवलें कीं, त्या सर्वांनीं वास्तविक कधींच आत्महत्या करावयाची ती अजून केलेली नाहीं म्हणून ते गौरवास पात्र आहेत असें मला वाटतें.

एखादा दिवस जरी मी माझ्या बैठकीच्या खोलींत बसून राहिलों तरी 'गंजून' गेल्याशिवाय रहात नाहीं. आणि मग कधींतरी वेळ काढून ऐन वेळीं किंवा सायंकाळीं ४ वाजतां त्या दिवसाची भरपाई करण्यास फार उशीर झाला असतांहि मी फेरफटक्याला निघालों कीं, त्यावेळीं रात्रींच्या छाया दिवसाच्या उजेडांत आधींच मिसळूं लागलेल्या असतात. मग अशा वेळीं मला असें वाटतें कीं, मीं कांहींतरी पाप केलें आहे नि त्याचें क्षालन केलें पाहिजे. आणि म्हणूनच, माझी शेजारीपाजारी मंडळी आपल्या दुकानांत किंवा कचेऱ्यांत सबंध दिवस—असे आठवड्याचे आठवडे, महिनेच्या महिनेच काय, पण जवळजवळ वर्षेंच्या वर्षें स्वतःला कोंडून घेतात हें पाहून, ती त्यांची सहनशीलतेची शक्ति पाहून मी चकित होऊन जातों हें मी कबूल करतों. त्यांच्या नैतिक अजाणतेपणाची तर गोष्टच सोडा. जणूं काय सकाळचे तीन वाजले आहेत अशा समजुतीनें त्यांना दुपारीं तीन वाजतां आपले खुशाल बैठक मारून बसलेले पाहून ते कशाचे घडलेले आहेत हेंच मुळीं मला समजेनासें होतें.

पुरुषांपेक्षांसुद्धां अधिक काळ घरांत रहावें लागणाऱ्या स्त्रियांना तसें रहाणें कसें

५

काय मानवतें कुणास ठाऊक! परंतु माझा असा साधार कयास आहे कीं, बहुतेक स्त्रिया तें मुळींसुद्धां 'चालवून' घेत नाहींत. दुपारच्या वेळीं त्या मुळीं खुशाल बिछान्यावर पडतात.

बसून राहण्याच्या प्रवृत्तीला, स्वभाव व त्याहूनहि वयोमान हीं बरीचशीं कारणी-भूत आहेत यांत शंका नाहीं. मनुष्य जसजसा वयस्क होत जातो, तसतशी स्वस्थ बसून राहण्याची व घरबसल्या उद्योग करण्याची त्याची प्रवृत्ति वाढत जाते. आयुष्याची संध्याकाळ जवळ येते तसतशी त्याच्या संवयींनाहि मावळतीची वाढती कळा प्राप्त होते. शेवटीं शेवटीं मात्र तो फक्त सूर्यास्ताच्या जरासा आधीं बाहेर पडतो व हवा तेवढा फेरफटका अवघ्या अर्ध्या तासांत उरकून टाकतो.

मला जी भ्रमन्ती अभिप्रेत आहे तिच्याशीं 'व्यायाम' 'व्यायाम' म्हणतात त्याचा अर्थाअर्थी कांहींहि संबंध नाहीं. आजारी माणसें ठराविक वेळीं औषध घेतात त्याप्रमाणें डम्बेल्स किंवा खुर्च्या हातांत धरून हवेंत फिरवण्याची क्रिया आहे. तर माझी भ्रमन्तीच मुळीं त्या दिवशींची धाडसा-साहसाची बाब होय. तुम्हांला व्यायाम हवा असेल तर जीवनाच्या झर्‍यांच्या शोधार्थ चला. दूरवरच्या बिनधुंडलेल्या अशा कुरणांत त्या झर्‍यांचे बुडबुडे उठूं लागलेले असतांना, आरोग्यरक्षणासाठीं डम्बेल्स फिरवणार्‍या माणसाची कल्पना करून पाहा.

दुसरें असें कीं, तुम्ही उंटासारखें चालायला हवें. चालतांना चिंतन–मनन करणारा तोच एकटा एक पशु असल्याचें सांगतात. एकदां एका प्रवाश्यानें वर्डस्वर्थच्या महिला नोकराला तिच्या धन्याची अभ्यासाची खोली दाखविण्यास सांगितलें. तेव्हां ती घर दाखवीत उत्तरली, "इथं त्यांचा ग्रंथसंग्रह आहे; पण त्यांची अभ्यासिका मात्र आहे घराबाहेरच."

घराबाहेर, ऊन-वार्‍यांत फार काळ राहिल्यानें व्यक्तित्वांत कांहीं एक रांगडेपणा निःसंशय येतो, आणि कडक अंगमेहनतीमुळें आपल्या हातांचा नाजुकपणा जसा कांहींसा निघून जातो त्याप्रमाणें आपल्या चेहर्‍याची व हाताची कातडी राकट बनते. एवढेंच नव्हे, तर आपल्या स्वभावाची नरमाईहि लोपून जाते. याच्या उलट घरांत राहिल्यानें या गोष्टी नाजुक व नितळ बनतात; कातडी पातळ बनते, व विशिष्ट अनुभवांच्या बाबतींत वृत्ति अधिक अक्षम बनण्याचाहि संभव असतो. ऊन व वारा आपल्याला थोडीं कमी लागलीं, तर आपल्या बौद्धिक व नैतिक विकासाच्या दृष्टीनें महत्त्वपूर्ण असलेल्या कांहीं अनुभवांची ग्रहणक्षमता कदाचित् वाढेलहि. आणि जाड व पातळ कातडीचें प्रमाण वेताचें राहूं देणें खात्रीनें उपकारक ठरेल. परंतु माझ्या मतें हें भूस असून तें अतिशय त्वरेनें उडून जाईल.

दिवसाला रात्र, उन्हाळ्याला हिंवाळा, व अनुभवाला विचार ह्यांचें एकमेकांशीं जें प्रमाण आहे त्यांतच त्याचीहि नैसर्गिक उपाययोजना सांपडेल. आपल्या विचारांत त्यामुळें साहजिकच अधिक हवा व सूर्यप्रकाश खेळेल. स्वाभिमान व शौर्य यांच्या नाजुक धाग्यादोऱ्यांशीं मजुराच्या हाताचे राकट तळवे निगडित असतात; आणि त्यांचाच स्पर्श, आळसटपणाच्या सुस्त बोटांपेक्षां हृदयाला अधिक थरारून सोडतो.

आम्ही भ्रमन्तीला जातों ते साहजिकच माळांवर किंवा रानांत. केवळ एखाद्या बागेंत किंवा एखाद्या क्रीडांगणावर गेलों, तर आमचें काय होईल बरें? तत्त्ववेत्यांच्या कांहीं पंथांनासुद्धां 'स्वतःकडे जंगल आणवून घेणें' आवश्यक वाटतें;—ते जंगलांत गेलेले नसतात ना—म्हणून. ते उपवनें व वाटिका बनवतात व त्यांतील उघड्या जागेंत बसून वनाचें सुख अनुभवतात. खरें म्हणजे, आमच्या पावलांनीं आम्हांला वनापर्यंत नेलें नाहीं, तर तिकडे पावलें तरी वळवण्यांत काय अर्थ? देहानें वनांत मैलभर भटकूनहि जेव्हां मनानें मी तिथें गेलेलों नसतों, तेव्हां मात्र मी भयचकित होऊन जातों. संध्याकाळच्या फेरफटक्याच्या वेळीं मीं माझे सकाळचे काम-उद्योग व समाजाबद्दलची माझी जबाबदारी वगैरे सारें कांहीं मी खुशाल विसरून जातों. परंतु कधीं कधीं असें होतें कीं, गांवाच्या आठवणी मला सहजासहजीं विसरून जातां येत नाहींत. कसल्या तरी कामाचा विचार माझ्या डोक्यांत चालू असतो. आणि त्यामुळें माझा देह जिथें असतो तिथें मी मनानें नसतों;—माझें लक्षच ठिकाणावर नसतें. भटकन्तीच्या वेळीं मी पुन्हा खुषीनें भानावर येतों. वनाबाहेरच्या गोष्टींचा विचार मनांत चालू असतांना वनांत राहण्याचें मला प्रयोजन काय? चांगल्या म्हणून गणल्या गेलेल्या कामांतसुद्धां मी विशेष गुंतलों गेल्याचें मला आढळून आलें कीं, मी चरकतों व माझें अंगहि थरारल्यावांचून रहात नाहीं;—कारण कधीं कधीं असें घडण्याचा संभव असतो.

माझ्या परिसरांत भ्रमन्तीला खूप वाव आहे. एवढेंच नव्हे, तर गेलीं कित्येक वर्षें बहुतेक दररोज—कधीं कधीं तर सतत कित्येक दिवस मी या भागांत भटकत असलों, तरीसुद्धां भटकण्याच्या ठिकाणांची मला अजून कमतरता पडलेली नाहीं. अगदीं नवीन टापू आढळणें मोठें आल्हाददायक असतें, आणि मला तसा आल्हाद अजूनहि कोणत्याहि दिवशीं सायंकाळीं मिळूं शकतो. दोन-तीन तासांच्या भटकन्तीनंतर मी, कधींहि कल्पना नसलेल्या अशा अनोळख्या प्रदेशांत जाऊन पोंचतों.

आजकाल, मनुष्याच्या तथाकथित सुधारणा—घरें बांधणें आणि रानें व सर्व मोठमोठालीं झाडें तोडणें यांमुळें सृष्टीचे देखावे पार विद्रूप होऊन अधिकाधिक नीरस व माफक बनतात.

माझ्या घरून प्रारंभ करून मी सहज दहा, पंधरा, वीस, कितीहि मैल चालूं शकतों. कोणत्याहि घराकडून न जातां, जिथें जिथें कोल्ह्याखोकडांना रस्ता ओलांडावा लागतो तिथें तिथेंच फक्त तो ओलांडून—प्रथम नदीच्या कडेनें, नंतर ओढ्याच्या; नंतर कुरणावरून व जंगलांतून. माझ्या भोंवतालच्या भागांत कित्येक चौरस मैलांच्या टापूंत कुणीहि रहिवाशी नाहीं. कित्येक डोंगरटेकड्यांवरून दूरवरच्या भागांत आधुनिक वस्ति व तेथील मनुष्यांचीं घरें मला दिसतात.

हमरस्त्याचा लांबवलेला भाग—लहानसान रस्ते ज्या ठिकाणाकडे वळतात तें गांव किंवा खेडें होय. नदीचें एखादें सरोवर बनलेलें असावें ना—तसें. गांव हें शरीर मानलें, तर रस्ते हे त्याचे हातपाय होत.

कांहींजण भटकतच नाहींत; तर इतर कांहींजण हमरस्त्यांवर भटकतात; आणि फार थोडे लोक ठरीव गोष्टींच्या पलीकडे भटकत जातात. रस्ते हे गाड्याघोड्यांसाठीं व उद्योगधंद्याच्या लोकांसाठीं बनवलेले असतात. मी ह्या रस्त्यांवरून तसा फार करून फारसा प्रवास करीत नाहीं. कारण मला कांहीं त्या रस्त्यांवरील एखाद्या पथिकाश्रमांत किंवा किराणा मालाच्या दुकानांत किंवा कपड्यांच्या दुकानांत वगैरे जायची धांदल नसते. प्रवासाला मी चांगल्यापैकीं 'घोडा' आहें; पण मी बुद्धिपुरस्सर अनुभवी प्रवासी बनलेलों नाहीं. सृष्टीचे देखावे रंगवणारा चित्रकार रस्ता स्पष्ट करण्यासाठीं मनुष्याच्या आकृतींचा उपयोग करतो. पण तसा तो माझ्या आकृतीचा उपयोग करणार नाहीं. प्राचीन ऋषीमुनी, कविवर्य, मनू, मोझेस, होमर, चॉसर यांच्याप्रमाणें मी निसर्गाच्या सान्निध्यांत जातों. तुम्ही ह्या देशाला अमेरिका म्हणा हवी तर, पण ही अमेरिका नव्हे. अमेरिकाही व्हेस्पुसिअस किंवा कोलंबस, किंवा दुसऱ्या कुणीहि शोधून काढलेली नाहीं. अमेरिकेच्या कोणत्याहि तथाकथित इतिहासापेक्षां तिची अधिक खरीखुरी हकीगत पुराणांतरीं आहे व ती मीं पाहिलेली आहे.

तथापि, अलीकडे वापरांत नसलेले जे कांही थोडेसे जुने रस्ते आहेत, त्यांवरून फिरणें लाभदायक असतें. उदाहरणार्थ, जुना मार्लबरो रस्ता. मला वाटतें असे एकदोन रस्ते प्रत्येक शहरांत असतात.

सध्यां ह्या परिसरांतील बहुतेक जमीन कुणाच्या खाजगी मालकीची नाहीं; त्यामुळें फिरणाऱ्याला एकंदरींत स्वातंत्र्य असतें. परंतु कधीं–ना–कधीं कदाचित्

असाहि दिवस येईल कीं, करमणुकीच्या उद्यानांत या जमिनीची विभागणी करण्यांत येईल. त्यांत मग थोडेसे लोक संकुचितपणानें आपल्यापुरती मौज लुटतील; ठिकठिकाणीं नाना कुंपणें घालण्यांत येतील. नाना क्लृप्त्या लढवून '**सार्वजनिक**' रस्त्यांपुरतें लोकांचें फिरणें मर्यादित करण्यांत येईल; आणि ईश्वरनिर्मित भूभागावर फिरणें हें एखाद्या गृहस्थाच्या मालकीच्या जमिनीवरील अतिक्रमण मानलें जाईल. एखाद्या गोष्टीचा केवळ आपल्यापुरता उपभोग घेणें म्हणजे सामान्यपणें तिच्या उपभोगाच्या खऱ्या मौजेला मुकण्यासारखें आहे. म्हणून तो अनिष्ट दिवस येण्यापूर्वी आपण मिळेल ती प्रत्येक संधि साधून घेऊं या.

आपण भटकत भटकत कुठें जायचें हें ठरवणें कधीं कधीं इतकें कठिण कां जातें? माझी अशी खात्री आहे कीं, निसर्गांत अशी एक सूक्ष्म आकर्षणशक्ति आहे कीं, जर आपण अभावितपणें तिला वश झालों तर, तर ती आपल्याला योग्य मार्गदर्शन करील. कोणत्या मार्गानें आपण चालतों ह्याची पर्वा आपल्याला नाहीं असें नाहीं. बरोबर मार्ग हा असतोच; पण दुर्लक्ष व मूर्खपणा यांच्यामुळें आपण चुकीचा मार्ग पत्करण्याचा कधींकधीं संभव असतो.

मी भ्रमन्तीसाठीं घराबाहेर पडलों म्हणजे कुठल्या बाजूला वळायचें हें निश्चित नसतांना, त्याबाबतचा निर्णय ठरविण्याची कामगिरी मी माझ्या सहजप्रवृत्तीकडे सोंपवतों. आणि अशा वेळीं,—कुणाला हें विलक्षण व लहरी वाटेल पण, मला असें आढळून येतें कीं, मी शेवटीं अपरिहार्यपणें नैर्ऋत्येच्या मार्गाला लागलेलों असतों. त्या दिशेकडील एखादें विशिष्ट जंगल किंवा शेतमळा किंवा ओस पडलेलें कुरण किंवा डोंगर–टेकडी माझ्या भ्रमन्तीचें 'लक्ष्य' बनलेलें असतें. अस्थिरपणें गोलगोल फिरण्यांत कधींकधीं माझा पाव तास निघून जातो, आणि मग सहस्राव्या वेळीं मी नैर्ऋत्येकडे किंवा पश्चिमेकडे जायचें ठरवतां. पूर्वेकडे मी केवळ सक्तीनें जातों; तर पश्चिमेकडे खुशाल मोकळेपणानें. कोणत्याहि कामगिरीच्या उद्देशानें मी तिकडे जात नाहीं. पूर्वेकडील क्षितिजापलीकडे सुरेख सुरेख निसर्ग–दृश्यें किंवा पुरेसा रानवटपणा व मोकळेपणा मला आढळेल यावर माझा विश्वासच बसणें कठिण. तिकडील भटकन्तींत कांहीं चांगल्या गोष्टी आढळून येतील या अपेक्षेनें कांहीं मी क्षुब्ध होत नाहीं. परंतु पश्चिम क्षितिजाकडे मावळत्या सूर्याच्या दिशेनें अमर्यादपणें पसरलेलें जंगल मी पाहतों, तेव्हां मला असा विश्वास वाटतो कीं, माझ्या नादांत फारसा व्यत्यय आणणारीं लहानमोठीं शहरें कांहीं ह्या दिशेला नसतील. ओरेगॉनच्या दिशेनें

मला गेलें पाहिजे; युरोपच्या नव्हे. ह्याच दिशेनें राष्ट्र चाललें आहे. मी असेंहि म्हणेन कीं मनुष्यजातीची प्रगति पूर्वेकडून पश्चिमेकडे होत राहिली आहे.

इतिहास समजून घेण्यासाठीं आणि कलावाङ्मयाच्या अभ्यासासाठीं आपण पूर्वेकडे वळतों,—तिकडील लोकांच्या प्रगतीचा मागोवा घेतों. तर, भावी काळांत झेंप घ्यावी त्याप्रमाणें, धाडसी, साहसी वृत्तीनें आपण पश्चिमेकडे जातों.

जो जो सूर्यास्त मी पाहतों तो तो मला पश्चिमेकडे जाण्याची प्रेरणा देतो. सूर्य दररोज पश्चिमेकडे देशांतराला जातोसा वाटतो; आणि अम्हांलाहि आपलें अनुकरण करण्यास जणूं काय तो प्रवृत्त करतो.

कोलंबसाला पूर्वीपेक्षां अधिक तीव्रपणें पश्चिमेकडे जाण्याची आंच लागली. ती त्यानें मानली व परिणामीं 'नवें जग' शोधून काढलें. त्या काळच्या लोकसमूहानें दूरवरच्या ताज्या कुरणांचा वास हेरला होता.

इंग्लिश प्रवासी व कॅनडाचा गव्हर्नर-जनरल सर फ्रॅन्सिस हेड यानें म्हटलें आहे कीं, "या 'नव्या जगा'च्या (अमेरिकेच्या) उत्तर व दक्षिण अशा दोन्ही भागांत निसर्गानें आपल्या कृति अधिक मोठ्या प्रमाणावर रेखाटलेल्या आहेत एवढेंच नव्हे, तर 'जुनें जग' चित्रांकित व सुशोभित करतांना त्यानें जे रंग वापरले आहेत त्याहून कितीतरी जास्त तेजःपुंज व मूल्यवान रंगांच्या साहाय्यानें त्यानें हें सबंध महान् चित्र रंगवलें आहे...अमेरिकेंतील अंतराळ अपार उंच दिसतें, तर आकाश अतीव निळें, हवा विशेष ताजीतवानी, थंडी जास्त कडक, चंद्र अधिक मोठा, तारे जास्त तेजस्वी, गडगडाट अधिक मोठा, वीज जास्त स्पष्ट दिसणारी, वारा अधिक वेगवान, पाऊस जोरकस, पर्वत जास्त उंच, नद्या जास्त लांब, जंगलें विशेष अफाट व मैदानें बेफाट पसरलेलीं आहेत." बफॉन यानें जगाच्या या भागाचें व येथील उत्पादनांचें जें वर्णन केलें आहे त्याला या विधानानें परस्पर चोख उत्तर मिळेल असें म्हणायला हरकत नाहीं.

हीं मोठीं उत्साहवर्धक शिफारसपत्रें आहेत. युरोपांतल्यापेक्षां येथें चंद्र अधिक मोठा दिसत असेल, तर बहुधा सूर्यहि जास्त मोठा दिसत असला पाहिजे. त्याचप्रमाणें अमेरिकेंतील अंतराळ अपार उंच भासत असेल, व तारे अधिक तेजस्वी दिसत असतील, तर, मला असा विश्वास वाटतो कीं, ह्या गोष्टी अमेरिकेंतील रहिवाशांचें तत्त्वज्ञान, काव्य व धर्म किती उच्च कोटि गांठूं शकतील ह्याचीं निदर्शक चिन्हें आहेत. अखेरशेवटीं, कदाचित्, निराकार अंतराळ अमेरिकन माणसाच्या मनाला कितीतरी जास्त उंच भासेल; व त्याला रत्नखचित बनविणारे तारे अधिक तेजस्वी दिसतील. कारण, डोंगरा-पर्वतावरील हवेंत,

मनोवृत्तीचें पोषण करून तिला उत्साहप्रेरक बनविणारी जशी कांहींतरी शक्ति असते, त्याचप्रमाणें हवामान अशा प्रकारें मनुष्यावर प्रभाव पाडीत असतें असा माझा समज आहे. या प्रभावामुळें मनुष्य बौद्धिक व शारीरिक दृष्ट्या अधिक पूर्णावस्थेला पोंचूं शकणार नाहीं काय? कीं, त्याच्या जीवनांत धुकट वातावरणाचे किती दिवस येतात ह्या गोष्टीला महत्त्वच नाहीं! आपण अधिक कल्पक बनूं, आपले विचार, आपल्या आकाशाप्रमाणें अधिक सुस्पष्ट, ताजेतवाने व स्वर्गीय स्वरूपाचे बनतील; आपली ग्रहणशक्ति आपल्या मैदानांप्रमाणें बहुव्यापक व विस्तृत बनेल; आपल्याकडील मेघगर्जना, विद्युल्लता, नद्या, पर्वत व जंगलें यांजप्रमाणें आपली बुद्धिमत्ता सर्वसाधारणपणें तीव्र, तेजस्वी व भव्योदात्त बनेल, आणि लांबी-रुंदी, सखोलता व उदात्तता यांच्या बाबतींत आपल्या भूवेष्ठित सागरांशींहि आपलीं हृदयें बरोबरी करतील असा भरवसा मला वाटतो.

कांहीं महिन्यांपूर्वीं मी र्‍हाईन नदीचें विहंगम दृश्य पाहण्यासाठीं गेलों होतों. मध्ययुगीन स्वप्नासारखें वाटलें तें मला. रोमन लोकांनीं बांधलेले व नंतरच्या वीरपुरुषांनीं दुरुस्त केलेले तिच्यावरील ते पूल. त्या पुलांखालून, तिच्या ऐतिहासिक प्रवाहांतून मी कल्पनातीत नौकाविहार केला. ज्यांचीं नावें माझ्या कानांना संगीतमय वाटत होतीं आणि ज्यांच्याबद्दल दंतकथा प्रचलित होत्या अशा नगरी व असे किल्ले मी मागें टाकीत गेलों.

त्यानंतर लौकरच मी मिसिसिपीचें विहंगम दृश्य बघायला गेलों; आणि आजच्या दृष्टिकोनांतून त्या नदीवरून मी वर वर जाऊं लागलों, तेव्हां आगबोटी फक्फकत होत्या. किनाऱ्यावर वसत असलेलीं नवनवीन शहरें मोजीत मी जाऊं लागलों, नॉव्हूच्या ताज्या अवशेषांवरून नजर फिरविली, प्रवाहावरून पश्चिमेकडे जाणाऱ्या रेड इंडियन लोकांनाहि पाहून घेतलें. आणि पूर्वीं ज्याप्रमाणें मी मॉसेल न्याहाळलें होतें, त्याप्रमाणें मी आतां ओहिओ व मिसूरी हीं पाहिलीं. डुबुके व वेनोनाचा पहाड पाहून त्यांजबद्दलच्या दंतकथा ऐकल्या. मात्र माझे विचार, भूतकाळ किंवा वर्तमानकाळापेक्षां भविष्यकाळाबद्दल चालले होते. र्‍हाईनचाच हा एक वेगळ्या प्रकारचा प्रवाह आहे असें मला वाटत होतें. किल्ल्यांचा पाया मात्र अजून घातला जावयाचा होता; तसेंच सुप्रसिद्ध ठरणारे पूल नदीवर अजून उभारावयाचे होते. आणि, जरी आम्हांला जाणीव नव्हती तरीसुद्धां हें सध्यांचें युगच मुळीं वीरपुरुषांचें युग असल्याचा माझा समज झाला. कारण, वीरपुरुष हा सामान्यतः अत्यंत साधा व झांकल्या माणकासारखा असतो.

मला अभिप्रेत असलेली पश्चिम म्हणजेच जंगलभागाचें दुसरें नामाभिधान

होय. आणि मी जें कांहीं सांगूं पहात आहें तें हेंच कीं, जंगलांतच जगाचें संरक्षण आहे. प्रत्येक झाड आपल्या लहानमोठ्या फांद्या जंगलाच्या शोधार्थ फांकीत असतें. शहरें कोणत्याहि किमतीला जंगलाची 'आयात' करतात. माणसें त्याच्या-साठीं नांगरणी व जलपर्यटन करतात. मानवजातीला बळकटी आणणारीं शक्ति-वर्धक औषधें व झाडाच्या साली रानावनांतूनच मिळतात. आपले पूर्वज रानटी होते. रोम्यूलस व रेमूस यांचें स्तनपान लांडग्यानें केल्याबद्दलची जी कहाणी आहे ती कांहीं अर्थशून्य नाहीं. प्रतिष्ठेला चढलेल्या प्रत्येक राज्याच्या संस्थापकांनीं अशाच प्रकारच्या एखाद्या रानटी उगमापासून जीवन व जोम मिळवलेला आहे. साम्राज्याच्या बाळांचें स्तनपान लांडग्यानें न केल्यामुळेंच तीं जिंकलीं गेलीं व उत्तरेच्या जंगलांतील ज्या बाळांचें स्तनपान केलें गेलें त्या बाळांनीं त्यांना बाजूला सारलें.

जंगलावर, शेतमळ्यावर, व धान्य फोफावूं देणाऱ्या रात्रीवर माझा विश्वास आहे. शक्तीसाठीं खाणेंपिणें व अधाशीपणानें खाणेंपिणें यांत फरक आहे. हॉटेन्टॉट ह्या रानटी लोकांना हरणां-सांबरांची कच्ची चरबी मटकावण्याचा सरावच आहे. आपल्या देशाच्या उत्तर भागांतील कांहीं रेड इंडियन लोक आर्क्टिक प्रदे-शांतील रेनडीअरची चरबी, त्याचप्रमाणें सांबरशिंगाचीं टोंकें आदि इतर भाग मऊ असेपर्यंत कच्चे खातात. आणि ह्याबाबतींत कदाचित् पॅरीसच्या आचाऱ्यांवर त्यांनीं आघाडीहि मारली असेल. एरव्हीं अग्नीच्या आहारीं जाणारा अन्नांश त्यांना मिळतो. दुकानांत मिळणारें गायबैलाचें मांस आणि कत्तलखान्यांतून मिळणारें डुकराचें मांस ह्यांच्यापेक्षां मनुष्याच्या पोषणाला तें अधिक उपकारक ठरण्याचा संभव आहे. जणूं काय कच्च्या मटकावलेल्या हरणा–सांबरांच्या चरबीवर आम्ही जगलेलों आहोंत, अशा प्रकारचा रानटीपणा माझ्यांत उतरायला हवा. म्हणजे त्या स्थितींतला माझा दृष्टिक्षेप आधुनिक सुधारणेला सहन करतां येणार नाहीं.

पिंगट कातडी विशेष आदरणीय आहे. आणि रानांत वस्ति करून राहणाऱ्याला गौरवर्णापेक्षां ऑलिव्ह (हिरवटपिवळट) रंग अधिक साजणारा आहे असें म्हणायला हरकत नाहीं. 'फिक्कट गौरवर्णीय माणसा'ची आफ्रिकन माणसाला कींव वाटल्याबद्दल मला आश्चर्य वाटत नाहीं. निसर्गवादी डार्विन म्हणतो, "तहितियन माणसाच्या बाजूला स्नान करणारा गोरा माणूस हा, उघड्या शेतांत जोमानें वाढणाऱ्या सुरेख, गडद हिरव्या रोपट्याच्या जोडीला माळ्याच्या कारागिरीनें उजळलेल्या रोपट्याप्रमाणें दिसतो."

"सुंदर गोष्ट कितीतरी उत्तम असते!..." असे उद्‌गार वेन जॉन्सनने काढले आहेत. त्याच धर्तीवर मी असें म्हणेन : रानटी गोष्ट कितीतरी उत्तम असते! "जीवन हें रानटीपणानें भरलेलें आहे. अत्यंत रानटी असलेली गोष्टच सर्वांत जास्त जिवंत असते."

तुम्हाला मी कदाचित् विकृत मनोवृत्तीचा वाटेन, पण मी खरेंच सांगतों - मनुष्यानें आपल्या सर्व कलाकारागिरीनिशीं बनविलेल्या अतीव सुंदर बागेच्या आसमंतांत किंवा एखाद्या पाणथळ जागेनजीक मी रहावें अशी योजना माझ्यापुढें ठेवण्यांत आली, तर मी निश्चितपणें पाणथळ जागेचा शेजार पत्करीन. नागरिकांनो, तुमचे सारे परिश्रम माझ्या दृष्टीनें किती निरर्थक आहेत हें यावरून दिसून येईल!

बाह्य उदास वातावरणाच्या मानानें माझा उत्साह खात्रीनें वाढतो. मला आपला सागर, वाळवंट, किंवा जंगल बरें! वाळवंटांत, शुद्ध हवा व एकान्त हीं ओलाव्याची व सुपीकपणाची जागा भरून काढतात. प्रवासी बर्टन त्याबद्दल म्हणतो : "आपलें नीतिधैर्य वाढतें, आपण मनमोकळे व प्रेमळ, आतिथ्यशील व एकनिष्ठ बनतों. तेथें निव्वळ प्राणिजीवनांतच मोठी मौज वाटते."

शेतजमिनीला जसे शेणखताचे ढीगचे ढीग आवश्यक असतात तशीच माणसाच्या आरोग्यवर्धनासाठीं कित्येक एकर कुरणा-मळ्यांची जरुरी असते. त्याच्या पोषणासाठीं विविध प्रकारचें जोमदार मांसहि आहे. एखाद्या नगराचें रक्षण, त्यांतील सदाचारी माणसांपेक्षां त्याच्या भोंवतालच्चीं जंगलें व पाणथळ जागा यांमुळें अधिक होतें. ज्या नगरीच्या वरच्या भागांत एखादें प्राचीन जंगल झुलतें आहे व खालच्या बाजूला दुसरें प्राचीन जंगल कुजत-सडत पडलेलें आहे, अशी नगरी धान्य व बटाटे यांची लागवड करण्यास योग्य असते; एवढेंच नव्हे, तर भावी पिढ्यांतील कविवर्य व तत्त्वज्ञानी निर्मिण्यासहि ती पात्र ठरेल. अशाच प्रकारच्या भूमींत होमर, कन्फ्युशिअस प्रभृति थोर व्यक्ती निर्माण झाल्या, आणि अशाच प्रकारच्या रानावनांतून रानवट प्राणी व रानवट मध खात सुधारक पुढें येतो.

जंगली प्राण्यांचा सांभाळ करावयाचा, तर त्यांच्या वस्तीसाठीं जंगल वाढवायला हवें. तीच गोष्ट मनुष्याची. शंभरएक वर्षांपूर्वी आमच्याच जंगलांतून तोडलेले लांकडांचे ओंडके आमच्या गांवच्या रस्त्यांवर विकले जात. त्या प्राचीन आणि कणखर वृक्षांचें निव्वळ स्वरूपच मुळीं, माणसांच्या विचारधाग्यांना बळकटी आणून ते सुसूत्र बनविण्याच्या दृष्टीनें रांपवणारें तत्त्व बनलें

होतें असा माझा समज आहे. आणि आतां काय बोलावें!...तेव्हांच्या तुलनेनें सध्यांच्या माझ्या खेडेगांवची निकृष्ट स्थिति पाहिली कीं, अंगावर कसे शहारे येतात. कारण, चांगल्या जाडजूड ओंडक्यांचा ढिगारा कांहीं आपल्याला आतां तिथें जमवतां येणार नाहीं; शिवाय, डांबर व टर्पेंटाइनचें उत्पादनहि अलीकडे करण्यांत येत नाहीं.

साहित्यांतील राकटपणाच आपल्याला विशेष आकर्षून घेतो. मंदपणा हें मवाळपणाचें केवळ दुसरें नामाभिधान होय. **हॅम्लेट** म्हणा, **इलिअड्** म्हणा किंवा धर्मग्रंथ वा पुराणें म्हणा, यांच्यांतील रानवट, मोकळे व राकट विचार—शाळांतून शिकवले न जाणारे—हेच आपणाला खरा आल्हाद देतात. माणसाळलेल्या बदकापेक्षां रानबदक जसें अधिक चपळ व सुंदर असतें, त्याप्रमाणें राकट, रानवट विचारांचेंहि असतें;—दंवबिंदूंच्या वर्षावामध्यें दलदलीच्या, पाणथळ जमिनीवरून तो भिरभिरत जातो. पश्चिमेकडील माळरानांत किंवा पूर्वेकडील जंगलांत एखादें रानफूल सांपडावें त्याप्रमाणें, खरेंखुरें उत्तम पुस्तक हें कांहींसें तितकेंच नैसर्गिक, अनपेक्षित व असाधारण सुरेख आणि परिपूर्ण असतें. प्रतिभा ही विद्युल्लतेच्या लकाकीसारखी अंधाराला उजाळा देणारी असते; आणि ती क्वचित् प्रत्यक्ष ज्ञानमंदिराच्याच ठिकऱ्या ठिकऱ्या उडवते.

ह्मबोल्टचें विज्ञान ही एका प्रकारची गोष्ट, तर काव्य ही वेगळ्या प्रकारची. आजचा कवि हा, सर्व शास्त्रीय शोध व मानवजातीचा ज्ञानसंचय यांचा लाभ त्याला मिळाला असूनहि होमरवर कांहीं मात करूं शकलेला नाहीं.

निसर्गाला अभिव्यक्ति देणारें साहित्य आहे कुठें? वारे व जलप्रवाह यांजवर प्रभाव पाडून त्यांना आपल्या सेवेस लावून, आपल्या वतीनें बोलावयास भाग पाडूं शकेल तोच खरा कवि होय.

पौर्वात्य जगांतील नीतिकथा-कहाण्यांमध्यें भर घालण्यासाटीं पाश्चात्य जग सिद्ध होत आहे. गंगा, नाईल व ऱ्हाईन ह्या नद्यांच्या खोऱ्यांनीं आपलें पीक दिलेलें आहे. आतां, अमेझॉन, प्लेट, ओरिनोका, सेंट लॉरेन्स व मिसिसिपी या नद्यांचीं खोरीं कोणतीं पिकें देणार आहेत हेंच पाहायचें आहे. अमेरिकन स्वातंत्र्य ही सध्यां जशी कांहीं प्रमाणांत कल्पितकथा बनलेली आहे, तशी ती कालमानानुसार भूतकालीन कल्पितकथा बनली कीं, जगांतील कविमंडळी अमेरिकेच्या कथापुराणांतून स्फूर्ति घेईल.

रानटी लोकांचीं अत्यंत रानवट स्वप्नेंहि फारशीं असत्य नाहींत; मग, आज-काल्च्या इंग्लिश किंवा अमेरिकन मनुष्यांमध्यें विशेष प्रचलित असणाऱ्या

समाजाला तीं पटोत किंवा न पटोत. व्यवहारज्ञानाला पटणारी प्रत्येक गोष्ट कांहीं सत्यच असते असें नाहीं. निसर्गात रानवेलीप्रमाणें कोवीलाहि स्थान आहे. मनुष्यप्राणी निर्माण होण्यापूर्वी अस्तित्वांत असलेले साप, गिधाड, पंख असलेले उडते साप यांच्या मूळ स्वरूपाची प्रचीति आणून देणारे त्यांचे सांगाडे भूगर्भ-शास्त्रज्ञांना संशोधनाअंतीं पृथ्वीच्या पोटांत सांपडले असून त्यावरून मानवपूर्व अतिप्राचीन काळच्या प्राण्यांबद्दल पुसटती, ओझरती कल्पना येते. हिंदूंच्या कल्पनेप्रमाणें पृथ्वी हत्तीच्या आधारावर उभी आहे, तो हत्ती एका कासवावर उभा आहे, आणि तो कासव एका शेषावर उभा आहे. आणि हा योगायोग फारसा महत्त्वाचा नसेल कदाचित्, पण हत्तीला सांवरू शकेल एवढ्या मोठ्या कासवाचा सांगाडा अलीकडेच आशियांत सांपडलेला आहे ह्या गोष्टीचा येथें निर्देश करणें अस्थानीं होणार नाहीं. कालाचा व विकासाचा क्रम ओलांडून पल्याड भरारी मारणाऱ्या ह्या बेफाट कल्पना खऱ्या मानण्याकडे माझ्या मनाची प्रवृत्ति आहे हें मी कबूल करतों. त्यांच्यामुळें बुद्धिमत्तेचें उदात्त स्वरूपाचें मनोरंजन होतें.

घरगुती प्राणी आपले जन्मजात हक्क बजावूं लागले कीं तें पाहूनसुद्धां मला मोठी मौज वाटते. कारण, आपल्या मूळच्या रानटी संवयी व जोम त्यांनीं सर्वस्वी गमावलेलीं नाहींत याची प्रचीति यावरून येते. आणि म्हणूनच, माझ्या शेजाऱ्याची गाय वसंत ऋतूच्या प्रारंभीं, कुरणांतून धूम पळत, वितळलेल्या बर्फामुळें फुगलेल्या थंडगार नदींतून धडाक्यानें शंभर-सव्वाशें वांव पोहून जातांना पाहिली कीं मी हरखून जातों.

लष्करी अधिकारी, किंवा विशिष्ट विषयावर लेख लिहिणारे लेखक अशा-सारख्यांच्या नांवाच्या परकी भाषेतील यादीवर नजर टाकली कीं, नांवांत कांहीं अर्थ नसल्याचें पुन्हां एकदां मला प्रत्यंतर येतें. उदाहरणार्थः मेन्शिकॉफ हें नांव एखाद्या कल्ल्यापेक्षां कांहीं माझ्या कानांना जास्त मानवी भासत नाहीं. एखाद्या उंदरा-घुशीलाहि तें नांव दिलेलें असावें. पोलिश किंवा रशियन लोकांचीं नांवें जशीं आपल्याला विचित्र वाटतात, तशींच आपलींहि त्या लोकांना वाटत असतील. कुत्र्यांच्या नांवाप्रमाणेंच माणसांचीं नांवें मला माफक व अर्थशून्य वाटतात.

माणसें जशीं स्थूलमानानें ओळखलीं जातात त्याप्रमाणें त्यांना ठोक स्वरूपांत नांवें दिलीं, तर तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें तें कांहींसें फायदेशीर ठरेल, असें मला वाटतें. एखाद्या व्यक्तीला ओळखण्यासाठीं जात व फार तर वंश किंवा वेगळेपणा एवढेंच जाणून घेण्याची गरज पडेल. रोमन सैन्यांतील प्रत्येक खासगी

सैनिकाला त्याचें स्वतःचें असें नांव होतें असें मानायला कांहीं आम्ही तयार नाहीं. कारण त्याला स्वतःचें असें व्यक्तिमत्व होतें अशी आमची समजूत नाहीं.

लाडकीं नांवें, टोपणनांवें, उपरोधिक नांवें, थट्टेनें दिलेलीं नांवें हींच सध्यांचीं आपलीं खरीं नांवें होत. एखाद्या मुलाची विशेष धडाडीची वृत्ति पाहून त्याचे सवंगडी थट्टेनें त्याला त्याच्या वृत्तीचें निदर्शक असें एखादें गमतीचें टोपणनांव बहाल करतात; आणि मग त्या मुलाचें पाळण्यांतलें नांव मागें पडतें व त्याची जागा हें नवें नांव घेतें. कांहीं प्रवासी सांगतात कीं, एका रेड इंडियन माणसाला म्हणे प्रथम कांहीं नांवच ठेवलेलें नव्हतें; तर तें त्यानें मिळविलें; आणि अशा-प्रकारें त्याचें नांव हीच त्याची कीर्ति ठरली. एवढेंच नव्हे, तर कांहीं टोळी: जमातींत आपल्या प्रत्येक नवीन पराक्रमाबरोबर त्यानें नवीननवीन नांव कमावलें. खरोखर, नांव व कीर्ति कांहींच न मिळवणाऱ्या माणसानें केवळ सोयीसाठीं नांव धारण करणें ही नामुष्कीची गोष्ट आहे.

विल्यम किंवा एडविन् यांसारखें एखादें परिचित नांव धारण करणारा माझा शेजारी आपलें जाकीट काढून ठेवतो त्याबरोबर आपलें तें नांवहि काढून बाजूला ठेवतो असें माझ्या दृष्टोत्पत्तीस येतें. तो झोपेंत किंवा रागांत असतो किंवा विकारवश होतो, किंवा कोणत्याहि प्रेरणेनें उत्तेजित झालेला असतो, तेव्हां तें नांव त्याला चिकटून असत नाहीं. अशावेळीं, त्याचा एखादा निकटचा नातलग दांतओठ खात किंवा रसाळ वाणीनें त्याच्या मूळच्या रानटी नांवानें त्याला संबोधित असल्याचा मला भास होतो.

प्रकाशाच्या चेतवणीचासुद्धां अतिरेक होण्याचा संभव असतो. नीपे या फ्रेंच गृहस्थानें रासायनिक बदल घडवून आणण्याचा सूर्यकिरणांचा गुणधर्म शोधून काढला आहे. त्याच्या या शोधानुसार ग्रॅनाइटसारखे वज्रतुंड खडक, दगडाचें बांधकाम, व धातूचे पुतळे "या सर्वांवर सूर्यप्रकाशाचा—उन्हाचा सारखाच विध्वंसक परिणाम होतो; आणि तेवढीच आश्चर्यकारक अशी निसर्गाची दुसरी भरपाईची उपाययोजना नसती, तर विश्वाच्या एका अत्यंत सूक्ष्म कार्यशाखेच्या नाजुक स्पर्शानें लौकरच ह्या गोष्टी नष्टप्राय झाल्या असत्या. परंतु दिवसा ज्या वस्तूंमध्यें हा बदल घडून येतो त्यांजमध्यें, रात्रीच्या वेळीं—सूर्यकिरणांच्या प्रक्षुब्ध-तेचा प्रभाव त्यावेळीं नसल्यामुळें—स्वतःला पूर्वस्थितीवर आणण्याची शक्ति वास करीत असते." आणि यावरून असा निष्कर्ष काढण्यांत आला कीं, "रात्र व झोप हीं जशीं सजीव जगताला आवश्यक असतात ही गोष्ट आपल्याला माहीत आहे, त्याचप्रमाणें निर्जीव वस्तूंनाहि कांहीं काळ काळोखाची जरुरी असते."

अनुक्रम २५८६३ वि: ... क्रमांक ... नों: दि:



रोज रात्रीं चंद्रसुद्धां प्रकाशत नाहीं; तर तो काळोखालाहि वाव देत असतो.

उपयुक्त ज्ञानाचा फैलाव करणारी एक संस्था असल्याचें आमच्या कानीं आलें आहे. ज्ञान ही शक्ति वगैरे असल्याचेंहि बोललें जातें. माझ्या मतें उपयुक्त अज्ञानाचा फैलाव करणाऱ्या संस्थेचीहि तेवढीच आवश्यकता आहे. खरें म्हणजे या उपयुक्त अज्ञानाला सुंदर ज्ञान—परमार्थानें उपयुक्त ज्ञान असें आपल्याला म्हणतां येईल. कारण, तसें म्हटलें तर, आपल्या प्रत्यक्ष अज्ञानाचा फायदा हिरावून घेणारी तथाकथित ज्ञानाची बरीचशी आपली बढाई ही, आपल्याला कांहीं तरी समजतें या अहंभावाचीच द्योतक नाहीं काय ? ज्याला आपण ज्ञान म्हणतों तें बऱ्याच वेळां निश्चित स्वरूपाचें आपलें अज्ञान असतें; तर अज्ञान हें आपलें अभावसूचक ज्ञान असतें.

मनुष्याचें अज्ञान हें कधीं कधीं केवळ उपयुक्तच असतें असें नव्हे, तर सुंदरहि असतें; तर त्याचें तथाकथित ज्ञान हें बऱ्याच वेळां अत्यंत निरुपयोगी, कुचकामी, एवढेंच नव्हे, तर कुरूपहि असतें. कोणत्या माणसाशीं वागणें तुम्हाला विशेष सोपें जाईल ?—ज्याला एखाद्या विषयाचें कांहींच ज्ञान नाहीं, आणि अत्यंत दुर्मिळ अशी गोष्ट म्हणजे आपल्याला कांहीं माहीत नाहीं ह्याची ज्याला जाणीव आहे अशा माणसाशीं, कीं, ज्याला त्या विषयाची थोडीशीच माहिती आहे, पण स्वतःला सर्व कांहीं समजतें अशी ज्याची भावना आहे अशाशीं ?

ज्ञानाची लालसा मला अधूनमधूनच होते, परंतु माझ्या पायांना ज्ञात नसलेल्या वातावरणांत माझ्या डोक्याला स्नान घालण्याची माझ्या मनाची ओढ मात्र कायमची व सततची आहे. उच्चतम गोष्ट जर आपल्याला कोणती साधायची असेल तर ती ज्ञान ही नव्हे; तर बुद्धिमत्तेबद्दल सहानुभावाची वृत्ति अंगीं बाणणें. पूर्वी ज्याला आपण **ज्ञान** मानलें त्याच्या अपुरेपणाच्या आकस्मिक प्रत्ययामुळें वाटणारें एक अभिनव व महान् आश्चर्य यापलीकडे या उच्च ज्ञानाचें निश्चित असें कांहीं स्वरूप असेल असें कांही मला वाटत नाहीं. हा प्रत्यय म्हणजे आपल्या तत्त्वज्ञांच्या कधीं स्वप्नांतहि आलेल्या नाहींत अशा अनेक गोष्टी आकाशांत व पृथ्वीवर असल्याचा होणारा आढळ. सूर्यानें धुकें प्रकाशित करावें तसें हें आहे.

आपल्याला पाळतां येईल असा कायदा असावा अशी इच्छा बाळगण्यांत कांहींशी गुलामगिरीची वृत्ति आहे. वस्तुजाताच्या नियमांचा अभ्यास आपण आपल्या सोयीसाठीं व सोयीसवडीनुसार करूं; पण यशस्वी जीवन कोणताहि कायदा जाणत नाहीं. आपण बंधनांत होतों ह्याची पूर्वी आपल्याला जाणीव

नसतांना एखादा कायदा आपल्याला बंधनकारक आहे ह्याचा आपल्याला आढळ होणें ही निश्चितपणें दुर्दैवाची गोष्ट होय. धुक्याच्या लेकरा, स्वच्छंदपणें जीवन कंठीत राहा. ज्ञानाबद्दल आदर राखून आपल्याला असें म्हणतां येईल कीं, आपण सर्व धुक्यार्चीच लेंकरें आहोंत. कायदेकानू करणाऱ्याशीं असलेल्या नात्याच्या संबंधांमुळें, जगण्याचें स्वातंत्र्य घेणारा मनुष्य हा सर्व कायद्यांहून वरचढ ठरतो.

**विष्णुपुराणांत** असें म्हटलें आहे कीं, "जे आपल्याला बंधनांत टाकीत नाहीं तें कर्तव्य क्रियाशील होय; व आपल्याला स्वातंत्र्यप्रद ठरतें तेंच खरें ज्ञान. इतर सर्व कर्तव्यकर्म शीणवटा आणण्याच्या कामाचें असून इतर सर्व ज्ञान म्हणजे केवळ कलावंताची चतुराई होय."

बहुतेक सर्व मनुष्यांना समाजाच्या ओढीचें आकर्षण असतें; पण निसर्गाची तीव्र ओढ मात्र फारच थोड्यांना असते. निसर्गाबाबतच्या वृत्तींत माणसें, त्यांच्या कला लक्षांत घेऊनहि, मला बहुंशीं जनावरादि प्राण्याहून कमी प्रतीचीं वाटतात. जनावरांप्रमाणें निसर्गाशीं त्यांचें नातें फार करून उत्कृष्टप्रकारचें असत नाहीं. सृष्टीच्या देखाव्याच्या सौंदर्याची आपल्याला किती अल्प मातब्बरी वाटते! ग्रीक लोक जगाला 'सौंदर्य' किंवा 'सुव्यवस्था' म्हणत हें आपल्याला सांगावें लागतें. परंतु एवढें असूनहि ते तसें कां म्हणत हें आपण चांगल्याप्रकारें जाणून घेत नाहीं. फार तर, भाषाशास्त्रांतील तें एक विलक्षण वचन आहे असें आपण मानतों झालें.

त्या दिवशीं सायंकाळीं स्पॉल्डिंग्ज फार्मवर मी फेरफटक्याला गेलों होतों. त्यावेळीं, मावळत्या सूर्यानें पाईन वृक्षांच्या एका भव्य वनाचा समोरचा भाग उजळून टाकल्याचें मला दिसून आलें. एखाद्या विशाल दिवाणखान्याच्या भोंवतालच्या दालनांतल्याप्रमाणें सूर्याचीं सोनेरी किरणें त्या वनाच्या कडेच्या भागांत फांकलीं होतीं. एखादें प्राचीन आणि अगदीं थोर व तेजस्वी कुटुंब, मला अपरिचित असलेल्या कॉन्कॉर्डच्या त्या भूप्रदेशावर स्थायिक झालें असावें असा भास मला झाला. गांवचें निमंत्रण नसल्यानें गांवच्या समाजाकडे न वळलेला सूर्य जणू काय या कुटुंबाचा सेवक बनला होता! स्पॉल्डिंगच्या त्या क्रॅनबेरी मळ्यावरील त्यांची ती पार्क, त्यांचें क्रीडामैदान हें सारें त्या वनांतून पलीकडे मी पाहिलें. पाईन वृक्ष वाढत होते तसतसे त्यांना कोनवांसे वगैरे पुरवीत होते. त्यांचें घर दृष्टीला पडत नव्हतें; त्यामधून झाडें वाढलीं होतीं. कोंडल्या गेलेल्या उल्हसित वृत्तीचे साद माझ्या कानीं पडले कीं काय तें मात्र मला सांगतां येत नाहीं. ते सूर्यकिरणां-

वर ओठंगून राहिलेले दिसत होते. त्यांना पुत्र व कन्या आहेत. खुशाल मजेंत आहेत ते. शेतकऱ्यांचा गाडीरस्ता त्यांच्या दिवाणखान्यांतून सरळच्या सरळ गेलाय्; पण तो त्यांना बिलकूल बाजूला सारीत नाहीं आहे. तर एका तळयाचा चिखलमय तळ, त्यांत प्रतिबिंबित झालेल्या आकाशामधून कधीं कधीं दिसतो. त्यांनीं कधींहि स्पॉल्डिंगचें नांव ऐकलेलें नाहीं; कीं, तो आपला शेजारी असल्याचीहि त्यांना जाणीव नाहीं. पण एवढें असूनहि तो शीळ घालीत आपल्या परिवाराला हांकीत त्या घरामधून गेल्याचें माझ्या कानांत पडलें आहे. त्यांच्या जीवनांतील प्रसन्नतेची बरोबरी कोणतीहि गोष्ट करूं शकत नव्हती. त्यांचें कुलमानानुसारी रंगीत ध्वजादि बोधचिन्ह नुसतें शेवाळ आहे. पाईन व ओक वृक्षांवर तें रंगवलेलें मीं पाहिलें. त्यांच्या घराचे पोटमाळे-मनोरे वृक्षांच्या शेंड्यांवर होते. त्यांना राजकारणाचें वावडें आहे. मजुरांचाहि गोंगाट तिथें नव्हता. त्यांनीं कापड विणलेलें किंवा कापूस पिंजलेला कांहीं मी ऐकला नव्हता. तरीपण, वारा शांतपणें पडून राहिला व ऐकण्यासारखें कांहीं उरलें नाहीं म्हणजे 'अशा वेळीं, मे महिन्यांत दूरवरच्या मोहोळाची गुणगुण कानीं यावी त्याप्रमाणें कल्पनासुंदर गोड संगीतमय गुणगुण माझ्या प्रत्ययास येई. त्यांच्या विचारमंथनाचा कदाचित् तो ध्वनि असावा. त्यांना आळसट विचार सुचत नसत; आणि बाहेरचा कुणीहि त्यांचें काम पाहूं शकत नसे. कारण त्यांचा उद्योगधंदा गांठी किंवा अवाळूं यांच्यासारखा एकवटलेला नव्हता.

परंतु त्यांचें स्मरण करणें मला कठिण जातें आहे. आतां मी बोलत असतांना व त्यांची आठवण करण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करीत असतांनाहि माझ्या मनांतून ते अनिवार्यपणें पुसटून जाताहेत. माझे सर्वोत्तम विचार आठवण्याचा केवळ दीर्घ व चिकाटीचा प्रयत्न केल्यानंतरच त्यांच्या सहअस्तित्वाची मला पुन्हा जाणीव होते. अशा प्रकारचीं कुटुंबें मला आढळलीं नसतीं, तर मला वाटतें मी कॉन्कॉर्ड सोडून गेलों असतों.

न्यू इंग्लंडमध्यें आपणा लोकांत असें म्हणण्याचा प्रघात आहे कीं, आपल्या प्रदेशांत येणाऱ्या कबुतरांची संख्या दिवसेंदिवस कमी कमी होऊं लागली आहे. आपलीं रानेंवनेंच मुळीं त्यांना उंच शाखासंभार पुरवीत नाहीत. म्हणून, असेंहि दिसून येईल कीं, प्रत्येक वाढत्या माणसाच्या डोक्यांत दिवसेंदिवस कमी कमी विचार येऊं लागले आहेत. कारण, आमच्या मनांतील वनराई ओसाड पडत चालली आहे. महत्त्वाकांक्षेच्या अनावश्यक विस्तवासाठीं विक्रय केल्यामुळें किंवा गिरण्यांत पाठवल्यामुळें अशी दशा झाली आहे. आणि म्हणून त्यांना

वरतीं बांधायला किंवा वसायला क्वचितच एखादी फांदी उरली असेल.

आपण आपले पृथ्वीला मिठी मारून आहोंत; कुठें चढतोंसंवरतों क्वचितच. माझ्या मतें आपणाला थोड्या जास्त उंचीपर्यंत मजल मारतां येईल. आपणाला निदान एखाद्या झाडावर चढतां येईल. झाडावर चढण्याचा माझ्यापुरता अनुभव मी एकदां घेतला आहे. एका डोंगराच्या माथ्यावरचा उंच सफेद पाईन वृक्ष होता तो. आणि जरी मी फार उंचीवर जाऊन ठेपलों, तरी त्याचा चांगला मोबदला मिळाला मला. कारण, पूर्वीं कधींहि न पाहिलेले पर्वत, क्षितिजावर माझ्या दृष्टोत्पत्तीस आले; त्याचप्रमाणें पृथ्वीचा व आकाशाचा कितीतरी अधिक टापूहि. त्या झाडाच्या बुंध्याच्या जवळपास मी तब्बल सत्तर वर्षें भटकत राहिलों असतों, तरीसुद्धां या नव्या गोष्टी कांहीं माझ्या दृष्टीस पडल्या नसत्या खास. तो जूनच्या अखेरीअखेरीचा काळ होता; त्यांतून विशेष गोष्ट म्हणजे फक्त सर्वांत उंच असलेल्या डहाळयांच्या टोकांवर, आकाशाकडे दृष्टि वळवलेल्या कांही बारीक बारीक नि उभट तिकोनी लाल नाजुक फुलांचा मोहर फुललेला माझ्या भोवतालीं मला आढळला. अगदीं शेंड्यावरची डहाळी तोडून ती मीं सरळ गांवांत घेऊन गेलों व तिथें रस्त्यावर अनोळखी ज्यूरी मंडळी भेटली—कारण तो कोर्टाचा दिवस होता—त्यांना दाखवली. एवढेंच काय, पण शेतकरी, लांकडाचे व्यापारी, लांकूडतोडे व पारधी अशा अनेकांना ती मीं दाखवली. परंतु, त्यांच्यापैकीं एकाजणानेंहि असलीं फुलें कधींहि पाहिलीं नव्हतीं. उलट, एखादा तारा निखळून पडलेला दिसावा तसे ते आश्चर्यचकित झालेले दिसले. कुरणां-मळ्यांवर आपल्या पायांलगतचीं तेवढीं फुलें आपण पाहतों. पाईन वृक्ष आपला नाजुक मोहर, युगानुयुगें प्रत्येक वसंत ऋतूंत, आपल्या शेंड्याच्या डहाळ्यांवर उंचवरून टाकीत आले आहेत; पण एवढें असून त्या प्रदेशांतील क्वचितच एखाद्या शेतकऱ्यानें किंवा पारध्यानें कधीं काळीं तीं फुलें पाहिलीं असतील !...

गेल्या नोव्हेंबरांत आम्ही सूर्यास्ताचें एक न्यारें दृश्य पाहिलें. मी एका मळ्यांतून चाललों होतों. त्याच मळ्यांत एक ओढा उगम पावला होता. निरुत्साही भुरकट दिवसाच्या अखेरीला अगदीं मावळण्यापूर्वीं जेव्हां सूर्य सरतेशेवटीं क्षितिजावरील स्वच्छ आकाशपटलावर जाऊन पोंचला, तेव्हां, प्रभातकाळासारखीं अत्यंत कोवळीं, चमकदार सूर्यकिरणें उलट दिशेच्या क्षितिजाजवळील वाळलेल्या गवतावर व झाडांच्या बुंध्यांवर, आणि डोंगरभागावरील ओकाच्या झुडुपांच्या पानांवर पडलीं. तर, पूर्वेकडे पसरलेल्या मळ्यावर आमच्या सांवल्या लांबवर पसरत गेल्या; —जणूं काय त्या किरणांतील रजःकण काय ते आम्हीच होतों. क्षणापूर्वीं

आम्हाला कल्पनाहि आली नसती अशा प्रकारचा तो प्रकाश होता; आणि त्यावेळीं हवाही इतकी उबदार व प्रसन्न होती कीं, त्या मळ्याचें नंदनवन बनायला आणखी कशाचीहि आवश्यकता नव्हती. तें लोकोत्तर दृश्य पुन्हा कधीं दृष्टीस पडणार नाहीं असें नाहीं; तर नेहमींच सायंकाळीं, अनंत काळपर्यंत तें दृष्टीस पडत राहील. आणि त्या त्या वेळीं तेथें भटकत आलेल्या नव्यानव्या पिढींतील मुलास तें हर्षित करील व दिलासा देत जाईल ही गोष्ट विचाराअंतीं आमच्या लक्षांत आली, तेव्हां त्याची अपूर्वाई आम्हाला विशेषच वाटली.

आपल्या तेजानें व सौंदर्यानें नगरांना न्हाऊं घालणारा सूर्य, कुठेंहि घरदार दृष्टीस पडत नाहीं अशा एखाद्या निवान्त शेतमळ्यावर तेवढ्याच तेजसौंदर्याची बरसात करीत, क्वचित् अभूतपूर्व अशा तऱ्हेनें मावळतो. अशावेळीं तेथें असलेला एकाकी पाणससाणा आपल्या पंखांना मावळत्या किरणांकडून सोन्याचा मुलामा प्राप्त करून घेतो; किंवा एखादी खार आपल्या ढोलींतून बाहेर डोकावत असते, आणि त्या दलदलींत मध्यावर, काळसर प्रवाह असलेला एखादा लहानसा ओढा एखाद्या कुजत चाललेल्या खुंटाभोवतीं संथपणें वळसा घेत नागमोडी वळणानें जाऊं लागलेला असतो. कोमेजलेल्या गवताला व पानांना मुलामा देणाऱ्या त्या निर्मळ, चकचकीत त्याचप्रमाणें कोवळ्या व प्रसन्न प्रकाशांतून आम्ही चालत होतों. मला तर त्यावेळीं असें वाटलें कीं, बिलकूल खळबळ किंवा लाटा नसलेल्या अशा सोनेरी पुरांत यापूर्वीं मी कधींहि न्हाऊन निघालेलों नाहीं. प्रत्येक रानावनाची पश्चिम बाजू व उंचवटा, स्वर्गाच्या सीमेसारखा चकाकत होता; आणि आमच्या पाठीमागें असलेला सूर्य, एखाद्या सौम्य वृत्तीच्या गुराख्याप्रमाणें आम्हाला सायंकाळीं घराकडे परतवीत असल्याचा भास होत होता.

अशाप्रकारें 'पवित्र भूमी'च्या दिशेनें आमची वाटचाल चाललेली आहे. आणि शेवटीं एक दिवस अभूतपूर्व अशा तेजानें सूर्य तळपेल, कदाचित् आमच्या मनांत व हृदयांत प्रकाश पाडील, आणि शरद् ऋतूंतील नदीकांठावरील उबदार, प्रसन्न व सोनेरी प्रकाशाप्रमाणें जाग आणणाऱ्या प्रभावी तेजानें आमचीं सबंध जीवनें उजळून टाकील.

# निवडक घरगुती पत्रें

## दोन मृत्यु[१]

प्रिय मैत्रिणी,

इकडली हकीगत इतर मार्गांनीं तुला समजलीच असेल. तेव्हां मी तुला कांहीं नवीन सांगेन असं नाहीं. मी होतों तसाच आहें; याहून कितीतरी चांगला असायला हवा होतों, नाहीं का? तरीपण, ज्या गोष्टीचा परिस्फोट झाला आहे ती गोष्ट आणि अभावितपणें मी बजावीत असलेल्या भूमिकेचा मोठेपणा ह्यांची मला जाणीव झाली कीं, मी रोमाञ्चित होतों. आणि जणूं कांहीं ह्याला इतिहासांत दुसरी तोड नाहीं असं वाटूं लागतं.

जॉनच्या[२] मृत्यूनंतर कांहीं वेळानं मी संगीत–पेटिका ऐकत बसलों होतों. आणि जर कधीं काळीं, ती घटना विश्वाच्या सौंदर्याशीं व एकतानतेशीं विसंगत असल्याचें दिसून आलें असतें, तर आकाशाच्या पोकळींत स्वैर घुमणाऱ्या मधुर व निरुपद्रवी अशा त्या संथ स्वरालापांनीं, निसर्गाच्या सौम्य गतीशीं तिला चांगलीच निबद्ध करून ठेवली असती. परंतु ह्या गोष्टी मला दुःखद वाटण्यापेक्षां विचित्र जास्त वाटतात. मी अद्यापि आश्चर्यचकित होतों ना?–मग, मला शोक करायचा काय अधिकार! प्रथम आपल्याला असं वाटतं कीं, जणूं कांहीं दयाळूपणा व सहानुभूति दाखविण्याची संधि कांहीं वेळां आपण गमावली आहे.

१ प्लायमाउथ येथील श्रीमती लुसी ब्राउन हिला लिहिलेलें पत्र. कॉन्कॉर्ड येथून २ मार्च १८४२ रोजीं धाडलेलें. श्रीमती ब्राउन ही इमर्सनच्या दुसऱ्या पत्नीची वहीण असून एच. एस्. कॅन्बी यांच्या म्हणण्याप्रमाणें थोरो यांचें मन आकर्षून घेणारी ही दुसरी स्त्री होती.

२ जॉन हा हेन्री थोरोचा भाऊ. हेन्रीच्या अनेक कार्यांत तो सहकार्य करीत असे. परंतु दाढी करतांना झालेली केवळ क्षुल्लक जखम सुजून तिचें भयंकर पर्यवसान शेवटीं त्याचा मृत्यु ओढवण्यांत झालें.

परंतु मागाहून आपण समजून चुकतों कीं, **निव्वळ शोकामुळें** त्या सर्वांची पुरेशी भरपाई होते. मात्र आपण एकनिष्ठ असलों पाहिजे. कारण, मोठा शोक म्हणजे घटनांची व्यवस्थित मांडणी करणाऱ्या आत्म्याबद्दलची सहानुभूति असून अरबस्तानी वृक्षांवरील राळीइतकाच तो नैसर्गिक असतो. कायमचा शोक करीत राहण्याचा हक्क फक्त निसर्गालाच पोंचतो. कारण तोच तेवढा निष्पाप असतो. लौकरच बर्फ वितळूं लागेल, आणि ज्या नदीवर त्यानें वारंवार नौकाविहार केला आहे तिच्या कांठावर काळे बुलबुल पक्षी नेहमींप्रमाणें सुरेल गाऊं लागतील. ईश्वराच्या या मुखवट्यांत तीच चिरकाल टिकणारी प्रसन्नता दिसून येईल, आणि म्हणून त्याच्या अभावीं आपण दुःखी होणार नाहीं.

जॉनला—म्हणजे मरण पावलेल्या—पुन्हा कधीं भेटण्याची इच्छा मला नाहीं. परंतु, ज्याचा तो अपूर्ण प्रतिनिधि होता व ज्यालाच केवळ भेटण्याची किंवा तद्रूपीं विलीन होण्याची इच्छा त्याला झाली असती, त्या दुसऱ्या जॉनला मात्र भेटण्याची माझी इच्छा आहे. कारण आपण आहोंत तसे नाहीं; किंवा त्याप्रमाणें आपण एकमेकांशीं वागत नाहीं वा एकमेकांना तसे मानीतहि नाहीं. तर, जे कांहीं बनण्याची आपली समर्थता असते तिच्यावरून आपण एकमेकांची योग्यता मानतों.

वाल्डोबद्दल[3] बोलायचं म्हणजे, एखाद्या ओढ्यावरील धुकं तरंगत वरवर सरकतं ना—त्यांत सूर्य आपल्या किरणांच्या शलाका लौकरच घुसविणार असतो—तसं त्याचं देहावसान झालं. प्रत्येक शरद् ऋतूंत फुलं नाहीं का मृत्युमुखीं पडत? त्यानं मुळीं इथं मूळच धरलं नव्हतं. तो मरण पावला हें ऐकून मी कांहीं दचकलों नाहीं. अत्यंत नैसर्गिक घटना घडावी तसं वाटलं. त्याच्या नाजुक देहाला तीच ओढ लागली होती, आणि निसर्गानं ती विनंति सौम्यपणानं पुरी केली. तो जगला असता तरच विचित्र वाटलं असतं. त्याच्या मृत्यूबद्दल निसर्गसुद्धां दुःख व्यक्त करणार नाहीं. परंतु लौकरच चंडोलाची लकेर कुरणा-मळ्यावर ऐकूं येईल, आणि गेल्या वसंत ऋतूंत जेथून डॅन्डेलियनचीं पिवळीं जर्द फुलं त्यानं खुडलीं होतीं त्याच जुन्या रोपट्यांतून ताजीं रसरशीत फुलें उमलतील.

गेले कांहीं दिवस माझी प्रकृति बरी नाहीं; पण आतां जरा बरं वाटूं लागलंय्. तिकडल्या त्या जगांत तुझं सध्यां कसं काय चाललंय्? मेरी रसेलला विचारलंय्

३ वाल्डो हा इमर्सनचा मुलगा. कसल्यातरी तापाचें निमित्त होऊन तो अचानक मरण पावला. इमर्सननें त्याच्यावर ‘ थ्रेनॉडी ’ ही कविता रचली आहे.

म्हणून सांग. मी कल्पनेच्या भराऱ्या मारीत असलों तरी त्याबद्दल तूं मला दोष देतां नये; कारण मी आहें तुझाच स्नेहांकित—

हेन्री डी. थोरो.

## रानकोंबड्यांसारखें सुख[४]

"आपल्याला खायला पाव मिळाला पाहिजे." पण तो कोणता? बेकरी-वाल्याचा? माझ्या मतें तो चांगला घरगुती बनवलेला असला पाहिजे. आपलं मांस कोणतं? खाटकाकडचं का? आपल्याला जें मिळालंच पाहिजे तें काय? आपण सध्यां मिळवीत असलेला पाव गोड आहे का? आपला हा पाव प्रथम आंबवून मग क्षार घालून गोड बनवलेला, आम्लादि अनेक प्रक्रियांमधून कुजवलेला व शेवटीं सफेत मोरचूद घालून शुभ्र बनवलेला असतो. हाच का पाव आपल्याला मिळाला पाहिजे? मनुष्यानं आपलं अन्न निढळाच्या घामानं कमावलं पाहिजे हें खरं; पण त्याबरोबर हेंहि खरं कीं निढळाच्या आंत असलेल्या मेंदूच्या घामानंहि तें कमावलेलं असलं पाहिजे. देह हा फक्त देहाचंच पोषण करूं शकेल. माझ्या आजवरच्या आयुष्यांत मी फारच थोडा पाव चाखला असेल. त्यांतला बराचसा भाग निव्वळ चंदी व वैरणीसारखा चरबट असतो. मेंदू व हृदय यांचं पोषण करणारा पाव क्वचितच कुणी खाल्ला असेल. श्रीमंत लोकांच्याहि खाण्यांत तो बिल्कूल नसतो.

सर्वच मनुष्यांसाठीं एकाच जातीचं अन्न असत नाहीं. ज्या शक्तींचा तुम्ही वापर करतां त्यांची झीज भरून निघण्यासाठीं त्यांचं पोषण करणं तुम्हाला भाग आहे—नव्हे, तुम्ही तें करालच. शरीर थकलेल्या मजुराला, मेंदू थकलेल्या विद्वानाला लागेल तसलंच अन्न आवश्यक नसतं. माणसांनीं जनावरांप्रमाणं मूर्खपणानं परिश्रम करतां नये. तर, मेंदू व शरीर ह्यांनीं नेहमीं, किंवा निदान शक्य तोंवर, बरोबरीनं काम केलं पाहिजे व विश्रांति घेतली पाहिजे. मग, तें काम अशा प्रकारं होईल कीं, शरिराला भूक लागेल तेव्हांच मेंदूलाहि लागेल; आणि अन्न दोहोंनाहि पुरं पडेल. नाहींतर, बेसुमार कष्टावलेल्या शरिराची झीज भरून

४ हॅरिसन ब्लेक यांना वर्सेस्टर येथें २ मे १८४८ रोजीं धाडलेलें पत्र. मॅसॅच्युसेट्स-मधील वर्सेस्टर येथें श्री. ब्लेक रहात होते व थोरो यांचे ते निकटचे स्नेही होते.

काढणारं अन्न कांहीं काम न करतां स्वस्थ राहिलेल्या मेंदूला जाचक ठरेल. आणि त्यामुळं निकृष्ट बनलेला विद्वान् सर्व प्रकारचं अन्न निकृष्ट मानूं लागेल व सर्वांना जीवन कष्टदायक होऊन बसेल.

आपण आपलं अन्न कसं कमवायचं हा गंभीर प्रश्न आहे; तसाच तो गोड व आवाहन करणारा आहे. परंतु बहुधा तो टाळला जातो, तसा आपण तो टाळतां नये. मनुष्याच्यापुढं उभा केलेला तो एक अत्यंत महत्त्वाचा व व्यवहारी प्रश्न आहे. उताविळीनं आपण त्याचं उत्तर देतां नये. आपलं अन्न ठोकळ मानानं, निष्काळजीपणानं व घायकुतीपणानं मिळवण्यांत आपण समाधान मानतां नये. कांहीं लोक शिकारीला जातात, कांहीं मासेमारीला, तर कांहीं लढाईला; परंतु आपलं अन्न कमावण्यासाठीं आस्थेनें धडपडणाऱ्या लोकांचा वेळ जेवढा मजेंत जातो तेवढा त्यांचा जात नाहीं. आपलं हृदय, जीवन व सामर्थ्य एकवटून प्रामाणिकपणानं व कळकळीनं जे आपलं अन्न कमावण्यासाठीं धडपडतात त्यांना तें मिळतंच मिळतं; एवढंच नव्हे, तर त्यांना तें खात्रीनं फार गोड लागतं. ही गोष्ट प्रत्यक्षतः त्याचप्रमाणं वस्तुतः, आणि भौतिकदृष्ट्या त्याचप्रमाणं आध्यात्मिक-दृष्ट्याहि खरी आहे. थोडासा पाव—त्याचे थोडेसे तुकडेसुद्धां, जर ते योग्य प्रतीचे असतील तर तेवढेच पुरेसे आहेत. कारण ते अतिशय पोषक असतात. म्हणून प्रत्येक मनुष्यानं आपण मरण्यापूर्वीं अस्सल पावाचा निदान एक तरी तुकडा आपल्या देहासाठीं कमवावा, व त्याची चव चाखावी. म्हणजे त्याला असं कळून येईल कीं, जीवनाच्या अन्नाशीं तो एकजीव होतो, आणि तीं दोन्ही एक घास बनूनच गिळलीं जातात.

आपला पाव कधींहि आंबलेला किंवा पचायला कठिण असण्याचं कांहींहि कारण नाहीं. निसर्गाचा जो संबंध मनाशीं तोच शरिराशीं. तो जसं आपल्या कल्पनाशक्तीचं पोषण करतो, तसंच आपल्या शरिराचंहि. कारण त्याच्या म्हणण्यांत तथ्य असतं व त्याप्रमाणं कृति करायलाहि तो तयार असतो. केवळ कवीच्या दृष्टीला तो सुंदर वाटतो असं नव्हे. इंद्रधनुष्य व सूर्यास्तच सुंदर असतात असं नाहीं, तर योग्य प्रकारं आपलं पोषण होणं आणि आपल्याला कपडालत्ता, निवारा व ऊब मिळणं ह्या गोष्टीहि तितक्याच सुंदर व उत्साहप्रेरक आहेत. मनुष्याच्या जीवनांतून समूळ उपटून काढतां येणार नाहीं अशी एखादी स्थूल स्वरूपाची व कुरूप गोष्ट असेलच असं कांहीं सांगतां येणार नाहीं. आपली कल्पनाशक्ति हुडकून काढील ते सर्व दोष नाहींसे करण्यासाठीं आपल्या जीवनांत आपण खरोखरीचे शिकस्तीचे प्रयत्न केले पाहिजेत. आपल्या आकांक्षा जेवढ्या

उंच आहेत तेवढीच आकाशाची पोकळी खोल आहे. झाड जेवढं उंच वाढूं पाहील तेवढ्या उंचीवर त्याला पोषक असं वातावरण असल्याचं आढळून येईल. पूर्णपणें अनिवार्य ठरेल अशा सामर्थ्याचं प्रतीक प्रत्येक मनुष्यानं बनलं पाहिजे. जिवंत राहण्याची ज्याची विजिगिषा आहे असा कोणताहि मनुष्य दुबळा असेलच कसा? अत्यंत कोवळीं रोपटींहि, कठिण जमिनींतून व खडकांच्या थरांतून वाट काढून वर सरतात; मग मनुष्य तर काय—कोणतीहि भौतिक शक्ति त्याला अडवूं शकणार नाहीं.

एक महान् तत्त्व सांगायचं म्हणजे मनुष्य 'चांगला' असूं शकेल किंवा 'वाईट'हि असूं शकेल; त्याचं जीवन 'खरं' असेल किंवा 'खोटं'हि असेल; तें त्याला लाजीरवाणं ठरेल किंवा उज्ज्वलहि ठरेल. चांगला माणूस स्वतःचा विकास घडवतो; तर वाईट माणूस स्वतःचा विनाश ओढवून घेतो.

परंतु जें कांहीं आपण करूं तें आत्मविश्वासानं केलं पाहिजे (जर आपण भित्रे असलों, तर मग भित्रेपणानं वागूं या),—अधिक प्रकाश मिळेल या अपेक्षेनं नव्हे, तर पुरेसा प्रकाश घेऊन जर आपणाला अधिकाची खात्रीची अपेक्षा असेल, तर त्याच्यासाठीं आपण थांबूं या. परंतु आपल्यापाशीं जें कांहीं आहे तें काय? आपण आधींच खोळंबलेलों नाहीं काय? हीं काळाची सुरुवात का आहे? कोणत्याहि वेळीं मनुष्य जिथं उभा असतो त्यापलीकडचं, किमान रेसभर पलीकडचं तरी, जो स्पष्टपणं पहात नाहीं असा कुणी आहे काय?

जो कुणी आपल्या मार्गांत कच खात असेल त्यानं पुढं मजल मारूं नये. आपल्या शंकांची त्यानं बूज राखावी. कारण, शंकांमध्येंसुद्धां कांहीं दैवीपणा असण्याचा संभव असतो. थोडीशीच श्रद्धा असणं खेदजनक नाहीं, तर थोडासाच एकनिष्ठपणा असणं खरोखरीच खेदजनक आहे. एकनिष्ठपणामुळं विश्वास संपादन केला जातो. जीवनाच्या प्रगतीमध्यें मनुष्य, आपल्या योग्य व ठरवून दिलेल्या मार्गावरून यत्किंचित् जरी विचलित झाला, तरी त्याच्या जीवनाचं नाटक शोकान्त बनतं व पांचव्या अंकाकडे—म्हणजेच शेवटाकडे धांव घेतं. एकदां का आपली अशा प्रकारं पिछेहाट झाली कीं, आपल्या मार्गांतील अड-चणींना सीमा राहणार नाहीं. आणि अशा वेळीं आपल्याला सल्ला देण्याएवढा शहाणा कुणी नसतो, कीं, त्या ठिकाणीं टिकाव धरून राहिलेलों असतांना आपल्याला साहाय्य करण्याएवढा समर्थहि कुणी नसतो.

माझ्या तत्त्वज्ञानांत दुःख-शोकाचं कांहीं तत्त्व नाहीं काय, असं तूं विचारतोस. तीव्र शोकाचा अनुभव त्या मानानं मला फारच थोडा आहे अशी माझी समजूत

आहे. माझे दुःखप्रद व अगदीं खरेखुरे शोक केवळ क्षणिक खेदजनक ठरण्याजोगे आहेत. शोकाची जागा कदाचित् विवक्षित निष्ठुरता व त्या मानानं कोरडी वेपर्वाई यांनीं भरून जात असेल. मी आपला गवताळ जमिनीच्या गोतावळ्यांतला आहें, आणि त्याच्या धीम्या सहनशीलतेंत मी ब-याच अंशीं सहभागी असतों—हिंवाळ्यांत वसंत ऋतूंतील सूर्याची मार्गप्रतीक्षा करीत. जेव्हां माझे माफक स्वरूपाचे विचार चाललेले असतात, तेव्हां 'चैतन्याचा शोध' घेण्याचं काम माझं नव्हे; तर माझा शोध घेण्याचं त्याचंहि काम आहे असं मला वाटण्याचा संभव असतो. आपली कधींहि तीव्र निराशा झाली नाहीं; तर उलट तिच्यांतून आपण एकेक कविता निर्माण केली, असं गटेनं जें म्हटलं आहे त्याचा गर्भितार्थ मी चांगल्या प्रकारं जाणतों. एकंदरींत अशा प्रकारची बरीच सहनशीलता माझ्या गांठीं आहे. क्षुल्लक व जवळ जवळ प्राणीसुलभ सुखानं मी अगदीं सहज संतुष्ट होऊन जातों. रानकोंबड्या असतात ना—बरंचसं त्यांच्यासारखं माझं सुख आहे.

माझ्या मतें मी कोणत्याहि बाबतींत स्वतःला बांधून असा घेत नाहीं, कीं माझ्या लहरींच्या हातचं निव्वळ बाहुलं बनत नाहीं. कारण मी नेहमीं थोडाफार त्यांचा टीकाकार बनलेला असतों. माझा अभिन्न अनुभव हा मला होणाऱ्या दर्शनांतून मिळतो. मला जाणीव होते त्याहूनहि कदाचित् जास्त प्रामाणिकपणानं मी हें दर्शन घेत असेन.

परंतु मी कशा तऱ्हेचा मनुष्य आहें—माझे गुण-अवगुण कोणते हें तुम्हाला सांगण्याचं कारण नाहीं. तुम्हाला तेवढी जरुरी वाटलीच तर तुम्हाला त्याबद्दल कल्पना करतां येईल. मला तर त्यांच्यांत नीटसा भेदभाव करतां येत नाहीं.

या खेपेला जंगलांतील माझ्या झोंपडींतून मी हें पत्र लिहीत नाहीं आहें. श्रीमती इमर्सन ह्यांच्या इथं सध्यां मी राहत आहें,—श्री. इमर्सन यांच्या गैरहजेरींत त्यांना सोबत म्हणून. त्यांचं बिऱ्हाड हें माझं जुनं घर आहे.

तुमच्या हें लक्षांत येईल कीं, तुमच्याशीं बोलतांना बऱ्याच वेळां मी जणूं काय स्वतःशींच बोलत असतों.

# थोर लोकशाहीवादी—व्हिट्मन्[५]

श्री. ब्लेक,

माझ्या अंदाजापेक्षां बरेच दिवस इथं मी राहिलोंय. परंतु मी पुन्हा कधीं परतेन याचा मला कांहींच अंदाज बांधतां येत नसल्यानं तुम्हाला पत्रोत्तर लिहायचं लांबणीवर टाकलं होतं. अजूनहि मला कांहीं सांगतां येत नाहीं. तीन–चार दिवस लागतील. या अनिश्चितपणामुळं तुम्हाला भेटण्याचा दिवस ठरवणं अशक्य झालंय्. शेवटीं तुमच्याकडून पुन्हा उत्तर येईपर्यंत फारच विलंब होईल. म्हणून मला असं वाटतं कीं, मी सरळ घरीं जावं. त्या 'वॉट् शाल इट् प्रॉफिट' लेक्चरची वर्सेस्टरमध्यें पुन्हा उजळणी करायला माझं मन घेत नाहीं. तरीपण, तें कामीं येईल अशी तुमची पक्की खात्री असेल (ही गंभीरपणं विचार करण्यासारखी गोष्ट आहे), तर कॉन्कॉर्डहून मी त्यासाठीं वेगळा प्रवास करायलाहि तयार आहें. माझीं तीन जुनीं भाषणें (तें धरून) मी इगल्सवूडच्या लोकांपुढं वाचून दाखवलीं आहेत; आणि अनपेक्षितपणं त्यांत मला आगळं यश आलेलं आहे. मी जें कांहीं सांगत होतों तें ते लोक अवधान ठेवून शांतपणं ऐकून घेत होते असं मला दिसून आलं.

आतां मी प्रामुख्यानं कामापुरतं पत्र लिहीत आहें याबद्दल तुम्ही मला माफ करा. कारण या वेळेपुरता मी दुसऱ्याचा नोकर आहें—इथं मी केवळ सर्वेअर थोरो या नात्यानं आहें. आणि या ठिकाणीं निवांतपणा क्वचितच वांट्याला येतो.

श्री. आल्कॉट[६] इथं तीनदां येऊन गेले. आणि गेल्याच्या मागल्या शनिवारीं ते व ग्रीली[७] ह्यांच्याबरोबर, ग्रीली यांच्या निमंत्रणावरून त्यांच्या शेतवाडीवर—न्यूयॉर्कच्या उत्तरेस छत्तीस मैलांवर—मी गेलों होतों. त्याच्या दुसऱ्या दिवशीं

५. न्यू जर्सीमधील इगलसवूड येथून १९ नोव्हेंबर १८५६ रोजीं हॅरिसन ब्लेक यांना वर्सेस्टरला धाडलेलें पत्र.

६. कॉन्कॉर्डमधील अमॉस ब्रॉन्सन आल्कॉट (१७९९—१८८८) यांच्या कुटुंबाशीं थोरो यांचे घरोब्याचे संबंध होते.

७. होरेस ग्रीली (१८११–१८७२): अमेरिकन पत्रपंडित व न्यूयॉर्क 'ट्रिब्यून'चे संस्थापक. अमेरिकन यादवीयुद्धाचे पाठीराखे. १८७२ सालीं अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठीं उभे राहिले, पण पराभूत झाले.

आल्कॉट यांनीं व मी बीचर[८] यांचं प्रवचन ऐकलं. आणि विशेष म्हणजे त्याच्या दुसऱ्याच दिवशीं आम्ही श्री. व्हिट्मन्[९] यांना जाऊन भेटलों (आल्कॉट त्यापूर्वी त्यांना भेटलेहि होते). या भेटींत आमचं मोठं मनोरंजन झालं व शिवाय आम्हाला चेतनाहि मिळाली. जगांत आजवर झाला नाहीं असा हा महान् लोकशाहीवादी गृहस्थ आहे. त्यांची वृत्ति कांहींशी ओबडधोबड असली तरी विलक्षण खंबीर असून त्यांच्या स्वभावांत गोडवा आहे. स्नेही मंडळी तर त्यांना फार मानते. बाह्यतः त्यांचं स्वरूप वेगळं व रुक्ष दिसत असलं, त्यांची कांति (सबंध शरिराची ?) लाल असली, तरी मूलतः ते सद्गृहस्थ आहेत. त्यांच्याबद्दल अजून मी गोंधळांतच पडलों आहें—कांहीं झालें तरी मूलतःच त्यांच्यांत व माझ्यांत परकेपणा असल्याची जाणीव होते. मात्र त्यांच्या दर्शनानं मी चकित होऊन जातों. ते धिप्पाड आहेत; पण आधीं म्हटल्याप्रमाणं त्यांच्यांत कोमलता नाहीं. त्यांच्या मतें मी त्यांच्याबद्दल गैरसमजूत करून घेतली आहे. तशी वस्तुस्थिति आहे कीं नाहीं तें सांगवत नाहीं. ते आम्हाला म्हणाले कीं, बसमध्यें ड्रायव्हरशेजारीं बसून हमरस्त्यावरून दिवसभर उलट-सुलट फेरफटका मारीत गाड्याघोड्यांचा खडखडाट ऐकणं, आणि कधींकधीं अंगविक्षेप करीत व आवाज उंच चढवीत होमरचे वेंचे म्हणणं आपल्याला आवडतं. बराच काळपर्यंत ते संपादक व वृत्तपत्रांचे लेखक होते. एकदां 'न्यू ऑर्लीन्स क्रिसेन्ट'चेहि ते संपादक होते. मात्र सध्यां, इतर लेखकू वर्गाप्रमाणं दुपारपर्यंत लेखन-वाचन करणं व संध्याकाळीं फिरायला जाणं याशिवाय त्यांना दुसरा उद्योग नाहीं.

पुढील आठवड्यांत बहुतेक मी कॉन्कॉर्डमध्यें असेन; तेव्हां तुम्ही मला तिकडे पत्र पाठवूं शकाल.

८. हेन्री वॉर्ड बीचर (१८१३–१८८७): प्लायमाउथ कॉन्ग्रेगेशनल चर्चमधील प्रमुख पाद्री. अमेरिकेंत सर्वत्र त्यांचीं भाषणें–प्रवचनें होत.

९. वॉल्ट व्हिट्मन् (१८१९–१८९२): ह्या पत्राच्या वेळीं ते ब्रूकलीन येथें राहात होते.

## पुन्हा व्हिट्मन्[१०]

ज्या वॉल्ट व्हिट्मन्बद्दल मी तुम्हाला लिहिलं होतं, त्यांनींच सध्यां माझं मन विशेष वेधून घेतलं आहे. त्यांच्या पुस्तकाची दुसरी आवृत्ति (त्यांनींच दिलेली) मी नुकतीच वाचली, आणि बऱ्याच दिवसांत कोणतंहि पुस्तक वाचून मिळाला नाहीं एवढा लाभ मला त्यामुळं मिळाला. 'वॉल्ट व्हिट्मन्, एक अमेरिकन' व 'सन्‌डाउन' ह्या कविता[११] मला सर्वांत जास्त आठवत असाव्यात. या पुस्तकांतील दोन–तीन कविता, अगदीं सौम्य शब्दांत सांगायचं तर न रुचणाऱ्या––निव्वळ वैषयिक आहेत. यांत त्यांनीं प्रेमाचा गौरव मुळींच केलेला नाहीं. तें जणूं कांही पशूंचं बोलणं आहे. कारणाशिवाय माणसं कधीं स्वतःबद्दल शरमून जात नाहींत असं मला वाटतं. जिथं निर्लज्जपणं अशा कृत्यांची उजळणी होते असे अड्डे नेहमीं असतात हें खरं; परंतु तिथल्य रहिवाश्यांशीं स्पर्धा करणं कांहीं प्रशंसनीय नाहीं. तरीपण ह्या अंगाबाबतहि, माझ्या माहितीच्या कोणत्याहि अमेरिकन किंवा इतर कुणा आधुनिक साहित्यिका-पेक्षां त्यांनीं अधिक सत्य सांगितलं आहे. मला त्यांची कविता उल्हसित करणारी आणि उत्तेजन देणारी असल्याचं आढळून आलं आहे. वैषयिकतेबाबत बोलायचं झाल्यास असं म्हणतां येईल कीं, ती वाटते त्याहून कमी वैषयिक ठरण्याचा संभव आहे. आणि, तेवढा भाग त्यांनीं लिहायला नको होता असंच कांहीं माझं म्हणणं नाहीं. तर, पुरुष व स्त्रिया हीं एवढीं शुद्ध—पवित्र असावींत कीं तो भाग वाचूनहि—म्हणजेच न समजल्यामुळें—त्यांना कोणताहि अपाय होऊं नये, असं मला अधिक वाटतं. कोणत्याहि स्त्रीला तो भाग वाचवणार नाहीं असं एका स्त्रीनं मला सांगितलं;—जणूं काय स्त्रीला जें वाचवणार नाहीं तें पुरुषाच्यानं वाचवेल. अर्थात् वॉल्ट व्हिट्मन् कांहीं आम्हाला अनुभव विदित करूं शकणार नाहींत. आणि आम्हाला जर धक्का बसला, तर कोणाच्या अनुभवाचं आम्हाला स्मरण होणार ?

एकंदरींत, सर्व वजावट जातां, ही कविता मला मोठी धाडशी व अमेरिकन खाक्याची वाटते. आपल्या ह्या देशांत दिलीं गेलेलीं सर्वच्या सर्व तथाकथित

१० हॅरिसन ब्लेक ह्यांना कॉन्कॉर्ड येथून ७ डिसेंबर १८५६ रोजीं वर्सेस्टरला धाडलेलें पत्र.
११ 'सॉंग ऑफ् मायसेल्फ' व 'क्रॉसिंग ब्रूकलीन फेरी' या कवितांचीं मूळ नांवें.

धार्मिक प्रवचनं एकत्र केलीं तरी, उपदेशामृत पाजण्याच्या बाबतींत तीं ह्या कवितेची बरोबरी करतील अशी खात्री कांहीं मला वाटत नाहीं.

त्यांच्या ह्या कर्तबगारीबद्दल आपण हर्षभरित झालं पाहिजे. कधीं कधीं ते मानवापेक्षां कांहींतरी थोडं अधिक ध्वनित करतात. ब्रूकलीनच्या किंवा न्यूयॉर्कच्या इतर रहिवाश्यांत तुम्ही त्यांना गोंधळून टाकूं शकणार नाहीं. हें काव्य वाचल्यावर त्या लोकांच्या अंगावर कोण शहारे उठतील!...व्हिट्मन् भयकर चांगले आहेत.

आणखी दोघेजण तिथं हजर असल्यामुळं त्यांच्याशीं मला फारसं संभाषण करतां आलं नाहीं. तरीपण ज्या कांहीं थोड्या गोष्टी मी बोलूं शकलों त्यांत, अमेरिकेच्या प्रतिनिधित्वाबद्दल त्यांनीं विचारलेल्या प्रश्नाला मी दिलेलं उत्तर असावं असं आठवतं. अमेरिकेबद्दल किंवा राजकारणाबद्दल मी फारसा विचार करीत नाहीं, वगैरे माझे विचार मीं बोलून दाखवले; पण त्यामुळं त्यांचा कांहींसा हिरमोड झाला असावा.

मी त्यांना भेटून आल्यापासून त्यांच्या पुस्तकांतील आत्मप्रशंसा किंवा अहंता यांमुळं मी अस्वस्थ होईनासा झालोंय. आत्मविश्वासपूर्ण वृत्तीचा अधिक आढळ त्यांच्या ठिकाणीं होत असल्यामुळं इतरांच्या मानानं ते बढाईखोर बनण्याचा संभव कमीच.

ती एक बडी असामी आहे.

## पैसा 'कठिण' आहे[१२]

श्री. ब्लेक,

पुन्हा तुम्हीच पत्रव्यवहाराला प्रारंभ केलात. वास्तविक, माझ्या आठवणी-प्रमाणं, माझ्याकडूनच तुम्हाला एक-दोन पत्रांचीं उत्तरं धाडायचीं राहून गेलींत.

सध्यांचा काळ मोठा कठिण असल्याचा मोठा गवगवा आजकाल केला जात आहे[१३]. परंतु मला असं वाटतं कीं, पाद्री आदि समाजांतील सर्वच लोक

१२ हॅरिसन ब्लेक यांना कॉन्कॉर्ड येथून १६ नोव्हेंबर १८५७ रोजीं वर्सेस्टरला धाडलेलें पत्र.

१३ १८५७ सालांतील घबराटीच्या वातावरणाला उद्देशून.

एकंदर परिस्थितीबाबत चुकीचा ग्रह करून घेत आहेत; मग, एखाद्या धर्म-तत्त्वानुसार उपदेश करीत असलेले कांहीं पाद्री, आपला दृष्टिकोनच बरोबर असल्याचा कितीहि आव आणोत. खासगी व सार्वजनिक अशी सर्व तऱ्हेची ही जी डबघाई आली आहे, तिच्याबद्दल खरं म्हणजे आपण एक प्रकारें आनंद प्रदर्शित करायला हवा. कारण यामुळं, आपले शासक कोण आहेत याकडे आपलं लक्ष वेधतं; नेहमीं आपल्याला न्याय मिळतो कीं काय याचाहि पडताळा घेतां येतो. आपले बरेचसे व्यापारी व बँका डबघाईला आल्या नसत्या, तर जगाच्या जुन्या कायद्यांवरचा माझा विश्वास डळमळला असता. कुठं तरी म्हटलेलं नाहीं का—'परमेश्वर कारभार चालवीत आहे, पृथ्वीवरच्या प्राणिमात्रानें खुशाल आनंदांत रहावें.' जर हजारों लोकांचा रोजगार सुटला असेल, तर त्यावरून ही गोष्ट स्पष्ट होते कीं, त्यांना नीटसा रोजगारच मिळालेला नव्हता. यावरून त्यांनीं योग्य तो बोध घ्यायला नको का? केवळ उद्योगी बनून भागत नाहीं;—तशा मुंग्याहि उद्योगी असतात. तुम्ही कशासाठीं उद्योगी बनलां आहांत?—उद्दिष्ट काय?...हा प्रश्न आहे.

श्रेष्ठतावाद, उच्च कायदे, इत्यादींना ही व्यापारी वगैरे मंडळी हंसत आली आहे. म्हणे—'या सर्व आभासमय गोष्टी आहेत.' जणूं काय ह्यांचं स्वतःचं बूड तेवढं पक्कं स्थिर आहे; एवढंच नव्हे; तर खात्रीलायक व कायम स्वरूपाचं आहे. खंबीर व सुरक्षित पायावर आधारलेली आहे असं मानण्यांत येणारी एकच एक संस्था म्हणजे बँक होती; आणि ह्याच बँकांना आतां, वाऱ्यानं हादरून जाणाऱ्या लव्हाळ्यांची दशा प्राप्त झाली आहे. सबंध देशांत क्वचितच एखादीनं आपला 'शब्द' पाळला असेल. म्हणूनच मी म्हणतों कीं, कठिण दिवस, इतर गोष्टीं-खेरीज ह्या दृष्टीनंहि मोलाचे असतात. जिथं 'खात्रीलायक' बँका असतात तिथं अशा प्रकारचे शब्द, वचनं काय किंमतीचीं असतात ह्याची प्रचीति ते आणून देतात. परवां कुणा एका व्यापाऱ्यानं आपलं जवळजवळ सर्वस्व गमावून आपलीं कांहीं देणीं देऊन टाकलीं म्हणून लोकांनीं त्याची प्रशंसा केल्याचं मीं ऐकलं. (तसं म्हटलं तर, अशा गोष्टी मी स्वतः कितीदां तरी केल्या आहेत—किंबहुना याहूनहि सरस).

'पैसा **कठिण** आहे' असं म्हणणारीं माणसं कधीं कधीं भेटतात. मी त्यांना म्हणतों कीं, ह्यावरून पैसा खाण्यासाठीं बनवलेला नसतो हें उघड होईल. कल्पना करा: ह्या नव्या जगांत, धान्याच्या किंवा बटाट्याच्या मळ्यांत, आपल्या लाकडी घरकुलांत एक मनुष्य राहातोय्. त्याच्या एका

अंगाला मेंढ्यांचा कळपहि आहे. असा हा मनुष्य 'पैसा कठिण होऊन बसलाय्' असं म्हणतोय्!...तशी गारगोटीसुद्धां कठिण असते कीं!—तिच्यांत कांहीं हीण असत नाहीं. परंतु, धान्याची लागवड करणं, लाकूड तोडणं (किंवा फोडणं), पाऊस पडत असतांना घरांत बसून राहाणं, आणि, जरुरीप्रमाणं आपल्या कपड्यांसाठीं सूत कांतणं किंवा तें विणणं ह्या गोष्टींशीं त्या बाबीचा कांहीं संबंध पोंचतो का? त्या दिवशीं बोटीबरोबर बुडालेल्यांपैकीं कांहींजणांना पैसा 'जड' असल्याचंहि आढळून आलं. अशा प्रकारची संपत्ति आपल्याला जणूं काय मोठा श्रीमंत बनवत असल्याच्या समजुतीनं बढाई मारणाऱ्या माणसाची कल्पनाच केलेली बरी. ऐन सागरांत, सोन्याची थैली पाठीशीं मारून जीवा-निशीं धडपडणाऱ्या माणसानं कासावीस होत, 'मी लाखांची असामी आहें' असे उद्गार कसेबसे काढावेत तसा हा प्रकार आहे. मला तर हे लोक कोरड्या जमिनीवर तेवढ्याच निरर्थकपणं धडपडतांना दिसताहेत;–नव्हे, त्यांच्याहूनहि हताशपणानं. कारण, सोन्याच्या थैलीसह बुडूं लागलेला माणूस बुडण्यापेक्षां शेवटीं थैली हातची जाऊं देईल, पण ह्या दुसऱ्या उदाहरणांतील लोकांची पक्की खात्री असते कीं आपण टिकाव धरून राहणार. आणि शेवटीं ते त्या थैलीसह रसातळाला जातात. आपल्या डगल्यांसह ते पोहत पोहत, आपलीं भाडीं गोळा करीत आहेत, खरं म्हणजे त्यांचीं येणीं त्यांना मिळून चुकताय्त, उलट तहान मात्र वाढवणारे कडवट घुटके गिळीत आहेत, आणि पाण्यानं अधिकाधिक घेरले जाऊन शेवटीं सरळ तळाशीं लोंबकळत जाऊन बुडताहेत असं त्यांचं दर्शन मला होत आहे. पण आतां एवढंच पुरे.

तुम्ही कधीं रस्किनचीं पुस्तकं वाचलीं आहेत का? वाचलीं नसल्यास, त्याच्या 'मॉडर्न पेन्टर्स' या पुस्तकाचा दुसरा व तिसरा खंड (भाग नव्हे) वाचण्याची मी तुम्हाला शिफारस करतों. सध्यां मी चौथा खंड वाचीत आहें. त्याचीं इतर बहुतेक पुस्तकंहि मी अलीकडेच वाचलीं. तीं थोडींफार ओबडधोबड व अंधश्रद्धा व्यक्त करणारीं असलीं तरी विलक्षण चांगलीं व प्रोत्साहन देणारीं आहेत. मी जे दोन खंड आतां सांगितले त्यांत अनन्तता, सौंदर्य, प्रतिभा, निसर्गप्रेम, आदि विषय असून त्या सर्वांचा अतिशय रसरशीतपणं ऊहापोह केलेला आहे. मी तर खरोखरी चकित होऊन गेलों आहें. वाङ्मया-पेक्षांहि प्राधान्यानं चित्रकलेच्या संदर्भात ह्या गोष्टींचं विवरण करण्यांत आलं आहे ही गोष्ट विशेष लक्षणीय आहे. 'सेवन लॅम्प्स ऑफ् आर्किटेक्चर' हें पुस्तकहि उत्तमपैकीं आहे. परंतु माझ्या आठवणीप्रमाणं, त्याच्यामध्यें माझ्या-

सारख्या सामान्य जनांच्या दृष्टीनं कलेबद्दल जरा जास्तच विवेचन आलं आहे. कारण वस्तुजात व विविध विषय यांजबद्दल आम्हा लोकांना सर्वसाधारण माहिती हवी असते. हो, आमचं घर अद्यापि झोपडीवजाच आहे.

एकद्यानं पर्वतावर मारलेल्या फेरफटक्यामुळं तुमचं जीवन संपन्न झालं असेल. बऱ्याचशा लोकांना चर्चमध्यें प्रवेश केल्यावर जसा दरारा वाटतो तसाच जणूं मला गिरिशिखरांवर चढल्यावर वाटतो. कधीं कुठं आपलं घर नि बाग असलीं, तर तीं असलेला भूभाग कशा तऱ्हेचा आहे हें पाहणं किती मौजेचं असतं!... कित्येक वर्षे उलटून जावीं ना—तसं वाटतं. जड वस्तुमात्राशीं आपलं नि खुद्द आपल्या शरिराचं नातं कोणतं आहे हें जाणून घेण्यासाठीं गिर्यारोहण करायला हवं. कारण, 'आपल्याला' वाटला नाहीं, तरी 'त्याला' तिथं आपलेपणा—घरोबा वाटतो. ...परंतु आपलं चैतन्य अपरिहार्यपणं निघून येतं, आणि, आपला देह जिवंत असल्यास त्याला आपल्या बरोबर आणतं......माझ्या बोटांचे खेळ मला कसे करतां येतात पहा!...त्यांच्याएवढे गमतीचे सोबती मला अजून दुसरे आढळले नाहींत. कुठून आले असावेत बरं ते? त्यांच्यावर माझा किती विलक्षण ताबा आहे! मी आहें तरी 'कोण'? तीं छोटीं शिखरं म्हणजे काय आहे?—मॅडिसन, जेफर्सन, लफायेटे म्हणावं त्यांना. 'ही जड वस्तुजात' म्हणजे काय आहे? मी म्हणतों, 'माझीं' बोटें दहा. पण कुणी सांगावं, लौकरच त्याचं मौंट वॉशिंग्टनच्या सर्वोच्च सुळक्यांतहि रूपांतर होईल. माझ्या देहाच्या भाऊबंदांचं दर्शन घेण्यासाठीं मी तिथं वर चढून जातों.

पर्वतावर चढून जायला फार वेळ लागला नाहीं असं तुम्हाला वाटलं म्हणतां; पण खरोखरीच वरपर्यंत गेलां होतांत ना? जर तुम्ही मौंट वॉशिंग्टनच्या शिखरावर पोंचलांत, तर मला असं सांगा—तुम्हाला तिथं काय आढळलं? तुमचा खरेपणा शाबीत करायचा हा मार्ग आहे, समजलांत? तिथं वर जाऊन वाऱ्यावर स्वतःची वरात काढण्यांत कांहींहि अर्थ नाहीं. आपण तिथं असतांना चढण्याचं फारसं काम करीत नाहीं; तर आपलं जेवणखाण वगैरे घरच्याप्रमाणं उरकून घेतों. घरीं परतल्यावरच, खरं म्हणजे, आपण पर्वतावर गेलों तर जातों!...बरं, पर्वत काय म्हणाला?—त्यानं काय केलं?

एका लहानशा वाटेच्या पूर्वेकडच्या भागांत एक पर्वत मी नांगरून ठेवलेला असतो. माझ्या झोंपेंतल्या स्वप्नांत किंवा दिवास्वप्नांत मी त्यावर चढून जात असतों. त्याचा अफाट तळ एकदोन गांवांच्या दरम्यान पसरलेला असतो. मात्र त्या गांवांना या गोष्टीचा पत्ता नसतो. एवढंच काय पण त्या पर्वताला किंवा, जेव्हां

मी चढून जातों तेव्हां मलाहि त्याची जाणीव नसते. मात्र माझ्या मनश्चक्षूंपुढं सध्यां वाच्युसेटप्रमाणं त्याचीहि सर्वसाधारण रूपरेषा मी स्पष्टपणं पाहूं शकतों. मी कांही कल्पनेनं शोधून वगैरे बिलकूल काढीत नाहीं; तर जें कांहीं मला दिसतं तें जसंच्या तसं सांगतों आहें. मी जेव्हां चपळ व उत्सुक असतों त्यावेळीं मी त्यावर चढून जात असल्याचं मला आढळून येतं. बळीसह असलेल्या वेदीप्रमाणं त्याच्यांतून सतत धूर निघत असतो. कुणी एखादा खेडुत त्यावर कधीं जात असेल किंवा त्याची त्याला माहिती असेल याची कांहीं कल्पना मला नाहीं. रपेट करण्यासाठीं एखाद्या घोड्याऐवजीं मी आपला हा पर्वत राखून ठेवलेला असतो.

डॉ. सॉल्जेर[१४] हे ह्या शहरांतील चर्चमधल्या धर्मोपदेशकांच्या दालनांत गेले कांहीं महिने, संध्याकाळीं ५ वा. भूगोलावर व्याख्यान देत आहेत--सॅन्बॉर्न्स स्कॉलर्ससाठीं, इमर्सन व आल्कॉट तीं ऐकायला जातात. परवां इमर्सन यांनीं मला, 'डॉ. सॉल्जेर यांच्या व्याख्यानाला जात नाहीं का?' असं विचारलं तेव्हां मी चकित होऊन गेलों. अशा संध्याकाळच्या वेळीं, बहुधा बाहेर कुठं तरी उघड्यावर जायचं सोडून सभागृहाच्या बंदिस्त जागेंत बसून राहायचं अं!...मला कल्पनाच करवत नाहीं. मग, सूर्य कशासाठीं निर्माण झाला आहे? त्यांना सूर्यप्रकाशाची मातब्बरी नसली, तरी मला आहे. घुबडांना व रानउंदरांना त्यांना आपलं भाषण खुशाल ऐकवूं द्या. रात्रीच्या वेळीं कुणाहि माणसाला कांहीं चालतां येत नाहीं. तेव्हां, अशी रात्र पडूं लागण्यापूर्वीच्या संध्यासमयीं मला एखाद्या सभागृहासारख्या बंदिस्त जागेंत गुंतवून ठेवणारा व्याख्याता खरोखरी अजब ठरेल.

## स्वतःचं हाड कुरतडत रहा[१५]

बऱ्याच दिवसांपूर्वीं मी बोललेले शब्द, ते माझेच असल्याची खातरजमा करणंहि कठिण असतांना, तुमच्यापर्यंत जाऊन पोंचले हें ऐकून मला आनंद वाटला. मला समाधान वाटलं तें अशासाठीं कीं, मी बोललेलं माणसांना

१४ रीनहोल्ड सॉल्जेर, पीएच्. डी. : बुद्धिवान प्रशियन पंडित.

१५ हॅरिसन ब्लेक यांना थोरो यांनीं, कॉन्कॉर्ड येथून २७ मार्च१८४८ रोजीं वर्सेस्टरला धाडलेलें पहिलेंच पत्र.

अगत्याचं वाटूं लागलंय्, आणि माणूस माणसाशीं बोलतो तें कांहीं वायां जात नाहीं ह्या गोष्टीचा मला प्रत्यय आला म्हणून. साहित्याचं मूल्य तें हेंच. तरी पण तो काळ सर्वच दृष्टींनीं इतका जुना आहे कीं, त्यावेळीं माझ्या विचारांचं अनुसंधान कोणतं होतं तें जाणून घेण्यासाठीं मला त्या पानाकडे पुन्हा वळावं लागलं. तथापि तुमच्या पत्राला तें कारणीभूत झालं म्हणून त्या वेळच्या त्या लेखाचं मला महत्त्व वाटतं.

आपलं बाह्य व अंतर जीवन मिळतंजुळतं आहे, असं खरोखरीच मी मानतों. त्याचप्रमाणें जर कुणाला उच्च जीवन जगण्यांत यश आलं, तर इतरांना तें कळतहि नाहीं; फरक व अंतर हीं एकच आहेत अशीहि माझी समजूत आहे. खरं जीवन जगूं पाहणं म्हणजे दूर देशाचा प्रवासास निघण्यासारखं आहे. त्यांत हळूहळू आपणाला असं आढळून येतं कीं, आपण नवीन दृश्यं व माणसं ह्यांनीं घेरले गेलेलों आहोंत. आणि जोंपर्यंत जुन्या गोष्टी आपल्याभोवतीं घोंटाळत राहतात, तोंपर्यंत कोणत्याहि खऱ्या अर्थानं, नवीन किंवा अधिक चांगलं जीवन मी जगत नाहीं हें मी समजून चुकतों. बाह्य भाग म्हणजे जें आंत आहे त्याची फक्त बाहेरची बाजू होय. माणसं कांहीं संवयींच्या आवरणाखालीं लपून जात नाहींत; तर त्यांजमुळं तीं उघडीं पडतात. तेच त्यांचे खरे कपडे. तीं संवयींनुसार कां वागतात ह्याचं कितीहि विचित्र कारण त्यांनीं सांगितलं, तरी मला त्याची पर्वा नाहीं. परिस्थिति कांहीं कडक व चिवट नसते; तर आपल्या संवयी कडक असतात. कधीं कधीं आपण संदिग्ध बोलण्यास प्रवृत्त होतों. जणूं काय आपलं सध्यांचं जीवन पायाभूत धरून त्यावर आपल्याला दैवी जीवनाचं कलम करायचं असतं किंवा त्यावर दैवी जीवन उभारायचं असतं. अशानं जमेल; पण तें कधीं?—तर, जुन्या जीवनांतील मायेची ऊब दूर सारून तें निरस बनवून त्यावर उभारणी केल्यानं. कोकिळेच्या अंड्यावर स्वतःचं घरटं उभारून सर्वांत वर स्वतःचीं अंडीं ठेवून तींच तेवढीं कावळी उबवते ना—तसं. पण वस्तुस्थिति जर कोणती असेल तर ते आपण. म्हणजे विभागणी आली. दोहोंनाहि उबवा; आणि कोकिळेचं एका दिवसानं आधीं. आणि मग तें पिल्लूं कावळ्याच्या पिल्लांना घरट्याबाहेर हुसकावून लावील पहा. पण नको. कोकिळेचंच अंडं नष्ट करा किंवा नवीनच घरटं बांधा.

बदल म्हणजे बदल. जीर्ण शरिरांमध्यें नवीन जीव संचारत नाहींत. तीं शरिरें कुजतात—सडतात. जीव जन्माला येतो, वाढतो व फोफावतो. माणसं अतिशय करुणास्पद रीतीनं म्हाताऱ्यांना सांगतात, जीवन स्वीकारतात व पत्कर-

दि: नों: दि:

तातहि. पण आपण स्वर्गातहि जाण्याचा समर्थ असतांनां अनाथालयांत दिवस कंठण्याचं काय कारण ? मसाला वगैरे घालून कांहीं शरीर टिकून राहूं शकत नाहीं. प्रेताला लावायचीं उटणीं व लिननच्या पट्टया यांचा उपयोग बालकांच्या देहासाठीं करावा हें बरं. इजिप्तमधील पिरॅमिड्स्मध्यें सुरक्षित ठेवलेल्या प्रेतांचे अशा प्रकारचे सोहळे करून, शेवटीं त्या प्रयोगांतून काय निष्पन्न झालं ?—तो त्याचा शेवट.

साधेपणावर माझी श्रद्धा आहे. दिवसभरांत कितीतरी क्षुल्लक गोष्टींची आपण दखल घेतली पाहिजे अशी अत्यंत शहाण्या माणसाची सुद्धां समजूत झालेली पाहून सखेदाश्चर्य वाटतं. क्वचितच एखादी गोष्ट त्याला वगळावीशी वाटते. एखादा गणितज्ञ एखादी कठिण समस्या सोडवतांना प्रथम सर्व अडचणींचं समीकरण सोडवून घेतो व अत्यंत सोप्या संज्ञेपर्यंत तिचा संक्षेप करतो. म्हणून जीवनाची समस्या सोपी करा. आवश्यक व वास्तविक यांजमधील भेदभाव ओळखा. तुमचीं मुख्य पाळंमुळं कुठवर गेलेलीं आहेत हें शोधून काढण्यासाठीं जमीन उकरून पहा. मी वस्तुस्थिति लेखतों. आपण डोळे उघडून कां पाहूं नये ? माणसांना कांहीं कळत नाहीं का ? मला अशीं अनेक माणसं माहीत आहेत कीं जीं सामान्य गोष्टींत फसवून घेणार नाहींत; भलत्या बकव्याला बधणार नाहींत; आपले पैसे नीट मोजून घेतील. तो पैसा कुठं कसा गुंतवावा हेंहि तीं जाणतात. तीं मोटीं दूरदर्शी व जाणकार मानलीं जातात. आणि तरीसुद्धां आपल्या जीवनाचा बहुतांश तीं, बँकांतील कॅशिअर्सप्रमाणें, मेजाशीं खडीं राहून घालवतील. आणि तिथंच मिणमिणत राहतील, गंजतील व शेवटीं नष्ट होतील. त्यांना कशाची कांहीं **माहिती** असली, तर तिचा ते कशासाठीं कोणता उपयोग करतात ? **पाव-भाकरी** ही काय चीज आहे हें ठाऊक आहे का त्यांना ?-किंवा ती कशासाठीं असते हें तरी ? जीवन ही काय गोष्ट आहे हें ते जाणतात काय ? जर त्यांना कांहीं माहीत असतं, तर जीं ठिकाणं त्यांना आतां ओळखतात तीं त्यांना यापुढं कदापि ओळखणार नाहींत.

जी प्राप्त करून घेतां येणार नाहीं अशा चांगल्या परिस्थितीची कल्पनाच मनुष्यांना करतां येत नाहीं. आपल्या अनुभवाचा प्रामाणिकपणं पडताळा घेऊन ही गोष्ट खरी असल्याचं कुणी सांगूं शकेल काय ? आपलीं स्वप्नं अकालिक असल्याचं आपण म्हणतों, तेव्हां त्याचा खरेपणा सिद्ध करावयास लागणारा पुरावा आपल्यापाशीं असतो काय ? एखादं उद्दिष्ट साध्य करण्यासाठीं सबंध आयुष्यभर एकनिष्ठपणं व एकांडेपणानं झटलेला परंतु तें उद्दिष्ट बिलकूल साध्य न करूं शक-

लेला कुणी माणूस तुमच्या ऐकण्यांत कधीं आला आहे काय? सतत महत्त्वाकांक्षा बाळगून राहिलेला माणूस उच्च स्थान गांठीत नाहीं काय? वीरश्री, औदार्य, खरेपणा व जिव्हाळा दाखवणाऱ्या कुणा माणसाला, त्यांत कांहीं तथ्य नाहीं–हा सारा निरर्थक खटाटोप होय असं आढळून आलं आहे काय? आपलं नंदनवन ही केवळ एक बाग ठरावी अशी अर्थातच आपली अपेक्षा नसते. आपली काय मागणी आहे हेंच मुळीं आपणाला माहीत नाहीं.

शब्दांत जें व्यक्त करतां येतें तेंच जीवनांतहि व्यक्त करतां येतें.

माझं प्रत्यक्ष जीवन ही गोष्ट अशी आहे कीं, त्याच्या बाबतींत माझं स्वतःचं अभिनंदन करण्याचा प्रसंग मला कधींच आला नाहीं; परंतु माझी श्रद्धा व आकांक्षा यांजबद्दल मला आदर आहे. त्यांना अनुलक्षूनच मी बोलत असतों. प्रत्येक मनुष्याची भूमिका वर्णावयाची म्हटल्यास ती अगदीं सोपी गोष्ट आहे. मी कांहीं कधीं शपथ वाहिलेली नाहीं. समाज, निसर्ग किंवा ईश्वर यांजबद्दल माझ्या कांहीं कल्पना ठरलेल्या नाहींत. मी केवळ जो काय आहें तो आहें, किंवा तसा होऊं पहात आहें म्हणा. मी 'वर्तमानांत' 'वास्तव्य' करून असतों. फक्त भूतकाळ मला आठवतो व भविष्यकाळाची मी प्रतीक्षा करीत असतों. मला जगावंसं वाटतं. मला सुधारणेच्या पद्धतीपेक्षां सुधारणाच अधिक आवडते. वाईट गोष्ट अधिक चांगली कशी झाली याबद्दलचा इतिहास उपलब्ध नाहीं. कोणत्यातरी गोष्टीवर माझी श्रद्धा असते, आणि त्याहून दुसरं कांहींहि नसतं. मी आहें एवढं मी जाणतों. माझ्यापेक्षां अधिक जाणणारा, माझ्या बाबतींत लक्ष घालणारा दुसरा कुणीतरी आहे हें मला माहीत आहे. त्याचाच मी प्राणी, आणि एवढं असून त्याचाच नातलग;–एका दृष्टीनं माझा मीच. अंगिकारलेलं साहस योग्य असंच आहे हें मला माहीत आहे.

भूमिका, एकत्रीकरण व तपशील यांबाबत बोलायचं तर—हे काय प्रकार आहेत? स्वच्छ हवामान असतांना आपण आकाशांत पाहिलं, तर आपल्याला आकाश व सूर्य यांच्याखेरीज काय दिसतं?

एखादा मनुष्य चुकीची गोष्ट करीत असल्याचं तुम्ही त्याला पटवून दिलंत, तर तो बरोबर वागेल, परंतु त्याला पटवण्याच्या भरीस पडूं नका. स्वतः पाहिलेलं तेवढं माणसं खरं मानतात. म्हणून त्यांना स्वतः पाहूं द्या.

कुत्रा जसा आपल्या मालकाचा पाठलाग करतो तसा तुम्ही आपल्या जीवनाचा पाठलाग करा, त्याच्या बरोबरीनं रहा व त्याच्या भोवतालीं घिरट्या घाला. आवडतं तें करा. स्वतःचं हाड ओळखून काढा, तें कुरतडत रहा, जमिनींत

पुरून ठेवा, उकरून काढा व पुन्हा कुरतडत बसा. नीतीचा अतिरेक करूं नका. तसा केल्यास जीवनांत तुम्ही स्वतःची बरीचशी फसवणूक करून घ्याल. नीतिशास्त्राच्या अतीत रहा. तसंच, केवळ सज्जन राहूं नका; तर, कशासाठीं तरी सज्जनपणा दाखवा. सर्व नीतिकथांना, अर्थातच, तात्पर्य हें असतंच; परंतु निष्पाप लोकांची त्यांतील कथेमुळं करमणूक होते. तुम्ही व प्रकाश यांच्यामध्यें कांहींहि आड येऊं देऊं नका. माणसं व भाऊबंद यांच्याबद्दल फक्त आदर बाळगा. स्वर्गाकडे जेव्हां तुम्ही प्रवास कराल, तेव्हां ओळखपत्र वगैरे कांहीं बरोबर घेऊं नका. आणि, तिथं जाऊन पोंचल्यावर प्रवेशद्वार ठोठावाल तेव्हां 'ईश्वराला भेटायचं आहे' म्हणून सांगा—त्याच्या कुणा सेवकाला नव्हे. विशेष अगत्याच्या गोष्टींत, आपल्या स्नेहीसोबत्यांची आठवण करूं नका : जगांत आपण एकांडे आहोंत असंच माना.

असं हें मी स्वैर लिहितों. तुम्हांला भेटण्याची आवश्यकता वाटते; आणि माझ्या चुका सुधारण्यासाठीं, मी तुम्हांला भेटेन असा भरंवसाहि वाटतो. कदाचित् तुम्ही मला अधिकारवाणीनं कांहीं सल्लामसलतहि द्याल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रमांक २५२६३.... वि: निबंध
किंमत १२००......... नोंदणी दि: २५।७२

REFBK-0010271

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९०२६७